' व्हावी कांहीं भारतसेवा '

स्वावलंबन पुस्तकाचे कर्ते,

' फर्ग्युसन कॉलेज पुणें ' चे विद्यार्थी.

श्री. महाराष्ट्रीय कृत

# झांकलें माणिक

अर्थात्

## महत्त्वाकांक्षी.

किं. ८ आणे.

( विद्यार्थी-संघाचे मदतीसाठीं )

# दोन शब्द.

" प्रौढ विचार, गंभीर भाषासरणी व काव्याच्या उंच भराऱ्या मनास आश्चर्यांत लोळवतात. " —( कर्तव्यजागृति )

तथापि प्रस्तुत पुस्तकांत असणाऱ्या दोषांसंबंधीं उदार वाचकांनीं दुर्लक्षच करणें जरूर आहे. कारण—

" दोषांनीं भरला, तसा कुटिलही, तोंडीं वसे काळिमा।
मित्राच्या अवसानकालिं उदया पावे जरी चंद्रमा ॥ १ ॥
राहे कायम पार्वतीपतिकृपा, शांती सुधारश्मि दे ।
थोराचें मन वेधितीगुण सदा, ना दोष कोणांतले॥२॥

—( जननीजनकज )

असो. प्रस्तुत पुस्तक दीड वर्षांहून अधिक वयाचें झालें, तेव्हां आज प्रकाशांत येत आहे. आज तरी प्रकाशांत येण्यास ' विष्णू ' च कारण आहे. विष्णूची कृपा झाल्यावर काय कमी ?

चित्रशाळेचे दक्ष म्यानेजर रा. शंकररावजी जोशी व आमचे मित्र रा. बाबुराव यांनीं घेतलेल्या मेहनतीबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

वर्षप्रतिपदा
शके १८४२ } प्रकाशक K. V

श्रीजगज्जनकाय नमः

# झांकलें माणिक

अर्थात्

## महत्त्वाकांक्षा.

---

### प्रास्ताविक.

जगन्नियंत्या जनार्दनानें या पृथ्वीच्या पाठीवर निर्मिलेलीं सर्वच रत्नें सांपडलीं नाहींत. कित्येक सांपडलीं आहेत, तर कित्येकांचा मागमूसहि माहित नाहीं. असलीं किती तरी रत्नें पृथ्वीच्या अफाट पाठीवर अप्रसिद्धपणें वावरत असतील ! 'बहुरत्ना वसुंधरा' या वचनांत तरी हाच अर्थ थोडक्यांत गोंविलेला दिसतो. एखाद्या अश्रुतपूर्व नरपुंगवानें केलेली कर्तबगारी कानावर आल्यास सहजच 'बहुरत्ना वसुंधरा' असे उद्गार बाहेर पडतात. असले अश्रुतपूर्व नरपुंगव, असलीं झाकलीं माणिकें, असलीं अप्रसिद्ध नररत्नें या वसुंधरेच्या अफाट पाठीवर किती वावरत असतील कोणास ठाऊक ! लोकोपयोगी परोपकाराची पुण्य कामगिरी करून तिचा मधुर गुणगुणाटहि कोणाच्या कानावर न जाऊं देण्याची पूर्ण कळकळीची खबरदारी घेऊन, आपलें नांवसुद्धां प्रत्यक्ष आपले आप्तेष्टांच्या स्मरणपटलावरून अजीबात पुसून काढण्याची चोख व्यवस्था लावून ज्यांनीं आपली इहलोकची अमूल्य व सन्मानीय जीवितयात्रा संपविली असे थोर महात्मे या पृथ्वीवर आजपर्यंत किती अवतरून गेले, हें फक्त यमराजाची भयप्रद पण परोपकारी रोजनिशी चाळल्यास समजण्यासारखें आहे. परंतु विश्वकर्म्याच्या अशाश्वत सृष्टीचा प्रलय झाल्यानंतरहि जो आनंदी, सुखमय व उत्तमोत्तम लोक न सोडण्याचा त्या रोजनिशीनें अचल निश्चय केलेला दिसतो, त्या लोकाचें नुसतें दुरून दर्शन होण्यासही इहलोकचा त्याग करावा लागतो. मग इहलोकीं ती रोजनिशी चाळण्यास मिळण्याची

गोष्ट्च बोलावयास नको ! शिवाय सदेह स्वर्गास जाणाऱ्या श्रीतुकाराममहाराजांसारख्या विश्वमान्य विभूतीला तरी ती रोजनिशी स्वर्गांत चाळण्याचें भाग्य लाभेल कीं नाहीं हें सर्वस्वीं संशयित असल्यामुळें, पुण्याच्या अजिंक्य जोरावर जरी स्वर्गाचा पल्ला गांठण्यास आम्ही समर्थ झालों, तरी त्या रोजनिशीचें नुसतें दर्शनहि होण्याची मारामार पडेल अशी खात्री आहे. तेव्हां ती रोजनिशी चाळण्याची व्यर्थ हांव किंवा फाजील महत्त्वाकांक्षा धरणें, मधाच्या एका अत्यल्प बिंदूनें, सर्व दिशांनीं भूगोलाला गराडा घालणाऱ्या अफाट, अपार व अनंत अशा अनेक महासागरांना मधुरत्व आणण्याची बढाई मारण्याइतकेंच शहाणपणाचें होणार नाहीं काय ? करितां असल्या हास्यास्पद व तिरस्करणीय भानगडींत जाऊन पडतां, करुणेशकृपेनें ज्या वंदनीय महात्म्यांचा सुखमय समागम, किंवा कल्याणप्रद दर्शन, निदान पुण्यकारक नामश्रवण घडेल, त्यांच्या पवित्र, निर्मल, शुद्ध, सात्विक, स्पृहणीय, उदात्त व श्रेष्ठ चरित्राच्या नित्य मननानें आत्मोन्नतीचा मार्ग चोखाळण्याचा पवित्र प्रयत्न करावा हेंच योग्य वाटतें. नित्य मनन नच घडल्यास, ज्या दिवशीं त्या लोकोत्तर महात्म्यांनीं स्वकृत कार्याला जगाचें कायमचें कल्याण करण्याचा शुद्ध व सात्विक संदेश सांगून अच्युताच्या आज्ञेप्रमाणें स्वर्गाची वाट धरली त्या दिवशीं तरी निदान, त्यांच्या निर्मल चरित्राच्या पुण्य स्मरणानें आत्मोन्नतीच्या मार्गास लागावें. प्रत्येक वर्षीं एक एक दिवसाच्याहि स्मरणानें बरेंच कार्य होण्यासारखें आहे. सरळच आहे. थोरांच्या चरित्राचा महिमा काय वर्णन करावा !

**थोरांचीं चरितें मनास अपुल्या बोधामृता पाजितीं ।**
**चैतन्या नव घालुनी बनवितीं प्रेतें, मनुष्यें जितीं ॥**
**राष्ट्राचे इतिहास तेच; जगता देतीं स्वरूपा नवे ।**
**वाटे बुद्धिस माझिया करिति ती स्पर्धा विधात्यासवें ॥१॥**

परंतु थोर विभूतींचें, त्यांच्या गुणांचें आणि त्यांच्या महत्कार्यांचें वर्षांतून एक दिवस स्मरण करणे हा थोड्या फार प्रमाणांत आपद्धर्म झाला. त्यांचें नित्य स्मरण करून त्याप्रमाणें आपण स्वतां बनण्याचा शक्य तो प्रयत्न करणें हाच खरा धर्म होय. हा खरा धर्म पाळण्याचा अव्याहत प्रयत्न केल्यास आत्मो-

न्नति फार दूर नाहीं. आत्मोन्नतीसाठींच प्रत्येकाची अतर्क्य व अवर्णनीय धडपड चालूं असल्यामुळें, आणि ती प्रत्येकाला शक्य तेवढ्या लवकर हवी असल्याकारणानें प्रत्येकानें उपरि निर्दिष्ट धर्म पाळणें जरूर नाहीं कां? कोणास ही जरूरी भासो वा न भासो, आम्हांस तरी ती भासतें. आणि म्हणूनच स्वार्थानें वेडे होऊन आत्मोन्नतीसाठीं उपरि निर्दिष्ट धर्म शक्य तेवढ्या प्रमाणांत पाळितों. ज्या अप्रसिद्ध विभूतीच्या सुखमय सहवासांत, प्रेमपूर्ण मैत्रींत आणि हितप्रद सान्निध्यांत दोन वर्षें घालविण्याचें अतुल भाग्य लाभलें, त्या विभूतीचें नित्य स्मरण करितां करितां, आज एक वर्षानें त्या विभूतीच्या पुण्य तिथीस, त्या विभूतीचें, थोडक्या प्रमाणांत कां होईना, चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करण्याची सुबुद्धि आम्हांस होत आहे. अमृताचा अनुपमेय घट हातीं आल्यास आपले बांधवांना तो मुळींच न दाखवितां आप्पलपोटेपणानें आपण त्याचें गुप्त सेवन करणें शुद्ध मूर्खपणा होय. आपणास सांपडलेल्या अमृताचे वांटेकरी आपल्या बंधूंस करणें यांत जें सुख, जी शांति व जें समाधान आहे, त्यांची बरोबरी जगांतील एकहि गोष्ट करूं शकणार नाहीं. इतकेंच काय, पण हाडांचीं काडें करून, रात्रंदिवस खपून निढळ्या घामानें मिळविलेली कोंड्याची भाकरीहि, आपल्या आप्तेष्टांना प्रेमानें बरोबर घेऊन खाण्यांत जी अमोलिक मजा आहे, ती स्वर्गांत तरी आहे कीं नाहीं, शंकाच आहे. तेव्हां सुदैवानें ज्या अप्रसिद्ध विभूतीच्या श्रेष्ठतम संगतीनें आम्हांस अपार फायदा झाला, त्याच विभूतीच्या अल्प स्वल्प चरित्र कथनानें आम्हांस झालेल्या अपार फाय-द्याचें प्रेमळ भागीदार आमच्या सर्व बंधूंस करावें अशी आमची मनापासूनची इच्छा आहे.

परंतु इच्छेला फळें येण्यास प्रयत्नांचें पाणी पाजावें लागतें. त्यांतून सदि-च्छेच्या सुंदर वृक्षाला मधुर फळें येण्यास शिकस्तीचे प्रयत्न लागतात. शिवाय, परमेश्वरी कृपेचे उन्हाची जरूरी असते ती वेगळीच. परमेश्वरी कृपेचें महत्त्व इतकें आहे कीं तिच्या अभावीं शिकस्तीच्या प्रयत्नांचें पाणी कितीहि पाजलें, तरी त्याचा काडीइतकाहि उपयोग न होतां इच्छेचा वृक्ष मात्र समूळ कुजून जातो. तेव्हां त्या सर्वज्ञानी, सर्वव्यापी व सर्वशक्तिमान सर्वेश्वराजवळ ‘ आमच्या शिकस्तीच्या प्रयत्नाला तुझ्या पुण्य कृपेचें पूर्ण पाठबळ दे ’ अशी सप्रेम,

सविनय प्रार्थना, पुत्राच्या लाडकेपणानें, सप्रणाम केल्यास, तो कृपासागर आम्हांस दूर लोटणार नाहीं अशी खात्री आहे. करितां मनद्वारा परमेश्वरास तशी प्रार्थना करून आम्ही आपल्या कार्यास हात घालतों. परंतु तसें करण्यापूर्वी, आमच्या हृदयस्थ परमेश्वराची अपर आज्ञा आम्हांस पाळली पाहिजे. कारण तिनें आमचें केव्हांहि कल्याणच होणार. आमच्या हृदयस्थ परमेश्वराची पवित्र आज्ञा अशी आहे कीं, सुज्ञ वाचकांना, अगोदरच आपल्या अज्ञानाची, दुबळ्या कर्तृत्वाची आणि दीन दोषांची जाणीव करून द्यावी. या ईश्वरी आज्ञेप्रमाणें, विवेकबुद्धीच्या उपकारीं उपदेशाप्रमाणें, या कल्याणकारक आत्मस्फूर्तीप्रमाणें बहुश्रुत वाचकांजवळ आम्ही प्रांजलपणें कबूल करितों कीं, चरित्र कसें लिहावें या विषयींचें अपार अज्ञान, तें सुंदर व गोंडस बनविण्यास पूर्ण अपात्र असलेलें आमचें दुबळें कर्तृत्व, लेखनकलानाभिज्ञत्वामुळें कींव करण्याइतकें आमच्यांत वसणारे दीन दोष, प्रलयकालच्या कल्पनाबाह्य अपरंपार सागरालाहि तोंडांत बोटें घालावयास लावतील; आणि यामुळेंच आम्ही लिहूं इच्छिलेलें चरित्र, आमच्या शिकस्तीच्या अप्रतिहत प्रयत्नांनींहि वाचकांच्या योग्य अपेक्षेप्रमाणें उठावदार वठणार नाहीं.

तथापि—

तातस्य विद्वज्जनभूषणस्य ।
किं न प्रियं बालवचः सदोषम् ॥

या न्यायानें आमचा हा वेडावांकडा प्रयत्न आमच्या सूज्ञ व विचारी वाचकांना आवडणार नाहीं असें व्हावयाचें नाहीं. शिवाय आमच्यासारख्या नूतन लेखकाचें यथायोग्य स्वागत, पित्याच्या प्रेमानें आणि मातेच्या वत्सल्यानें कसें करावयाचें हें आमच्या सन्माननीय वाचक बंधूंस पूर्ण परिचयाचें असल्यामुळेंच, आम्हांस तरी हा वेडावाकडा प्रयत्न करण्यास हुशारी व हुरूप वाटत आहे. या हुशारीस व हुरुपास उत्साही उत्तेजनाचें फलप्रद खत लाभल्यास त्यांतून स्पृहणीय चरित्रकथन निघेल, अशी बळकट आशा आहे. या बळकट आशेला अस्तित्वाची अमृतमय फळें परमेश्वरी कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं कृपेनें व वंदनीय वाचकांच्या प्रेमळ अशीर्वादानें येवोत म्हणजे झालें !

फ० कॉ० पुणें,
ता० १९।८।१८.

महाराष्ट्रीय,

# झांकलें माणिक—बाल्य.

अनादि, अनंत व अपार अशा वरून रमणीय व मोहक दिसणाऱ्या विघातक कालसागरावर सोडून दिलेल्या अशाश्वत जीवितनौकेला आंतील दुर्धर दुर्दैवाच्या खट्याळ खडकांचा भेसूर धक्का लागून तिचा ' सत्यानास ' केव्हां होईल हें जर मानवी मेंदूला माहित असतें तर जगाचें काय झालें असतें हें एका जगन्नियंत्याला ठाऊक ! पेशवाईची बाजी जगांत दुमदुमवून आपल्या नांवाच सार्थकतेच्या अनुपम अलंकारानें सजविणाऱ्या ब्राह्मणक्षत्रियाला, आपला कुलदीप, आपल्या नांवाची, आपल्या कुलाची व आपल्या देशाची राखरांगोळी करील, असें जर चुकून स्वप्न पडलें असतें, तर त्यानें गाजविलेले पराक्रम, केलेली मर्दुमकी व दाखविलेलें शौर्य, मुळींच जन्माला आलीं असती कीं नाहीं शंकाच आहे. दूर कशाला ? आज दोन वर्षांपूर्वी म्हणजे तारीख सव्वीस आगष्ट १९१६ रोजीं, शनिवारवाड्याच्या गणेशदरवाजावरील दुःखद पण अभिमानदृष्ट्या पडक्या तटावर, सायंकाळच्या रमणीय व शांत समयीं, गमतीनें चण्याकुरमुऱ्याच्या एकावर एक फक्या मारणाऱ्या सात व्यक्तींपैकीं, एकीलाहि पुढें एक्कावन आठवड्यांनीं ओढवणाऱ्या अनिष्ट अरिष्टाची अंधुक कल्पनाहि जर आली असती, तर आज वर्षापूर्वी कैलासवासी होणाऱ्या वर्षांत, असणारा त्या सात व्यक्तींचा आयुष्यक्रम तसा असतां कीं नाहीं हें सर्वथैव संशयित आहे. तथापि कांहीं उल्लू अचरटांप्रमाणें मागून येणाऱ्या भविष्यकाळाला पाहण्याकरितां परमेश्वरानें पाठीला डोळे दिले नाहींत याबद्दल भयंकर दोषाची काळी काजळी त्याच्या मनमोहन मुखाला फासण्याची फाजील व बेमुर्वत चंचल, लहर, आमचे मनाला एकदांच शिवून जाण्याचा नुसता फलशाश्वतही जर विचार करील, तर जगांत जन्माला येऊन आम्हीं प्रस्तुत चरित्रनायकाच्या संगतीचा व सहवासाचाच केवळ अपमान केला, असें न होतां सर्व विश्वांतील प्रत्येक अणूरेणूचा अघोर व असह्य अपमान केला असेंच नाहीं कां होणार ? शिवाय, दाट काळोखांत स्वैर संचार करणाऱ्या भविष्याची पुसट आकृति अगर गतिही मानवी मेंदूला दिसूं द्यावयाचीच नाहीं असा सर्वेश्वरी संकल्प असावा असें वाटत नाहीं. कारण तसें असतें तर भूतकालाच्या सूक्ष्म सिंहावलोकनाचा किंचित् पारदर्शक चष्माही

त्यानें मानवी मेंदूच्या स्वाधीन केला नसता. आतां हें खरें कीं, कित्येकदां या चष्म्यांतून भेसूर भविष्य, रमणीय, चित्ताकर्षक व सुंदर असल्याचा भास होतो, तर कित्येकदां तो अजिबात दिसतच नाहीं. परंतु तेवढ्यानें परमेश्वराच्या कौतुकमय, सहज लीलेला मुळींच कमीपणा न येतां ती अधिकच खुलून दिसते. पुढें येणाऱ्या स्वल्प संकटाची सूचना मिळाल्यास त्याला जोरानें तोंड देण्याची अजब तयारी करण्याकरितां नाना तऱ्हेच्या योग्य युक्त्या मानवी मेंदू शोधून काढित असतो. परंतु सूर्यप्रकाशानेंही अंधुक न होणाऱ्या कल्पांतापर्यंतच्या काळोखांत मन मानेल तसें वावरणाऱ्या भेसूर भविष्याच्या अस्पष्टपणेंहि दृष्टिगोचर न होणाऱ्या पुसट आकृतीवरून किंवा गतिवरून धावत येणाऱ्या राक्षसी संकटाची अंधुकहि कल्पना मानवी मेंदूला चुकून झाल्यास, तो गभेगळीत होऊन, आपल्या ताब्यांतील जीवित–नौकेला कसें हाकारावयाचें हें त्यांस मुळींच समजणार नाहीं. आणि अशा तऱ्हेनें, दोन घटकांनीं ओढवणारा शोचनीय अनर्थ ताबडतोब ओढवेल. तो तसा ओढवूं नये म्हणूनच जगाच्या कुशल कारागिरानें तसला चष्मा मानवी मेंदूच्या स्वाधीन केला. सुसाध्य भविष्याच्या भोंवतीं दुष्प्राप्यतेचा खडतर पहारा आहे असें भासविणारा, भेसूर भविष्यानें रमणीयत्व चित्ताकर्षकता व सौंदर्य परिधान केलीं आहेत. अशी समजूत पाडणारा व कित्येक वेळां नजरबंदी करणारा, फसव्या चष्मा मानवी मेंदूच्या हवालीं करण्यांत विश्वेश्वराचा आणखी एक विशिष्ट हेतु आहे. या जगांत सर्वत्र ईश्वरी सत्ता नांदत असून तिच्याच इच्छेच्या अपरिमित जोरावर या जगांतील प्रत्येक गोष्टीचें सूत्र हलत असतें हेंच शिकविण्याचा तो विशिष्ट हेतु होय.

या हेतूचें मनावर सुबक रीतीनें उठविलेलें हुबेहुब छाया चित्र अंतश्चक्षूंपुढें सतत ठेवून त्याच्या मुक्या पण अनुल्लंघनीय आज्ञेप्रमाणें, देवदत्त चष्म्याचें मिळेल तेवढें साह्य घेऊन सदसद्विवेक बुद्धिनें सांगितलेल्या सल्ल्याच्या हातांत हात घालून सज्जनांच्या पावलावर पाऊल टाकीत जावें असा आदरणीय उपदेश, ज्या थोर विभूतीनें, नुसत्या पोकळ शब्दांनीं न करितां आपल्या अनुकरणीय व सत्त्वशील वर्तनानेंच केला; ' बंधुप्रेमाच्या सुपीक क्षेत्रावरील द्वेष, मत्सर, कुत्सितपणा इत्यादि विषारी काटेऱ्यांनीं भरगच्च भरलेला स्वार्थाचा अरुंद पण विघातक बांध दोन्ही बाजूंनीं रेटण्याचा पवित्र प्रयत्न बंधु बंधु सतत करीत राहिल्यास

एक दिवस असा उगवेल कीं, त्या दिवशीं त्या बांधाचा सर्वस्वीं नायनाट होऊन सगळीकडे प्रेम, एकी आणि अबादानी यांचा सुकाळच सुकाळ होईल ' वगैरे सारखे सहज परंतु मस्तकीं धारण करण्यायोग्य महत्त्वाचे उद्गार ज्या श्रेष्ठाच्या तोंडून निघत; स्वकृत-कार्यांचा डांगोरा आपण पिटण्यापेक्षां तें हलकट काम, श्रमाच्या व उद्योगाच्या आज्ञाधारक दूतांवर ज्या वंदनीयानें सोंपविलें; ' बड बडीनें कृतकार्य सर्व रोडें ' असेंच ठाम मत ज्या महात्म्याचें होतें;

" मृतमाता दुग्ध अम्ही ना प्यालों, तुज मुळीं कधीं न हटूं ।
विपदे! ध्यानिं असूं दे, मत्तगजा सिंह, त्यापरी निपटूं ॥ १ ॥

असा विपदावस्थेला खणखणीत सवाल ठोकून परिस्थितीला—

मार्गीं काटे पसरुनि तुला काय येईल बोल ।
घेसी कां गे फुकट अपणा सांग लावोनि बोल ॥
वाटो, वाटे तव भय जया; दास्य अंगीकराया ।
खात्रीनें, गे स्थिति ! तुजसि मी भाग पाडीन ध्याया ॥१॥

अशी प्रेमाची ठासून ताकीद ज्यानें दिली होती; जो, दैवदुर्विपाकामुळें जन्माच्या सोबत्यानें कांहीं दिवस सोडून दिलेल्या आपल्या आईचा आत्मा; ' मित्र जयास म्हणविलें, सुज्ञें त्यासी गरूं नये कष्ट ' या सुप्रसिद्ध कव्युक्तीप्रमाणें तंतोतंत वागल्यामुळें आपल्या संवगड्यांच्या हृदयांतील रत्नजडीत प्रेमसिंहासनावर विराजमान झालेला सार्वभौम भूपति; आणि जो चुकलेल्यांना योग्य मार्ग दाखविण्याकरितां आपल्या निर्मल चरित्राचा दिव्य दिवा ठेवून गेलेला कर्मयोगी; त्याचें कोमल व कौतुकमय बालपण जितक्या रंगांनीं रंगवतां येणें शक्य आहे तितक्या सुंदर रंगांनीं रंगवून, त्यास चित्ताकर्षक सोनेरी चौकटींत बसविणें योग्य नाहीं काय ?

परंतु आम्हांस तसें करितां येत नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते. एकतर तसें करण्यास अवश्य असणारी पात्रता परमेश्वरानें वाटली त्यावेळीं आम्हीं तेथें हजर नव्हतों; दुसरें असें कीं, आमच्या चरित्रनायकाच्या बालपणाची नुसती रूपरेखाहि आम्हांस माहित नाहीं. मग आम्हीं त्याचें चित्र तरी कसें काढणार ? आडांत असलें तर पोहऱ्यांत येईलना ? बरें, त्या बाल्याचा फोटो पैदा करून ते

जशाच्या तसा यावा म्हटलें, तर फोटोहि कोणीं काढिला नाहीं. त्यासंबंधीं तोंडी माहिती मिळवून तिचें शब्दचित्र रेखाटण्याचा निश्चय करून माहिती मिळविली, पण ती असावी तशी सुसंगत व समाधानकारक नाहीं. खुद्द श्रीकृष्णाच्या तोंडून सहजासहजीं उपलब्ध झालेली हकीगत, सर्वच प्रसिद्ध करितां येत नाहीं. कारण त्यांत कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्या षट्कर्णी झाल्यास, आम्हांस वचनभंगाचा कलंक लागणार आहे. असो. तात्पर्य इतकेंच कीं आम्हांस श्रीयुत महत्त्वाकांक्षी यांच्या बाल्याविषयीं जवळ जवळ कांहींच लिहितां येत नाहीं. तथापि ' मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ' ही म्हण अनेक थोर पुरुषांप्रमाणें प्रस्तुत चरित्रनायकासहि लागू आहे कीं नाहीं, हें जाणण्याची उत्कट इच्छा कांहींजणांस तरी असणारच. त्यांची ती इच्छा थोड्या फार प्रमाणांत तृप्त करावी, या हेतूनें श्रीकृष्ण बाल्याचें कांहीं तरी चित्र कसेंतरी काढण्याचा फुट-कळ प्रयत्न करितों.

मनाच्या माधुर्यानें प्रेमाची पवित्रता पुजून प्रसन्न करून घ्यावयाची व तिच्याच प्रसादाच्या पराक्रमावर, परस्पर सहाय्यानें, परमपुरुषाच्या पदाचा पल्ला गाठावयाचा हा एक हेतु लग्नाच्या नाजुक व निर्मल आणि सात्विक बंधनांत असतो. परंतु त्या बंधनानें बांधून घेण्यांत असणाऱ्या खडतर तीव्रतेचा हितप्रद जुलूम, मदिराभक्त स्वच्छंदी मित्रांनीं (?) स्वातंत्र्यप्रिय (?) बनविलेल्या ताजभूषणच्या तात्यासाहेबांस कसा खपावा? आपल्याच हातानें गळ्यांत बांधून घेतलेली नसती धोंड स्वबाहुबलावर समुद्रांत फेंकून देण्याचा त्या परप्रत्ययनेयबुद्धि पठ्ठ्यानें निश्चय करून, ताबडतोब आपल्या एकनिष्ठ व सुशील अर्धांगीस स्वपौरुषपराक्रमानें (?) दुःखसागरांत ढकलून दिली. फांशी देतांना गुन्हेगाराची जशी शेवटची इच्छा तृप्त करतात, त्या-प्रमाणेंच सुखाच्या संसाराची समाप्ति होतांना सौ. वत्सलाबाईनीं केविलवाण्या तोंडानें प्रदर्शित केलेली इच्छा सुदैवानें, तात्यासाहेबांस पुरविण्याची इच्छा झाली. नाहीं तर त्या माउलीस जिवाच्या कलिजाचा वियोग दुःखावर डाग-णीच झाला असता. स्वनाथाच्या बहकलेल्या मनाला सुबुद्धि देण्याविषयीं अनाथांच्या नाथाला अंतःकरणपूर्वक प्रार्थना करून, आपल्या सर्वस्वाला—दोन

वर्षांच्या श्रीकृष्णाला—आपल्या कडेवर घेऊन दुःखविदीर्ण अंतःकरणानें वत्सलाबाई आपल्या दरिद्री भावाच्या फुटक्या संसारांतील कोरडा कोंडा खलास करण्यास, केवळ भावाच्या आग्रहास व शब्दास मान द्यावयाचा म्हणून गेल्या. पतीचा पाय भलत्या मार्गानें जाऊं लागल्यास त्यास खेचून आणून योग्य मार्गास लावावयाचें, हें जें पत्नीचें कर्तव्य, हा जो पत्नीचा पवित्र अधिकार तो योग्य मार्गानें, योग्य रीतीनें बजावून लग्नबंधनानें येत असलेल्या सात्विक जबाबदारींतून वत्सलाबाई कशा पार पडल्या, वगैरे गोष्टींचा इतिहास मननीय आहे. तथापि त्याचा प्रत्यक्ष संबंध प्रस्तुत चरित्र नायकांशीं नसल्यामुळें, तो या छोटेखानी चरित्रांत दिल्यास अस्थानीं होईल अशी भीति वाटते.

जी आपल्याच मातेच्या उदरीं जन्माला आली; जिच्याशीं प्रेमभरानें खेळण्यांत आपलें बाळपण निघून गेलें; ' माझ्या लग्नास माझ्या सुखासाठीं, व माझें चांगलें व्हावें म्हणून घरांत असणाऱ्या खिडुकमिडुकाची वाताहत करण्यापेक्षां, दादाच्या विद्येकरितां, दादाच्या सुखासाठीं आणि दादाचें चांगलें करण्यांत त्या खिडुकमिडुकाचा उपयोग करा ' म्हणून ज्या कर्तव्यनिष्ठ भगिनीनें आपल्या आईबापांस पदर पसरून मागणें मागितलें; लक्षाधिशाची गृहिणी असतांहि संपत्तिचा विघातक धूर जिच्या डोळ्यांस कधींहि चढला नाहीं, जी दोन्हीहि कुळास भूषण अशीच होय, जिला संकटकालीं—विशेषतः प्रस्तुत सारख्या संकटकाळीं—आपल्या व्यतिरिक्त दुसरा आसरा नाहीं त्या आपल्या एकुलत्या एक बहिणीला गणपतरावांसारखा उदार अंतःकरणाचा गृहस्थ, दुसऱ्याच्या चुली पुजावयास संमति देईल अशी कल्पना तरी करवते काय? आपल्या आईबापांच्या वेळेपेक्षां आपल्या भावाची परिस्थिति किंचित् समाधानकारक असली तरी त्याच्या फुटक्या संसारांतील कोरड्या कोंड्यांत वाटेकरी होऊन आपल्या भावास आणि भावजयीस अर्धपोटीं अगर उपाशी मारण्यापेक्षां नशिबीं असलेले दुःखाचे डोंगर गिळून प्राप्त झालेल्या परिस्थितींतूनहि मार्ग काढावा आणि साधल्यास आपल्या भावाला व आपल्याच सारखे दुःखपंकांत निमग्न झालेल्यांना थोडें बहुत सहाय्य करावें, या सद्धेतूनें वत्सलाबाईनीं शाहुपुरीस श्रीमंत सरदार दादासाहेब यांचे येथें चूल पुजण्याचें काम पतकरिलें. हेंच

दादासाहेब, आपल्या जीवितेश्वरास ताळ्यावर आणण्याच्या कामांत वत्सलाबाईस हरएक तऱ्हेनें उपयोगी पडले.

गणपतरावांचे येथें महिना काढल्यानंतर दादासाहेबांचे येथें सोय लागली होती. प्रामाणिकपणाचें व कसोशीचें चोख काम पाहून, दादासाहेब व त्यांच्या कुटुंबांतील इतर मंडळी खुष झाली. मर्जी संपादनार्थ आपण कल बघून मालकाची खुषमस्करी करण्यापेक्षां अंग न चोरतां कसून केलेल्या सोळा आणे कामाकडेच तें काम सोंपवावें असें स्वकृतीनें सिद्ध करणाऱ्या वत्सलाबाईना दादासाहेब पुढें पुढें आपल्या घरांतील मंडळीप्रमाणेंच समजूं व वागवूं लागले. वत्ससाबाईचा श्रीकृष्ण, दादासाहेबांना आपल्या शंकराप्रमाणेंच प्रिय वाटूं लागला. श्रीकृष्ण व शंकर या समवयस्क बालकांमध्यें परस्पर इतकें प्रेम व इतकी सहकारिता वाढली कीं ' शिवस्य हृदये विष्णुर्विष्णोश्च हृदये शिवः ' अशी स्थिति होऊन बसली. दादासाहेबांच्या येथें शाहुपुरीस श्रीकृष्णाचे प्रवेशपरिक्षेपर्यंत शिक्षण झालें, असो !

**स्वातंत्र्य नष्ट झालें त्याचें जगतीं जिणें असें व्यर्थ ।**
**जातां गंध फुलाचा, आहे हो ! कोणता तयीं अर्थ ॥१॥**

**कोठ्यांत पक्षी वसतात जैसे ।**
**मोदें, सुखानें, गमतींत तैसे ॥**
**एका कुटुंबांतिल बालकांनीं ।**
**मोदें रहावें कलहा त्यजोनी ॥२॥**
**कलंक येतो सहजीं दिसून ।**
**प्रसन्नता त्या शरदिंदुची न ॥**
**जसा दिसे स्पष्टच दोष लोकां ।**
**कधीं न तैसा गुण हें विलोका ॥३॥**
**परिस्थितिचा जो दास सदा बंदा ।**
**योग्य नाहीं तो करण्यास एक धंदा ॥**
**जरी प्राणाची वसति असे देहीं ।**
**शवाहूनी योग्यता अधिक नाहीं ॥४॥**

परिसुनि मृदु गाणें गोडसें निर्झराचें ।
निरखुनि शुभ हास्या शुद्ध पंकेरुहाचें ॥
सुखमय तरुपर्णां नाचतांना बघून ।
हृदय न फुलतें त्या ईशलीला कळे न ॥५॥

सूर्यानें जरि टाकिली प्रखरता, चंद्र सुखीं शीतता ।
हास्यानें शुभता; मधें मधुरता, क्षाराब्धिनें क्षारता ॥
संतीं सज्जनता, शठीं पिशुनता, ईशें हि वा ईशता ।
बाळा सात्विक निश्चयो न वितळो, स्वर्गा पळो
वाच्यता ॥ ६ ॥

आईची वत्सलता वर्णाया कोण या जगीं शकला ।
वाटे बृहस्पतीशतकरगण होईल वर्णिता थकला ॥ ७ ॥

या व आणखी अशाच पुष्कळ कविता माझ्या आईनें मला अगदीं लहानपणापासून शिकविल्या; असें आमचा चरित्रनायक आमचे जवळ पुष्कळदां बोललेलें आम्हांस पूर्णपणें आठवतें. त्यांवरून सुंदर गृह–शिक्षणाचे अमृतमय घुटके त्या माउलीनें आपल्या बालकास पाजिले होते कीं नाहीं हें सहज लक्षांत येईल असें वाटतें.

असल्या गृहशिक्षणानें तयार झालेला श्रीकृष्ण विश्वविद्यालयाचा उंबरठा ओलांडणार, तोंच वातावरणांत भयंकर बदल पडला. सूर्यप्रकाश सर्व जग व्यापण्यासाठीं जितकी धडपड करीत होता, त्याच्या दीडपट चिकाटीचा प्रयत्न काळोख आपलें साम्राज्य पसरण्याकरितां करीत होता. जाई, जुई, गुलाब, मोगरा वगैरे मनोरंजक पुष्पांचा आल्हादकारक सुगंध जिकडे तिकडे दरवळण्याच्या खटाटोपांत गुंग झाला होता, तर कुजलेल्या प्रेतांची आणि नरकांची तिरस्करणीय घाण दुपटीनें आपला फैलाव करीत होती. अष्टमीच्या सुधाकराचे रमणीय व शांत किरणांना उन्हाळ्यांतील भर दोनप्रहरचे प्रखर सूर्य किरणांमध्यें मूठमाती मिळत होती. एकीकडून भूलोकच्या अमृताचे घुटके प्राशन करावयास मिळत होते, तर त्याच वेळीं दुसरीकडून निर्दय कसाबाची कठोर व तीक्ष्ण सुरी अर्धी अधिक मानेंत गेली होती. ऋतुराजा वसंताच्या उदार आगमनानें झाडांना

पालवी फुटत होती, तर त्याच वेळीं मेघपत्नी आपल्या करुणाविहीन कडकडाटानें त्यांना यमसदनाकडे रवाना करण्याची जारीची तयारी करीत होती. ज्या नौकेला गंभीर व शांत समुद्र आपल्या पाठीवरून गमतीनें व मजेनें जाऊन देत होता, तीच नौका झंजावाताच्या प्रचंड प्रहाराखालीं छिन्न-विच्छिन्न होत होती. हवेंत मोठमोठे भव्य किल्ले बांधण्याबद्दलचे मनाचे मांडे चुरण्याचें काम चाललें होतें, तर त्याच वेळीं, वस्तुस्थिति आपल्या कसाबी करणीनें तें सर्व शून्यतेप्रत पोचवीत होती.

सर्वांकडून धन्योद्गार घेणाऱ्या ओजस्वी विजयानें उद्भूत होणाऱ्या आनंदाची अचूक आहूति जीव कीं प्राण असणाऱ्या शंकराच्या आकस्मिक मृत्युमुळें होणाऱ्या यातनामय दुःखांत पडत होती. आईचे अश्रांत श्रम आणि दादा-साहेबांची निरलस व अव्याहत खटपट, या जोडगोळीनें चांगलाच बार उडवून दिल्यामुळें गगनांत न मावणाऱ्या सुखाला, मामीच्या सौभाग्य सूर्याला मृत्युनें कायमचें ग्रासल्यामुळें मनाचा चक्काचूर उडविणाऱ्या कल्पांतप्राय कष्टांनीं खग्रास ग्रहण लावलें होतें. आईच्या स्वार्थविरहित मदतीवर पदवीधर होऊन पुढें आपल्या स्वतांच्या पायांवर उभें राहून हायकोर्ट वकील झालेल्या वसंत-रावांच्या पुष्कळ दिवसांच्या भेटीनें निर्मिलेल्या आल्हादावर आपला सख्खा आत्तेभाऊ विक्रांत हा चोरी केल्यावरून तुरुंगांत गेलेला ऐकून, लज्जेनें पिळून काढणारे कष्ट अनपेक्षित झडप घालीत होते. स्वस्थिति सुधारल्याबद्दलच्या आमोदजनक समाधानाला, आपल्याच बरोबरीच्या सहाध्यायांच्या करुणाजनक दारिद्र्याच्या कल्पनेंतून प्रसवणाऱ्या, अंगावर शहारे आणणाऱ्या आणि अंतःकरण करपून टाकणाऱ्या त्रासाला, बळी पडावें लागे.

परंतु " सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ । कर्तव्यं कुरु भावेन सर्वदा निरपेक्षया " ॥ अशा माउलीच्या सात्विक सदुपदेशानें घडलेल्या श्रीकृष्णाच्या बाणेदार मनावर वातावरणांतील उपरिनिर्दिष्ट फरकाचा काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं. प्राप्त परिस्थितींत आपलें कर्तव्य कोणतें हें ओळखून तें बजावण्यास तो सिद्ध झाला. आणि त्याचा ओनामा म्हणूनच कीं काय, त्यानें त्या वेळीं नारायण नगरींत असणारे आपले परममित्र श्री. साठे यांस जें पत्र लिहिलें त्यांत अगदीं आरंभीं असें लिहिलें होतें कीं " माझें बाल्य संपलें; मी

आतां मोठा झालों. " शारिरिक बाल्याच्या समाप्तिपूर्वी किती तरी दिवस ज्याच्या मानसिक बाल्याची समाप्ति झाली होती, त्याचें दुसरें पत्र जसेंच्या तसें देऊन 'बाल्याची' रजा घेतों. पत्र जसेंच्या तसेंच देण्याचा निर्मळ उद्देश इतकाच कीं "लेखन दावि मनुष्या" या उक्तीप्रमाणें आमच्या नायकाचे स्वभावाची थोडी फार ओळख होऊन त्यानें प्राप्त परिस्थितींत आपलें योग्य कर्तव्य ओळखिलें कीं नाहीं हें सहजासहजीं समजेल.

"श्री

मि० रा० **दत्तोपंत साठे** यांस सप्रेम सविनय साष्टांग नमस्कार वि०

माझ्या हृदयांतील प्रेमाच्या सिंहासनावर विराजमान झालेल्या मित्राला माझें मनोगत लिहिणें अस्थानींच होणार आहे. प्रकाश कसा असतो हें दाखविण्या-करितां सूर्यापुढें दिवटी धरणें जितकें शहाणपणाचें, दूरदर्शीपणाचें, व व्यवहारज्ञ-तेचें लक्षण म्हणतां येईल तितकेंच, किंबहुना त्याहूनहि अधिक, शहाणपणाचें, दूरदर्शीपणाचें व व्यवहारज्ञतेचें लक्षण, मी आपणांस आपलें हृद्गत पत्रद्वारें कळ-विणें होईल. तथापि सूर्यालाहि आपण दिवा ओवाळतोंच ना ?

कालच्याच पत्रांत मीं असें लिहिलें आहे कीं, 'माझें बाल्य संपलें; मीं आतां मोठा झालों.' हें मीं आपली जबाबदारी न ओळखतां लिहिलें, असें म्हणाल अशी अपेक्षांच करवत नाहीं. ज्यांनीं माझ्यावर व माझ्या परमपवित्र मातोश्रींवर उपकारांचें अनंत ओझें घालून ठेविलें, ते सध्यां, प्रिय पुत्राच्या आकस्मिक मृत्युनें दुःखांत तळमळत असलेनें त्यांचें प्रेमानें व कृतज्ञतेनें सांत्वन करणें हें माझें कर्तव्य नाहीं काय ? मामांचा प्लेगानें बळी घेतल्यामुळें, निराश्रित होऊन उघड्या पडलेल्या त्यांच्या माणसांची तरतूद करण्याची जबाबदारी माझ्याच शिरावर पडले ना ? विक्रांतानें दिवे लावून उजेड पाडल्यामुळें तीं० गं० आत्या-बाईंच्या तोंडावर चढलेला कालिमा अक्षय्य असल्यामुळें त्यांची वृत्ति त्यांना जिवाचें बरें वाईट करावयास सांगेल. परंतु त्यांना तसें न करूं देण्याबद्दल व्यवस्थित खबरदारी मींच घेतली पाहिजे ना ? ज्यांनीं माझ्याबरोबर व केवळ माझ्यासाठीं येईल ती परिस्थिति गोड करून घेतली त्या माझ्या द्रव्यानें गरीब पण मनानें श्रीमंत सहाध्यायांना, मला सुदैवानें सुस्थिति प्राप्त झाली म्हणून

विसरणें योग्य होईल कां ? इतकेंहि करून, शिकण्या योग्य वयाचा पूर्ण फायदा जर घेतला नाहीं, तर पाठीमागून पश्चात्ताप करण्याची पाळी येईल ना ?

माझा शिकण्याचा बळकट निश्चय झालेला आहेच. त्यासाठीं मी तिकडे एक दोन दिवसांत येतोंच. मीं खच्चून शिकावें अशी ती० तात्यांची व मातोश्रींची इच्छा आहे. तेव्हां त्यांच्याकडून येतील त्यापैशांत मी व माझे सहाध्यायी भागवूं. शिवाय माझ्या मित्रांसहि थोड्या फार प्रमाणांत सहाय्य करण्यास मी माझे मातोश्रींस विनविलें. तर अगदींच उपयोग व्हावयाचा नाहीं असें नाहीं ! त्यायोगें आम्हां सर्वांस दगडापेक्षां वीट मऊ असें तरी होईल ! ' विक्रांतानें तुमच्या तोंडास फासलेला काळिमा, वामन आपल्या पराक्रमानें, कर्तृत्वानें, तेजानें, आणि पुण्याचरणानें धुवून काढील; किंबहुना वामनाचा पराक्रम, कर्तृत्व, तेज आणि पुण्याचार, विक्रांताच्या कृतिच्या गालबोटानें अधिकच खुलून दिसतील. ' वगैरे तऱ्हेचें वेडेंवाकडें समाधान करून आत्याबाईंना मीं आपल्या घरीं आणिलें आहे. त्यांच्याबद्दल काळजी करूं नको, त्यांची सर्व काळजी मला आहे, असें मातोश्रींनीं मला सांगितलें आहे. आणि म्हणूनच माझा जीव अर्धाअधिक खालीं पडला आहे. मामींची व चि० कमलेची तरतूद कशी काय करावी ही विवंचना मला होती. पण इच्छेला मार्ग सांपडतोच. आणि माझ्या इच्छेला तूर्ततरी मार्ग सांपडला आहे. कमलेनें माझ्याजवळ नारायण नगरींत राहून विद्याभ्यास करावा आणि मामींनीं आमचे येथें रहावें, अशी सोय काढली आहे. दादासाहेबांचें सांत्वन करण्याला मजजवळ शब्दच नव्हते. परंतु ' मी आपला मुलगा आहे. आपणांस केव्हांहि अंतर देणार नाहीं. ' एवढ्या माझ्या शब्दांनीं अतर्क्य काम केलें आहे. असो.

मी, माझे तिघे सहाध्यायी, व चि० कमला, एक दोन दिवसांत तेथें येतोंच. आपण सर्वांनीं एके ठिकाणीं रहावें अशी इच्छा आहे. भेटीनंतर कमी जास्त माहिती कळेलच. कळावें प्रेमपूर्ण कृपेची वृद्धि व्हावी हे वि०

| | | |
|---|---|---|
| ताजभूषण,<br>ता. मा. १९ | } | आपला,<br>**श्रीकृष्ण.** |

" ता० क०:—

आपले मातोश्रींचे कृपाचरणीं माझा शिरसाष्टांग नमस्कार. "

# झाकलें माणिक.

## २

### कालपुरुषाचे अवघे दोन दिवस.

अहो ! सारमेयाचिया भुंकण्यांत ।
असे फार थोडा तरी खास अर्थ ॥
म्हणोनी कुणाचेंहि ऐकोनि घ्यावें ।
विचारें असे योग्य तें स्वीकरावें ॥ १ ॥

पुढील आयुष्याच्या जननीचा पूर्ण परिचय झाल्यावर पुढील आयुष्याची ओळख करून घेतलीच पाहिजे असा नियम नाहीं. परंतु बाल्यावस्थेची नुसती तोंड-ओळखहि पुरीशी न झाल्यानें पुढील आयुष्यावरूनच त्याच्या जन्मदात्रीची हुबे-हुब छबी, कल्पनेच्या वाकबगार कुशलतेकडून करवून घेणें प्राप्त आहे. आणि म्हणूनच, बाल्यावस्थेचा सादर व सप्रमाण निरोप घेऊन इतक्या घाईनें पुढील आयुष्याच्या भेटीस आम्हीं वाचकांस नेत आहोंत. या घाईंत घाई करून आम्हीं वाचकांस नम्र व स्पष्ट विनंति करितों, कीं श्रीकृष्णाच्या निर्मळ आयुष्याशीं अचूक परिचय करून देतां देतां, कदाचित् आमचे हातून एकादा दुसरा शब्द अधिक उणा जावयाचा नुसता संशयमय संभव नसून, बरोबर खात्री आहे. परंतु एवढेंहि झालें तरी बरीच मिळविली म्हणावयाची ! नाहीं तर एकादे वेळीं मोठमोठीं गोंडस, आकाशांत खूप उंच भराऱ्या मारणारीं, मनोरंजक पण आच-रण्यास कठीण अशीं तत्त्वें आणि जगद्विख्यात पंडिताच्या बुद्धीसहि अगम्य असें भासणारे तत्वत: नीरस सिद्धांत नकळत प्रतिपादिले जावयाचे ! तेव्हां असें झालें तरी लहान तोंडीं मोठा घास घेण्याचा अव्यापारेषु व्यापार आम्हीं जाणून बुजून केला अशी निराधार गैरसमजूत करून न घेतां आमच्या या बरळण्यामधून '**बालादपि सुभाषितं ग्राह्यं**' या विद्वत्सज्जनमान्य अमोलिक वचना-प्रमाणें जेवढें घेतां येईल तेवढें घ्यावें. शिवाय, कुत्र्याच्या कंटाळवाण्या भुंकण्यांत सुद्धा, जर नीट विचाराचा निच्छिद्र पोहरा, जागरूकतेच्या बळकट दोराच्या सहा-य्यानें सोडल्यास, कांहीं तरी अर्थ हातास लागतो, तर त्याच मार्गाचा अमल

अवलंब केल्यास आमच्यासारख्या बुद्धियुक्त मानवी प्राण्याच्या बरळण्यांतून कांहींच निघावयाचें नाहीं, असें कधीं तरी होईल काय ? असो.

आयुष्यांतील रंगेल व मोहक काळा ! तू कोवळया प्राण्यांच्या भ्रामक मताला किती तरी फसवितोस ! तुझी गांठ पडण्याचा उशीर कीं, तुझ्या बेलगामी वृत्तिला सात्विकतेचा सुंदर लगाम लावून कर्तृत्वाच्या कर्तबगारीनें कीर्तिसुंदरीला आपली सदाची सहचारिणी करावयाची वगैरे मनोराज्यांतील अढळ निश्चय, केवळ तुझ्या सुंदर स्वरूपास मोहून, किती तरी बालकें करितात ! पण तुझी गांठ पडण्याचा अवकाश कीं, तुझ्या त्या चंचल, बेमुर्वत, कांगावखोर आणि रंगेल वृत्तिनें, त्यांच्या त्या अढळ निश्चयाला कित्येकदां कायमचें खग्रास ग्रहण लागतें. पण लक्षांत ठेव ! तुझ्या वृत्तिचा इतकाहि पराक्रम असला तरी, त्या पराक्रमावर पराक्रम गाजविणारे कांहीं अद्वितीय योद्धे, विश्वकर्म्याच्या मृत्युलोकांतहि आहेतच. तसे जर नसते तर तुझ्या आत्मश्लाघी, गर्विष्ठ वृत्तिनें जगांत केवढा धांगडधिंगा घातला असतां ! परंतु एकट्याचीच अनियंत्रित सत्ता पूर्ण अबाधितपणें जगांत केव्हांहि चालू द्यावयाची नाहीं, ( कारण तीमुळें जगाचे राई राई एवढें तुकडे केव्हां होतील याचा नेम नाहीं. ) असा जगत्पित्याचा सर्व कल्याणकारक संकल्प असल्यामुळेंच, तो कधीं शेरास सव्वाशेर उभा करतो, तर कधीं, पूर्ण अबाधितपणें चालणाऱ्या अनियंत्रित सत्तेनें पिळून निघणाऱ्यांच्या मनांत स्वतःच्या स्थितीबद्दल कंटाळा, किळस, तिटकारा आणि शिसारी उत्पन्न करून त्यांच्याकडूनच त्या अहंमन्य सत्ताधाऱ्यांवर मात करवितो. कित्येकदां तर असें आढळतें कीं, आपली त्रिकालाबाधित भासणारी अनियंत्रित सत्ता, एकादा घमेंडानंदन सत्ताधारी, प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नास लागतो तोंच त्याची पाठ सपशेल भुईला लागते, आणि मग तो, पूर्वीं कनिष्ट समजलेल्या, परंतु कृतिनें आपला वरिष्ठपणा सिद्ध करून दाखविणाऱ्याच्याच तंत्रानें आणि मर्जीनें आपल्या कृतिचें प्रत्येक पान हलवितो. स्वबलाचा आणि स्वपराक्रमाचा नसता टेंभा मिरविणाऱ्या घमेंडखोर तारुण्या ! तुझी गोष्ट अशीच नाहीं कां ? क्षणमात्र टिकणाऱ्या आनंदाच्यां झकपक पोशाखावर आणि सुंदर स्वरूपावर प्राण्याला झुलवून त्याच्यावर खुषींचा जुलूम मी किती सफाईनें करितों अशी पोकळ बढाई मारित मारित, किडलेल्या

डौलानें हातीं वर काढून तूं चालत असतोस तोंच तुझ्यावर खूप ताण करणारा आणि आपलं उग्र स्वरूप स्पष्ट स्पष्ट दाखविणारा वृद्धपणा क्रमाक्रमानें तुझ्या उरावर बसून तुझी आणि तुझ्याशीं निकट संबंध असलेल्या प्रत्येक गोष्टीची स्वर्गांत रवानगी करून, अगोदरच तुझ्या काटेरी चरकांतून सतावून निघालेल्या प्राण्याचा शक्य तितक्या लवकर सुकरतेनें बळी घेतो. परमेश्वरानें प्राण्यास दिलेला जन्माचा मित्र जो सुविचार, त्याच्या शुद्ध शिकवणीनें प्राणी जागृत झाल्यावर—नव्हे शुद्धिवर आल्यावर, तो तुला शक्य तितकें आपले कैचींत पकडत नाहीं काय ? आणि कित्येक प्राणी तुला असेहि भेटतात ना, कीं जे तुझी गांठ पडल्याबरोबर, पुढच्यास ठेच मागचा शहाणा या न्यायानें दुसऱ्याच्या कटु अनुभवानें दिलेली सावधपणाची वेसण, तुझ्या नाकांत घालून तुला पूर्णपणें आपल्या कह्यांत व दराऱ्यांत ठेवतात ? श्रीकृष्णासारख्यांनीं तुला वेसण घालून आपल्या वचकांत ठेवल्यामुळें, तुझ्या स्वातंत्र्याच्या जन्मसिद्ध हक्काची निष्कारण पायमल्ली होते, अशी तक्रार करतोस काय ? पण तुझ्या विनाशक स्वातंत्र्यरक्षणानें सगळ्या जगाला घोंगड्यावर काढण्याची पाळी परमेश्वरास येईल त्याची वाट काय ? तें कांहीं नाहीं, जगाचें कोटकल्याण करण्याकरितां, परमेश्वरानें केलें आहे, तेंच ठीक आहे. तुझ्या नाकांत सावधपणाची सुरेख, बळकट, खंबीर आणि रंग लावणारी वेसण घालून तुला सदिच्छांच्या दारोदार फिरवून त्यांची तृप्ति करावयास श्रीकृष्णासारख्यांस परमेश्वरी प्रेरणा होते तेंच बरोबर आहे. तशी झाली नसती आणि तुझ्यावर उपरिनिर्दिष्ट दाबामारखा दाब किंवा भीति नसती, तर तूं जगाच्या अर्ध्याच काय पण सगळ्याच गोंवऱ्या गंगेवर केव्हांच नेल्या असत्यास ! थांब, तुझी चांगलीच फटफजिती झाली पाहिजे. श्रीकृष्णासारख्या थोर विभूतींच्या पवित्र चरित्राच्या कुशल कथनानें लेखनपटु चरित्रकार यापुढे दिवसेंदिवस तुझा अधिकाधिकच हुर्यो उडवतील यांत शंका नाहीं.

+ + +

" बाल्यावस्था जननी आयुष्याची पुढील " ही उक्ति जितकी खरी आहे तितकेंच हेंहि खरें आहे कीं, ती उक्ति खोटी आहे. ज्यांचं बालपण केवळ निष्फळ उनाडक्या करण्यांत गेलें, तेंच माणस, पश्चात्तापाचें चरचरीत अंजन

मिळाल्यामुळें, जगाच्या अलंकारांपैकीं एकादा किरकोळ अलंकार तरी होऊन बसतात ना? किंवा उलटपक्षीं, ज्यांचें बालपण म्हणजे सदाचार, सद्गुण, सत्य आणि सात्विक सामर्थ्य यांचें प्रेमळ माहेरघर, तेच तारुण्याच्या ऐनभरांत अहं-पणाच्या मदानें धुंद होऊन, जगाच्या तोंडावरील ठळक डागांपैकीं एक होऊन बसलेले पाहतोंच कीं नाहीं? तात्पर्य, मनुष्याच्या तारुण्याचा प्रवाह कोणत्या दिशेनें व किती जोरानें वहात आहे किंवा होता हें नीट निरखिलें असतां त्याच्या किंमतीचें अनुमान काढण्यास फारशी अडचण पडत नाहीं. आयुर्नाट-काचा ऐन रंग व खरा मजा, दुसऱ्या म्हणजे तारुण्यांकांतच असलेमुळें, बाल्यां-कापेक्षां तारुण्यांकाचेंच सूक्ष्म अवलोकन केलें असतां, जगाच्या रंगभूमीवर त्या प्राण्यानें आपली भूमिका कशी काय वठवली हें नीट समजेल. आणि म्हणूनच श्रीकृष्णाचे जीविताच्या दुसऱ्या अंकांतलि प्रवेश सविस्तर माहित असणें जरूर आहे. पहिल्याच प्रवेशाला आरंभ किती चटकदार, मोहक आणि चित्ताकर्षक रीतीनें झाला आहे पहा!

नारायण नगरींत रा. दत्तोपंत साठे यांचे येथें श्रीकृष्ण आपल्या प्रिय सहाध्यायां-सह आवडत्या कमलेला घेऊन आल्यावर कालपुरुषानें आपल्या डोळ्यांची तिसरी उघड झाप संपविली होती. चवथीला आरंभ होण्याच्या सुमारास श्रीकृष्ण आपल्या सोबत्यांसह फिरावयास गेला होता. आकाशाच्या अफाट आवारांत स्वैर संचार करून आपल्या बाल लीलांनीं पूर्वेचें समाधान आणि कौतुक यांना भरती आणणारा तिचा दुसरा प्राण तमःशत्रु आपल्या आईजवळून दुडु दुडु उड्या मारीत हातभर अंतरावर आला होता. अशा वेळीं फिरून परत येणाऱ्या त्या सहा व्यक्तीस रस्त्याच्या बाजूस जवळच असणाऱ्या एका विहिरींतलि पाणी खूप वर उसवल्याचें आढळून आलें. तेव्हां कांहीं भीतीनें, कांहीं कौतुकानें, कांहीं कर्तव्यबुद्धिनें तो तांडा, तो प्रकार काय आहे हें पाहण्यासाठीं, त्या विहि-रीकडे लगबगीनें, निमिषमात्रांत गेला. पाहतात तों एक काळजीनें कृश झालेली, चिंतेनें चिरडलेली, आणि संतापानें सतावलेली अशी निस्तेजमुख बालिका विही-रींत अस्ताव्यस्त पडलेली त्यांना दिसली. कशाचाहि विचार न करतां, अंगाव-रचे कपडे फेंकून देऊन, श्रीकृष्णानें विहिरींत उडी ठोकली; आणि डोळ्याचें पातें

लवतें न लवतें तोंच त्या बालिकेला त्यानें वर देखील आणली. माहित असलेल्या तुटपुंज्या ज्ञानानें त्यांनीं तिला शुद्धिवर आणण्याचा प्रयत्न केला. अर्धमुर्धं यशहि पण आलें. लागलीच साठे यांनीं गांवांत धूम ठोकली. डॉक्टरांस घेऊन ते परत येईपर्यंत अवघा पांच मिनिटांचाच अवधि कायमचा अदृश्य झाला. तितक्या वेळांत त्या अर्धवट सावध झालेल्या बालिकेच्या तोंडून सहजासहजीं असावधपणें जे तुटक उद्गार आले, त्यांची सरळ साखळी जोडून आम्हीं ते देत आहोंत. कारण त्यायोगें बरेंच कार्य होणार आहे.

" देवा ! तूं अनाथांचा नाथ ना ? त्रासलेल्यांचें त्राण ना ? मग तुला माझी दया कां नाहीं येत ? काळाच्या वाहत्या प्रवाहाला दुष्ट दुर्दैवानें बिकट परिस्थिती. तीचा अपरंपार पूर येऊन त्यांत माझी सरळमनाची आई आणि माझे उदार मनाचे बाबा वाहून गेल्यामुळें, आईच्या निष्काम प्रेमाचा आणि बाबांच्या पितृ-वात्सल्याचा, माझ्या भोंवतीचा निर्भेद्य तट जमीनदोस्त झाला आणि त्यामुळें होत असलेले माझे हाल कुत्रासुद्धां खाईना. यासाठीं या एकांतांतील विहिरीच्या शांत आणि खोल उदराचा आश्रय करून, मिळेल तेवढा व मिळेल तसला वायु भक्षण करीत, सुखदुःखाचे उन्हाळे पावसाळे कुरकुर न करितां सहन करून तुझी करुणामय मूर्ति डोळ्यांपुढें ठेवून तिचें निष्काम ध्यान आणि निर्मल चिंतन करीत रहाणाऱ्या पाण्याचा कायमचा आश्रय करण्याचें मीं बेधडक धाडस केलें, तरीसुद्धां; त्या आश्रयाला मला मुकविण्याकरितां तूं अशी व्यवस्था केलीस! देवा, जेथें मला कुणी खेटर देखील पुसत नाहीं, त्या जगांत मीं वावरण म्हणजे खायला काळ आणि भुईला भारच नाहीं कां ? देवा ! माझी आई आणि बाबा होते त्यावेळीं मीं बांधलेले बेत, वाळुच्या भुसभुशीत पायावर बांधले गेले होते, असें प्रत्यक्ष अनुभवानें माझ्या प्रत्ययाला आणिलें. देवा ! आकाशाची कुऱ्हाड माझ्या डोक्यांत पडल्यामुळें मला झालेली भयप्रद खोल जखम जर कुणाच्याच, आमच्या शेजाऱ्यांच्या, आमच्या आप्तेष्टांच्या, बाबांच्या गळ्यांत गळे घालणाऱ्या त्यांच्या मित्रांच्या, हृदयाला करुणेचा कालवा, दयेचा पाझर, नव्हे सहानुभूतिचा ओलावाहि फोडण्यास समर्थ होत नाहीं, तर देवा ! या जगाच्या कांटेरी कुंपणावर मला तळमळत ठेवण्यांत तुझा हेतु कोणता ? देवा ! माझ्या आईच्या

उपकारांनीं वाकलेले आणि बाबांच्या उदार मनाच्या हितप्रद मोकळेपणानें कल्पांतापर्यंत बांधलेले लोकसुद्धां चांभाराच्या देवाला योग्य अशी माझी पूजा व संभावित संभावना करतात, तर तूंच सांग, असल्या दुःखांच्या खाईंत मला जळत ठेवण्यांत तुझी चूक नाही कां होत ? तुम्हीं कोण ? यमदूतांपेक्षांहि यमदूत, नव्हे कृतांतापेक्षांहि कृतांत अशा क्रूर प्राण्यांनो ! तुम्ही कोण ? संतसमागमाला मगरमिठी मारून करुणासागराकडे सुरक्षितपणें जाण्याची मी चोख व्यवस्था लावित असतां सैतानाच्या विश्वासु आणि आज्ञाधारक शिशाचांनो ! तुम्हीं कामगिरी चोख बजावून सैतानांकडून शाबासकी मिळविलात खरी; पण तुमच्या या शाबासकीची राखरांगोळी माझ्या तळमळणाऱ्या आत्म्याच्या तळतळाटानें व्हावयाची नाहीं कां ? पण तुम्हांला तितका विचार कुठला ? सैतानाच्या शिष्यांना, सैतानाच्या दूतांना, सैतानाच्या अनुयायांना, अंतरबाह्य सुविचारानें व्यापून टाकल्यावर त्यांचें सैतानत्व जळून जाऊन त्याच्या राखतून देवपणा उत्पन्न होतो. तुमच्या नशिबाला देवपणाचा दूरचाहि वासच जर खपत नाहीं, तर तुम्हांला या गोष्टी बोलून तरी काय फायदा ? आई ! तुझें तें हृदयाला चटका लावणारें आणि मनाला चरके देणारं स्वप्न खरं ठरलें ग ठरलें. तुला कडकडून भेटण्याकरितां, तुझ्या वत्सलतेच्या प्रेमळ मांडीवर सुखानें शयन करण्याकरितां; तुझ्या स्वर्गीय सान्निध्याच्या अमृताचे निस्य घुटके घेण्याकरितां, मी यावयास निघालें, तोंच या विघ्नसंतोष्यांनीं त्याला मोडता घातला."

डॉ० रोगमुक्त्यांच्या निपुण कौशल्याच्या चमत्कृतिजन्य कांडीनें सर्व स्थिति ताळ्यावर आली. कमलेच्या कोकिल कूजत सांत्वनपर शब्दांनीं आणि श्रीकृष्णाच्या प्रेमळ, गंभीर, शांत व समाधानकारक विनयी सहानुभूतीनें, चडांशूच्या प्रकाशांत अकशीचा इंदु जरी म्लान व दुर्मुखलेला दिसत होता, तरी इंदुच्या मुखेंदूवर तेजःपुंजतेचें आणि एक प्रकारच्या दुःखांतील सुखाचे मोदजनक छटे चमकत होते. श्रीकृष्णानें सांगितलेल्या सर्व गोष्टींच्या नीट, खोल विचारानें इंदूच्या मनाची नाडी चांगली चालू लागून त्याची वान झालेली प्रकृतिहि सुधारली. तासाचा फन्ना उडविणाऱ्या, आग्रहाच्या विनंतीच्या परिणामकारक सबलतेतून आणि गत्यंतर नाहींसें करणाऱ्या निकराच्या प्रतिज्ञेच्या प्रचंड पौरुषापासून

इंदूच्या रुकाराचा जन्म झाला; आणि त्या मित्रमंडळांत आणखी एकीची भर पडली.

वरील गोष्टीनंतर, अनंताच्या आवल्या अल्लड बालिकेनें सात आठच अंगाऱ्या बिंगाऱ्या खेळल्या असतील; तोंच रा० साठ्यांच्या एका परिचिताला प्लेगनें अंथरुणास खिळलें. इतक्या धीटस्वभावाचे आणि खंबीरमनाचे साठे! पण त्याचे हात पाय गळले. अंगांस दरारून घाम सुटला, आणि किंकर्तव्यमूढतेनें ते वेडे होऊन ढळढळा रडूं लागले साठ्यांच्या अशा स्थितीनें इतरांच्याहि धीराचें पाणी झालें. पण श्रीकृष्णानें मन घट्ट करून साठ्यांच्या परिचिताची शुश्रुषा करण्याचा निश्चय केला. प्लेग हा संसर्गजन्य रोग असलेनें, त्यानें पछाडलेल्या प्राण्याच्या वाऱ्यासहि कोणीं उभें राहूं नये, असा डॉक्टरांनीं कितीहि कंठशोष करून-आरोग्यदृष्ट्या हितप्रद उपदेश केला, तरी रोग्याची काळजीपूर्वक शुश्रुषा करणा-राला तें सर्वथैव जरी नसलें तरी बरेंचसें अशक्य असतें. तथापि असल्या कुजक्या नासक्या भीतीला श्रीकृष्णासारखे लोक कधींहि भीक घालीत नसतात श्रीकृष्णाचें हृदयस्पर्शी आणि अनुकरणीय उदाहरण इंदूच्या मनावर चांगलें ठसलें, आणि तिनेंहि श्रीकृष्णांस जिवापाड मदत करण्यास कंबर कसली. सात आठ रात्रीं दिव्यानें उजाडल्या. वेळला ना अन्न, ना पाणी, ना झोंप, ना विश्रांति, अशा स्थितींत काळ जात होता. पण साठ्यांच्या परिचिताचे, त्याच्या अगणित-महात्म्य सहाय्यकांचे, आणि त्या मित्रमंडळाचे दिवस अशा चिंताग्रस्त विपन्नावस्थेंत जात असतां निर्लज्ज रजनीला आणि तिच्या त्या बेशरम नथाला शृंगार-सुख उपभोगण्यास यत्किंचितहि लाज वाटला नाहीं. परमेश्वराने असल्या बेमुर्वत निर्लज्जपणाची योग्य शिक्षा म्हणूनच चंद्राच्या पाठीमागें क्षयाचा शिसेमेरा लावला आणि ज्या दिवशीं श्रीकृष्णाच्या एक महिन्याच्या अश्रांत काळजीपूर्वक शुश्रूषेला, वैद्यांच्या औषधाच्या अजब गुणानें व परमेश्वराच्या कृपेच्या जोर महात्म्यानें, रोगमुक्ततेचीं आणि चिंतानाशाचीं मधुर व गोड फळें आलीं, त्या दिवशीं तर चंद्राला मृत्युच आला होता; आणि पश्चात्तापानें काळ्या पडलेल्या रजनीनें गयावया करून केशवाची करुणा भाकली नसती, तर तिला कल्पांता-पर्यंत वैधव्यपंकांत खितपत पडावें, लागलें असतें.

श्रीकृष्णाच्या मित्रमंडळांत विलक्षण एकी आणि आश्चर्यजनक प्रेमयुक्त सहकारिता असे, उद्योगपालट हीच विश्रांति, असें श्रीकृष्णाचें आद्य तत्त्व असलेमुळें पांच सहा तासांच्या अवश्यक निद्रे शिवाय त्याचा बाकीचा सर्व वेळ कामानें व उद्योगानें खेंचून बांधलेला असे. त्याच्या नमुनेदार वर्तणुकीची शाश्वत छाप दुसऱ्यावर पडत असल्यामुळें ज्याचा ज्याचा त्याच्याशीं प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष संबंध येत असे, तें तें माणूस त्याचा कित्ता गिरविण्याचा कमालीचा अट्टाहास करी. मग त्या खुद्द मित्रमंडळांत, तोंडांत बोटें घालावयास लाधणारी चढाओढ चालली असल्यास नवल काय? श्रीकृष्णाच्या अंगीं वृद्धाचा पोक्त विचार, तरुणाची तरतरी आणि बालकाची चलाखी यांचा सुंदर मिलाफ झाला असल्याकारणानें, तो करील ती गोष्ट अल्पकाळांत इतक्या सफाईनें आणि इतक्या सहज होई कीं ती गोष्ट करण्याचा त्याचा मानस होता अशी काल्पनिक शंकाहि कोणाला येत नसे. श्रीकृष्ण म्हणेल तें वेदवाक्य, श्रीकृष्ण सांगेल ती धर्माज्ञा, श्रीकृष्ण म्हणजे देव, अशी भावना त्याच्या मित्रांच्या, त्याच्या आप्तेष्टांच्या, त्याच्या भोंवतींच्या लोकांच्या स्फटिकवत् स्वच्छ अशा मनाच्या अंतरिक्षावर सारखी चमकत राहण्याचें खरें, खात्रीलायक कारण त्या भावनेचा तेजःपुंज आत्मा, खऱ्याखुऱ्या वस्तुस्थिति व्यतिरिक्त नव्हता हेंच होय. श्रीकृष्णाची उपहासात्मक निंदा म्हणजे परमेश्वराची निंदा सगळ्याबरोबर इंदुला विशेष वाटे. एका चांदण्या रात्रीं शिळोप्याच्या विनोदयुक्त गंभीर गप्पा चालल्या असतां, श्रीकृष्णास थट्टेच्या स्वरानें कमला म्हणाली, 'दादा, फुरसतीच्या रिकामटेकड्या वेळीं सुद्धां तुला गंभीर विषयाशिवाय दुसरा करमणूकीचा विषयच कसा सुचत नाहीं? जेव्हां बघावें तेव्हां, चहाचा नायनाट कसा होईल, मदिरापानाला आळा कसा पडेल, धूम्रपानाला आग कशी लावतां येईल, देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत शिक्षणप्रसार करायला कोणतें यंत्र आणावें, देशी उद्योग धंद्यांची अनिष्ट खुंट समुद्रास्तृप्यंतु केव्हां होईल, भिकारी वर्ग कसा कमी होईल, कशाचा ना कशाचा तरी कांथ्याकूट चाललेला असायचा. कधीं करमणूकीचा विषय असेल तर शपथ! असल्या गंभीर विषयाची तास तास, डोकीं खा-खाजवून चर्चा

केल्यानें जसे कांहीं आपण आतां महाराष्ट्रतिलक शिवाजीमहाराजच बनणार आहांत कीं नाहीं? ' एवढ्यावरून इंदुला केवढा घुस्सा आला! विवेक बुद्धिचें कांहीं एक न चालता ती एकदम उद्गारली—

" कमलाताई, मनुष्यानें विचार करून बोलावें. " संतापाच्या फाजील अतिरेकानें लालबुंद झालेल्या इंदुला जास्त बोलवेना; तिचे ओठ थरथर कापूं लागले आणि कमलेला खाऊं कीं गिळूं असें होऊन गेलें. सर्व प्रकारची न्याहाळून तपासणी एका सेकंदांत करतांच श्रीकृष्ण म्हणाला, " कमलाताई जास्त बोलूं नको; शब्दांनीं शब्द वाढतो आणि एकीची बेकी होते. तूं थट्टेनें म्हणालीस तें खोटें नाहीं. आणि थट्टेंत असत्याचा प्रवेशहि होऊं न दिल्यामुळें मला द्विगुणित समाधान होत आहे. तूं म्हणतेस त्याप्रमाणें मी बोललों त्याशिवाय करमणुकीचा विषयच आढळत नाहीं; त्याला माझा नाइलाज आहे. आवडत्या विषयाच्या काथ्याकुटानेंहि करमणूक होते. मला ज्या विषयांची गोडी आहे त्यांत सर्वांना गोडी लागतेच असा नियम नाहीं, आणि ती तशी लागावी असेंहि माझें म्हणणें नाहीं. आतां मी आपल्या आवडीच्या गोष्टी बोलून किंवा करून शिवाजीमहाराज होणार नाहींच, आणि सगळेच जर शिवाजी होऊं लागले, तर शिवाजीला तरी महत्त्व कसचें? मी ज्या गोष्टी बोलतों अगर करतों त्यांची कड माझ्या एकट्याकडून लागणें अशक्य आहे. पण माझ्या एकट्याच्या हातून काय होणार आहे असें रें रें करीत बसणें मला खपत नाहीं. मी आरंभ केला तर दुसरा मदत करील. अगदींच कांहीं न करण्यापेक्षां अर्धवट केलेलें काम पुष्कळ बरें. असो. इंदुताई! माझ्या आवडीशी तुमची आणि साठ्यांच्या परिचितांची आवड पूर्ण तादात्म्य पावते, हें मी जाणून आहें. तथापि आपल्या विवेकपूर्ण आवडीनिवडीबद्दल लोक उपहासात्मक बोलतात याबद्दल वाईट वाटून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. " इतक्यांत आठाचे ठोके पडले, आणि सर्व मंडळी आपापल्या उद्योगास गेली.

\+ \+ \+ \+

दुसरे दिवशीं सकाळीं सहा वाजतां श्रीकृष्ण स्नान वगैरे आटोपून कपडे करून बाहेर पडला. त्याला जातांना बहुतेकांनीं पाहिलें होतें; पण कोणी

त्याजबरोबर गेलें नाहीं. किंवा कांहीं नाहीं. दोनप्रहरची जेवावयाची वेळ टळून गेली तरी त्याचा पत्ता नाहीं. कोणास अन्न गोड लागल नाहीं. इंदु आणि कमला तर नुसत्या पान उष्टावूनच उठल्या. श्रीकृष्णाची काळजी सर्वांस लागली. प्रत्येकाच्या मनांत शंका कुशंकाचें भयंकर काहूर उठूं लागल. रोज केव्हांच्या केव्हांच दडी देणारे तास आज दिवसाहूनहि मोठे आणि कंटाळवाणे भासूं लागले. आज सगळ्या सृष्टातहि तसाच फेरबदल दिसत होता. सायंकाळच्या रमणीय व शांत वेळीं पश्चिमेच्या लुसलुशीत गालावरील न्याहार गुलाबी छटा मावळून तिच्या जागीं दुःखमिश्रित रंगाचा रक्तपणा आ पसरून बसला होता. पूर्वेकडून वर येणाऱ्या चंद्राच्या शीतल किरणांतील रोजचें अमृत हालाहल विष बनलें होतें. नाजुक गुलाबाच्या मनोहर सुवासाची जागा नरकाच्या कुजक्या घाणीनें व्यापली होती. नदीच्या शांत प्रवाहावरून वाहणारा मंद, शीतल वायु इंगळ्याप्रमाणें अंगास झोंबत होता. स्वतःचा पूर्ण विसर पाडणारें कोकिलेचें कूजित गाढवाच्या ओरडण्याहूनहि कर्कश लागत होतें. आत्मस्वरूपांत तल्लीन करून सोडणाऱ्या निद्रा देवीला देखील, चिंतेनें हद्दपार केलें होतें. अभ्यासांत किंवा इतर वाचनांत लागणाऱ्या गोडीला ग्रहण लागलें होतें. तासा पाठीमागें तास मुकाट्यानें आपला रस्ता सुधारत होते. श्रीकृष्णाच्या मित्रमंडळापैकीं प्रत्येक व्यक्तीस जीवित नकोसें होऊन, चिंतेनें एकटेंच तडफडत बसवें लागलें. अशा स्थितींत कोंबडा आरवला आणि कमलेच्या दारावर एकाएकीं हलकी थाप ऐकूं आली. यावेळीं कमलेच्या मनाची जी विलक्षण चलबिचल आणि आश्चर्यकारक तारांबळ उडाली तिचें वर्णन करणें आमच्या लेखणीच्या आटोक्याबाहेर आहे. मनाचा धडा करून तिनें दार खोललें, आणि काय असेल तें असो, एकदम न थांबतां तिनें त्या आलेल्या व्यक्तीच्या कमरेस मिठी मारिली, आणि तिच्या डोळ्यांत एकदम आनंदाश्रु चमकले. आलेली व्यक्ति विशेष न बोलतां झोंपी गेली. कमलेलाहि एक प्रकारचें सुख व समाधान वाटूं लागलें. आणि आपल्या सुखाचे भागीदार सर्वांना करावें असा तिचा विचार होता. पण त्या व्यक्तीनें सांगितल्याकारणानें तो तिला मनांतल्या मनांत दाबून ठेवावा लागला. कांहीं

वेळानें ती स्वत: झोंपी गेली. सूर्योदयाबरोबर सगळ्यांचे नित्य क्रमास पुन: दु:खी कष्टी सुरवात झाली. एकामागून एक अशीं मिनिटंच्या मिनिटें भराभर अदृश्यतेंत उड्या घेऊं लागली. चांगला कासराभर दिवस वर आला. अद्यापि देखील कमला उठली नाहीं हे पाहून कित्येकांस आश्चर्य वाटलें, पण तिला हांक मारण्यास कोणी धजावले नाहीं. निद्रावश झालेल्या कमललाहि उठण्याचें भान नव्हतें. ती आलेली व्यक्तीहि निद्रादेवीच्या स्वरूपांत तन्मय झाली होती. वाचकहो! ओळखा, ती व्यक्ति कोण हें बरोबर ओळखा, आणि सांगा तिचें नांव.

होय. बरोबर, अगदीं बरोबर. तीच ती व्यक्ति. जिनें आपल्या अमोलिक आयुष्याच्या भरपेठ चोवीस तासांस योग्य कारणीं लाविलें, तीच ती व्यक्ति. बाल परमेश्वरानें उदयाचलाच्या पाठीमागें उभें राहून अंतरिक्षांत उडवून दिलेला, डोळे दिपविणारा प्रकाशाचा देदिप्यमान चेंडू अस्ताचलाच्या पलिकडे पडेपर्यंत, ज्या व्यक्तीनें आपल्या निरक्षर बांधवाच्या घरीं जाऊन, त्यांची माननीय मनोधरणी करून, त्यांच्या पुढ पदर पसरून, भीक मागून, पाया पडून, चार सुविचाराच्या गोष्टी सांगून, आठ दहा बाल बांधव पैदा केले, तीच ती व्यक्ति. आकाशिच्या सुबक छताला लावलेलीं निरनिराळीं दिव्य झुंबरें आणि तऱ्हेतऱ्हेचे चित्ताकर्षक व विस्मयवर्धक दिवे, आपल्या नित्य प्रकाशाच्या तेजस्वी दिमाखानें तळपावयास लागल्यापासून घड्याळांतील मिनिट काट्यानें दोन भरपूर चक्रा मारीपर्यंत, देशांतील नकट्या निरक्षरतेला पुरी पदभ्रष्ट करणें, किंवा तिच्या सिंहासनाच्या भरभक्कम पायाचा मुख्य आधारभूत दगड काढून तें चंचल मनाच्या चंचलतेपेक्षांहि अधिक डळमळीत करणें, निदान त्या दिशेनें प्रामाणिक प्रयत्नांचा प्रचंड प्रवाह वाहविणें, किती जरूर निकडीचें, किती विचारयोग्य जबाबदारीचें, किती हितजनक अवश्यकतेचें, खऱ्या सुशिक्षितांचेंच नव्हें, तर सुशिक्षित म्हणून म्हणविणारांचें व मिरविणारांचेंहि आद्य कर्तव्य आहे, हें साऱ्यांच्या परिचिताचे मनावर पूर्णपणें बिंबवून, त्याच्याकडून या कार्याकरितां, कशाचीहि फिकीर न करितां, कवडीच्याहि काचकुचीशिवाय तन-मन-धन खर्चण्याची सर्वस्वी अभिनंदनीय अढळ प्रतिज्ञा ज्या व्यक्तिनें कर-

बिली तीच ती व्यक्ति. त्यानंतर आवरकाटा सात आठ बडी घरें पुजीपर्यंत ज्या व्यक्तिनें, आकाशाच्या मोकळ्या अंगणांत जगाच्या आरंभापासून चाललेल्या पाठ शिवणीच्या डावांत आपणावर मोठ्या ऐटीनें राज्य घेऊन चंद्र, तारे, रजनी वगैरेंना धरण्याची व्यर्थ धडपड करणारा सूर्य उदयाचलाच्या भोंग्यापासून पळत येऊन अस्ताचलाच्या खोल दऱ्याखोऱ्यांत प्रवेश करीपर्यंत, जीं माणसें अंत:करणास घरें पाडणारें शब्द आणि दारिद्य जगाच्या पुढें केविलवाण्या तोंडानें ठेवतात, त्यांची खरी स्थिति कशी आहे हें पाहण्याचें चोख काम उरकिलें, तीच ती व्यक्ति. जगांतील सर्व थोर महात्म्यांइतकें जगाचें कार्य ‘ जनसेवा ती ईश्वरसेवा ’ या उक्तीप्रमाणें तंतोतंत करून नामशेष होण्याची नव्हे नांवासुद्धां नाहींसें होण्याची अवर्णनीय अतुल महत्त्वकांक्षा ज्या व्यक्तिनें अगदीं आरंभापासून धरली होती तीच ती व्यक्ति. आणि एवढ्याच सबळ कारणामुळें जिला श्रीयुत महत्त्वाकांक्षी म्हणून गौरवानें संबोधण्यांत आम्हीं योग्य अभिमान बाळगिला व बाळगितों तीच तीच व्यक्ति.

\+ \+ \+ \+

प्राणाच्या प्यान्यानें केलेल्या असह्य अबोल्याच्या अनपेक्षित शिक्षेनें कढी किती ताबडतोब पातळ होतें हें ज्यास तसला कटु व बेचव अनुभव आला असेल त्यासच माहित. इतरास त्याची कल्पना काय ? अकरा वाजतां उठल्यापासून दोनप्रहरीं दोन वाजेपर्यंत श्रीकृष्ण व कमला आपल्याच व्यवसायांत चूर असल्यामुळें, त्यांच्या संवगड्यांस, काल्पनिक कां होईना, असह्य अबोल्याची जी अनपेक्षित शिक्षा झाली तिच्या योगानें त्यांची जी चमत्कारिक वर्णनबाह्य स्थिति झाली तिची बरोबर कल्पना तंतोतंत मापण्याचें काम आम्ही अनुभविक वाचकांचे तरतरीत कौशल्यावरच सोंपविण्याचें साहसी धाडस करितों.

तासानुतास उत्कंठेनें वाट पहाणाऱ्या तृषार्त चातकाला उदार कृष्णमेघाच्या पुण्य प्रसादानें होणारें स्वर्गसुख, श्रीकृष्णाच्या विस्मयवर्धक, कुतूहलकारक आणि हेवाजनक आत्मेतिहासाच्या सुबोध कथनानें जीवास कंटाळलेल्या त्याच्या सख्यांस व गड्यांस झालें असल्यास नवल काय ? श्रीकृष्णाच्या निश्चयाचा

बाणेदार ओजस्वीपणा त्याच्या सहचरांच्या अंतःकरणास खोलपर्यंत भिडला आणि त्यानें स्वतःच्या सहज सामर्थ्यानें त्या सर्वांची श्रीकृष्णाच्या पावलावर पाऊल टाकण्याबद्दल प्रेमानें व कळकळयाच्या सहानुभूतिनें इथून तेथून ओथंबलेली अनुमति खेंचून आणली. त्या दिवसाच्या शुभ मुहूर्तानें दररोज रात्रीं आठ ते दहा हें मित्रमंडळ एक वर्ग चालवूं लागलें. त्या वर्गाचें स्पृहणीय आणि थक्क करणारें रूपांतर आतां एका सुप्रसिद्ध विद्यालयांत झालें आहे.

\+ + + +

या तिमाहीचा शेवटचा दिवस म्हणजे श्रीकृष्णाच्या चमत्कृतिपूर्ण चरित्रांतील सोनेरी अक्षरांनीं लिहिण्यासारखा दिवस होय. या अपूर्व दिवशीं त्यानें जो निश्चय केला त्याचें महात्म्य कांहीं और आहे. यापुढें कसल्याहि जनदृष्ट्या उच्च परिस्थितीनें कितीहि अनुपम अनुकुलतेच्या गगनभेदी उत्तुंग शिखरावर आपणांस चढविलें तरी आपण आपली राहणी साधेपणाच्या सपाट व सफाईदार सुरक्षिततेवरून कधींहि हलवणार नाहीं असा निश्चय श्रीकृष्णानें त्या दिवशीं केला आणि आपल्या स्वास्थ्ययुक्त करारीपणानें ' निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंचि फळ ' ही उक्ती सार्थ करून दाखविली, म्हणूनच आम्हांस त्या दिवसाचे इतके गोडवे गावेसे वाटतात.

नारायण नगरीस येऊन कालपुरुषाच्या एका दिवसाचा तिसरा भाग देखील पुरता पळून गेला नव्हता, इतक्यांत दुष्ट दुर्दैवाच्या दुस्मानी चरकांत दादासाहेबांचें सर्व कुटुंबच्या कुटुंब चिरडलें गेलें. त्या कुटुंबाच्या सतत टिकणाऱ्या निर्मळ प्रेमानें श्रीकृष्णास दादासाहेबांच्या मोकळया व निर्जन पण सामर्थ्यवंत स्थावर जंगम मिळकतीचा बिन तक्रार मालक केलें. अशा स्थितींत एकादा आपल्याच तोऱ्यांत ग चा पाढा वाचावयाचा! पण, साधेपणाच्या सुरक्षित व खरखरीत घोंगडीवरून उठून, भपक्याच्या डळमळीत पलंगावरील खोटेपणाच्या मृदु शय्येवर मनुष्याची राहणी आपलें ठाणे ठेवूं लागली कीं, त्याचे विचार सात्विकतेच्या स्वर्गीय व सुंदर सिंहासनावरून घाण गर्तेत भराभर उड्या घेऊं लागतात. या जगाच्या आजपर्यंतच्या अमूल्य अनुभवाचा अचुक अभ्यास श्रीकृष्णानें सांगोपांग केला असल्यामुळें, त्यानें आपली साधी राहणी

नी उच्च विचारसरणी कायम राखली, आणि दाहासाहेबांच्या सर्व संपत्तीचा विनियोग त्यानें आपल्या मंगल मातोश्रीच्या उज्ज्वल उपदेशाप्रमाणे 'स्वदेशी उद्योग उत्तेजक मंडळा' कडे केला.

एके शनिवारीं सकाळीं श्रीकृष्ण सहल यरण्यास गेला असतां नदीच्या कांठावरील निसर्ग देवीच्या निवांत निवासस्थान जवळ आला. गवताच्या हिरण्यागार गालिच्यावर पसरलेले दंव चे स्फटिकवत् स्वच्छ मोती बालसूर्याच्या काव्यमय कोमल किरणांनीं लखलखल्यामुळें तिकडे सहज नजर फेकणारा अरसिकहि क्षणभर गुंग होऊन जाई. मंद वायुच्या शीतल लहरीने धरलेल्या चित्तवेधक, तानेबरोबर, निरनिराळ्या रंगांचीं आणि तऱ्हेतऱ्हेचीं वन्य लेणीं लेवून आपल्या नकरेबाज नाचाची झाक तान लावणाऱ्या बालवृक्षांची मंजुळ गीते ऐकल्यावर जगांतील कोणता प्राणीं करुणेशाच्या कल्याणकारक आणि काव्यजनक कृतिचें कैतुकमय अवलोकन करण्यांत धन्यता मानणार नाहीं? मग श्रीकृष्णास त्या देखाव्य नें वेड लागलें असल्यास नवल काय? लक्ष्मीललामाच्या लीलेंत लीन झालेल्या श्रीकृष्णाची गाढ समाधे उतरण्याच्या आरंभाला होती इतक्यांत प्रभाकराची स्वारी एकदम आली, आणि तिनें श्रीकृष्णाचे पाय घट्ट धरिले. त्यासरसा श्रीकृष्ण एकदम खाडकन जागा होऊन बुचकळ्यांत पडला. कां तुम्हीं कां बुचकळ्यांत पडला? प्रभाकरानें आपले पाय धरण्याचें कारण काय? त्याच्याकडून आपला असा अपराध तरी काय घडला आहे, किंवा त्याच्यावर असें संकट कोणतें आलें आहे कीं, आपला आसरा शोधल्याशिवाय त्याला दुसरा मार्गच असूं नये, वगैरे गोष्टींचें गूढ श्रीकृष्णास पडल्यामुळें तो बुचकळ्यांत पडला हें ठीक झाले; पण वाचक हो, तुम्हीं कां बुचकळ्यांत पडलां? पण हो, तुम्हांला असा प्रश्न करणें म्हणजे आपल्या अज्ञानाची सव्वालाखाची झाकली मूठ उघडी करून जगाच्या बत्तिशीला उघड्या ओठांच्या हास्यमय खिडकींतून आपलें प्रदर्शन करावयास लावणेंच होईल. बाकी, प्रभाकराची ओळख करून दिली नाहीं. आणि आम्हीं बेधडक वरील प्रश्न विचारतों हा विरोध आमच्या लक्षांत आला. म्हणून आम्हीं आपला प्रश्न ताबडतोब माघारी घेतला. असे विरोध आणि प्रमाद आतांपर्यंत किती तरी राहून

गेले असतील आणि पुढेंहि जातील अशी गंभीर ग्वाहि आमचें मन देत असले तरी आम्हीं लिहूं घातलेलीं पान मानवी विल्यापिल्यांच्या प्रातर्विधीला अयोग्य समजलीं जातील असें वाटतें. इतकंहि झालें तरी, आमच्या कृतीस मोठाच मान मिळेल यांत शंका नाहीं !

काय ? प्रभाकर कोण याबद्दल तुमच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला म्हणतां? तर मग बोला ! बोला कोण प्रभाकर तें. हां ! तरी आम्हांला वाटलेंच कीं, तुम्हीं असा घोटाळा केला असला पाहिजे म्हणून. अहो, आपल्या जीवितसर्वस्व कमलेचें उदात्त चरित्र ' प्रभाकरप्रिया ' नांवाच्या चटकदार कादंबरीरूपानें लिहित असल्याचें सर्व वेश्रुत उघड, उघड गुपित फाजील नम्रतेच्या काळसर खोलींत काडण्याचा प्रयत्न करणारा तो प्रभाकर हा नव्हे. हा प्रभाकर, इंदूचा बंधु, साळ्यांचा परिचित आणि श्रीकृष्णाचा सहकारी. या चारी व्यक्ति एकच. तरी, ताडलेंच हांतें कीं, तुम्हीं येथें शंका कुशंका, लघुशंका, दीर्घशंका काढून आमच्यावर प्रश्नांची सारखी सरबत्ती सोडणार म्हणून. तुम्हांला काय, आजा-रांत शुश्रूषा करतांना इंदून आपल्या भावास कसें ओळखलें नाहीं हें पाहिजे काय ? पण तें सांगत बसावयास वेळ आहे कोणाला ? तुम्हांस पाहिजे अस-ल्यास इंदूस इंदुरला पत्र पाठवा, पुण्यांत प्रभाकरची गांठ घ्या, सोलापुरास साळ्यांना तार करा, कल्याणाहून कमलेला बोलवा किंवा श्रीकृष्णांस कैलासांत रिप्लाय कार्ड धाडा, काय वाटेल तें करा. आम्हीं फक्त तुम्हांस श्रीकृष्णचरित्र सांगणार आहोत. आमचें काम बरें आणि आम्हीं बरें. नसत्या उठाठेवी आम्हांस हव्या कशाला ? नसत्या उठाठेवींच्या भानगडींत आम्हीं पडलों तर आमचं सरशेल थोबाड फुटून जन्मभर कण्हत बसण्याची पाळी येईल आणि असें झालें तर श्रीकृष्णचरित्राचा आम्हीं शेवट तरी कसा लावणार ? करितां क्षमा करा आणि आम्हांस जेथें तेथें आडवूं नका.

डोकीस साधीच स्वच्छ टोपी, अंगांत साध्या पांढऱ्या सदऱ्यावर एक तसलाच कोट, सुती काठाचें साधें स्वच्छ पायघोळ धोतर आणि पायांत जोडा असा शेवटपर्यंत साधा, स्वच्छ, व्यवस्थित पोशाख ठेवून अंतरीं नाना कळांस आश्रय देऊन ' शय्या भूतल, त्यावरी भुज

उशा, दिग्वस्त्र अंगावरी ' इतक्या थाटाचें नसलें तरी, आंथरावयास एकच घोंगडी व पांघरावयास एकच पासोडी एवढ्याच थाटाचें आंथरूण पांघरूण ठेवून स्वकृतीनें देशांतील दारिद्र्यास नदीवर पोंचवीपर्यंत अनुकूल व संपन्न स्थितीतिलहि व्यक्तींनीं बेफिकिरीची कास न धरतां निवळ जरूरीच्या अनुल्लंघनीय मर्यादेबाहेर एक रतिभरहि न जाऊन सर्वतोपरी आपल्या मातृभूमीची सोत्कर्ष संपन्नता अस्तित्वांत आणण्याकरितां निर्मल निष्कामतेच्या पवित्र आणि पौरुषवंत पाठिंब्यावर तनमनधनांनीं व निढळ्या घामानें झटलें पाहिजे, असें सिद्ध करणाऱ्या सत्पुरुषानें आपल्या पायांवर एकाएकीं मस्तक ठेवून आपणांस आश्चर्यानें वेड लावणाऱ्या प्रभाकरांस उठविलें आणि प्रेमानें आपल्या उजव्या हातांत अधोमुख प्रभाकराचा उजवा हात घेऊन त्यास पायांपडण्याचें कारण विचारलें. त्यावर दीन मुद्रेनें आणि अपराध्याच्या भितऱ्या, कापऱ्या व बारीक स्वरानें प्रभाकर उद्गारला:-" माझा अपराध इतका असह्य व अक्षम्य आहे कीं, त्याबद्दल भरपूर खरपूस शिक्षा देण्याकरितां न्यायी नारायणाला किती यातायात करावी लागेल त्याचा तोच जाणे ! सत्कर्मानें मनुष्याला सात्विक सामर्थ्य प्राप्त होतें आणि असत्कर्मानें सात्त्विक सामर्थ्याचाहि प्रत्यक्ष पालट बलहीन बावळेपणाच्या विपरीत फुसकेपणांत होतो. सद्गुणांच्या न ओसरणाऱ्या गंगाजळीचा गबर धनी जें दानशूर दारिद्र्य, त्याच्या आजन्म लाभलेल्या महान मैत्रीची खोटी लाज वाटून आज तीन महिने फाटकीं धोतरें वापरण्याचें कारण बाबांकडून या मुदतींत एक कपर्दिकादेखील आली नाहीं. अशी खोटी लोणकढ थाप मारून काल संध्याकाळीं मीं आपल्या अब्रूचा बेमालूम बचाव केला. पण असा बचाव करितांना धरलेल्या खोट्याच्या कासेनें मनाला लागून राहिलेल्या विवेकाच्या टोचणीकडून तळमळून व तडफडून निघणाऱ्या अंत:करणाची शांति, प्रांजलपणें व लीनपणें मागितलेल्या उघड उघड क्षमेच्या उदरीं जन्म घेत असल्यामुळें, सात्त्विक सामर्थ्याचा ऱ्हास अधिक न व्हावा म्हणून, हा मार्ग मीं स्वीकारला.

श्रीकृष्ण:--प्रभाकरपंत, खोटें बोलल्याबद्दल तुम्हांस झालेला पवित्र पश्चात्ताप पाहिला म्हणजे या भारतवर्षांतील प्रत्येक व्यक्ति प्रभाकर कर अशी नम्र प्रार्थना निर्मल अंत:करणानें जगज्जनकाला केल्याशिवाय राहवत नाहीं. असत्य भाषण म्हणजे कांहींच नाहीं, अगदीं परड्यांतील भाजी अशी कित्येकांची तरी स्थिति

असते ! स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन राष्ट्राच्या कल्याणार्थ आपल्या हाडांची काडें करीत असल्याचा; नवकोटी नारायणत्व कस्पटासमान लेखून राष्ट्रांकरितां दरिद्रावस्थेचें कडकडीत व्रत आचरण्याचा; आपला देश जगांतील इतर देशांपेक्षां अधिक, निदान तितका तरी, सुधारलेला सुशिक्षित, नीतिमान, उद्योगशील, अनेकशास्त्रपारंगत करण्यास काया-वाचा-मनानें रात्रंदिवस एकसारखी, अव्याहत अश्रांत खटपट व मेहनत करण्याचा; राष्ट्रकल्याणाकरितां स्वार्थाला पुरा जिता मारून निस्पृहतेला आनंदानें वरण्याचा; राष्ट्रसुखालाच आपल्या जिवाचा कलिजा मानण्याचा; आणि त्याचेंच संगोपन करण्यास्तव प्रसंगीं प्राणांचीहि अचूक आहुति देण्यास यत्किंचितहि मागें पुढें न पाहण्याचा पोकळ आव, व्याख्यान पीठावर उभे राहून लांबलचक, अगम्य व मेघगर्जना करणाऱ्या शब्दांनीं घालणारें अहंमन्य नेतेहि चिमुकली झीज सोसण्याच्या प्रसंगींहि कंटाळवाणें व किळस उत्पन्न करणारें कांकूं सुरू करून कृतिनें असत्याबद्दलचा प्रामाणिक पक्षपातीपणा सूर्यप्रकाशापेक्षांहि स्पष्ट दाखवितात. मग त्यांच्या मोहक वाणीला भुलून, त्यांचे देव्हारे माजविण्यांतच जगांत जन्मल्याचें सर्वस्वीं सार्थक मानणाऱ्या सामान्य लोकांनीं आपल्या पदरांस खार न लागावा म्हणून, जेव्हां तेव्हां दुसऱ्याच्या पोळीकडे तुपाच्या तपेलीचा वाससुद्धां जाऊं नये, व तीं सर्व आपल्याच पोळीवर ओतून घेतां यावी म्हणून आणि दुसऱ्याच्या पोटाला चिमटा बसला तरी पतकरला, पण जेथें तेथें आपली पोळी पिकली पाहिजे, म्हणून पदोपदीं असत्याचा अचूक अवलंब केल्यास नवल काय ? परंतु देवाची करणी आणि नारळांत पाणी, म्हणतात त्याप्रमाणें असल्या सामान्य जनतेंतहि कांहीं सत्याची सर्वथैव चाड बाळगणारे, तर कांहीं असत्याची कास धरल्याबद्दल वेळींच पश्चात्तापानें पुनीत होऊन प्रस्तुत जन्मांतच पवित्र पुनर्जन्म पावणारे तुमच्यासारखे हरीचे लाल सांपडतातच. प्रभाकरपंत, तुमच्यासारखे सद्गुणी सहकारी आणि साठ्यांसारखे निर्मळ आणि प्रेमळ मनाचे मित्र मला लाभल्यामुळें मी आपल्याला धन्य समजतों. बरें, पण इंदुताईंनीं विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना केलेल्या असत्याच्या अवलंबाबद्दल माझी क्षमा मागण्याची तुम्हांला इतकी निकडीची नड कां भासली ?"

" इंदुताईचीच क्षमा मागणार होतों "–' मग घोड्यानें कुठें पेंड खाल्ली ? एका अगदीं ओळखीच्या परंतु अनपेक्षित आवाजाचा प्रश्न झाला. भावड्या भासाची संशयित शंका आली तरी आवाजाच्या दिशेच्या सूक्ष्म शोधाची चाल ढकल करून प्रभाकर पुढें बोलला:–पण तसें करण्यानें इंदुताईच्या मनाभोंवतीं असणारा अज्ञानाचा भरभक्कम तट फोडून त्याला ज्ञानाच्या उघड्या मैदानावर आणणें होईल. आणि तें तर मला तूर्त करावयाचें नाहीं......

श्रीकृष्ण:–मी नाहीं समजलों तुमच्या म्हणण्याचा अर्थ ! किल्ल्यांत कोंडून सुखाच्या सावलींत राहण्यापेक्षां उघड्या मैदानावर दुःखाच्या रखरखींत उन्हांत देखील, सर्व बाजूंनीं उघडें पडलें तरी स्वतंत्रपणें राहणें शरीराला पाहिजे असतें. आणि तुम्हीं तर इंदुताईच्या स्वतंत्र व स्वच्छ मनाला अज्ञानाच्या बंदीवासाचें दुःख भोगवीत आहां ! तथापि असल्या निर्लज्ज नीचपणाचा अदय अंत:करणानें केलेला आसुरी अवलंब वावगेपणामुळें नसून विशिष्ट हेतूच्या पुण्यमय परिपूर्ततेकरितांच आहे ना ?

**प्रभाकर:**––माझी हकीकत थोडक्यांत सांगितली तर माझ्या म्हणण्याचा उलगडा ताबडतोब होईल. माझ्या पाठीवरचीं भावंडें जगांत जन्मल्यापासून तीन चार महिन्याचे आंतच काळाच्या दाढेखालीं चिरडून जाऊं लागलीं, तेव्हां माझ्या माता पितरांस एका खुडबुड्यानें सांगितलें कीं, तुमचा थोरला मुलगा जर तुमच्या अन्नावर जगला नाहीं तर तुमचीं मुलें जगतील. हा प्रयोग कित-पत सत्य ठरतो, हें पाहण्याकरितां मीं आपण होऊन माझ्या प्रेमळ आणि दु:खीकष्टी मातापितरांचें वियोगदुःख गिळून विश्रामपुरीहून नारायण नगरीस येऊन राहिलों. माझ्या संबंधी पुढील हकीकत श्री० साळ्यांनीं तुम्हांस सांगि-तली आहेच. विश्रामपुरीस माझ्याच नांवाचा माझा एक स्नेहि होता. त्यास माझ्या मातापितरांचा समाचार कळविणेस सांगून ठेविलं होतें आणि तो तें करीतहि होता. पुढें मला एक बहीण झाली तीच इंदुताई होय. सर्वभक्षी काळानें प्रभाकर व माझीं मातापितरें यांचा चुराडा एका घटकेला केला. आणि इंदुताई उघडी पडली. तुझा एक प्रभाकर नांवाचा भाऊ असून तो नारायण-नगरींत राहतो असें मातोश्री इंदुताइजवळ केव्हां तरी बोलल्या होत्या, त्याची

आठवण होऊन इंदुताई माझा शोध करीत होती. परंतु माझी माहिती कोणास नसल्यामुळें व ही माझीच बहीण असेल असें मला स्वप्नही न पडल्यामुळें, इंदुताईला मी सांपडलों नाहीं, आणि पदोपदीं येणाऱ्या अडचणींनीं वैतागून जाऊन इंदुताईनें आपल्या जीवाचें वेडेंवांकडें करून घेण्याचा प्रयत्न केला. पुढील हकीकत तुम्हांस ठाऊक आहेच.—

**श्रीकृष्णः**—इंदुताई, हीच तुमची बहीण असें तुम्हांला कसें कळलें ?

**प्रभाकरः**—ज्या दिवशीं इंदुताईस तुम्हीं आपल्या घरीं घेऊन आला, त्याच दिवशीं रात्रीं ती आपली सर्व हकीकत सांगित असतां मी तेथें होतों, आणि शिवाय त्याच्या दुसरेच दिवशीं माझ्या गांवच्या एका इसमाचें पत्र आलें होतें; त्या सर्वांवरून हीच माझी बहीण अशी मीं मनाशीं पक्की खूणगांठ बांधून ठेविली.

**श्रीकृष्णः**—याच गोष्टीविषयींच्या अज्ञानांत इंदुताईला तुम्हीं खितपत ठेवित आहां काय ? आणि तसेंच असेल तर तसें करण्यांत तुमचा विशेष हेतु काय ?

**प्रभाकरः**—होय. याच गोष्टीसंबंधीं इंदुताईला मी अज्ञानांत ठेवूं इच्छितों. आणि असें करण्यांत माझा दुसरा तिसरा कांहींएक हेतु नसून तिचा सुखाचा जीव दुःखांत न पडावा हाच हेतु आहे.

**श्रीकृष्णः**—समजलों. पण तुम्हीं तिची क्षमा मागण्यानें तिचें अज्ञानपटल कसें काय नाहींसें होईल ?

**प्रभाकरः**—माझ्याविषयीं साठ्यांनीं इंदुताईला सांगितलेली हकीकत तिच्या मनाची जवळ जवळ अशी खात्री पटवितें कीं, मी तिचा भाऊ असलों पाहिजे. आणि क्षमा मागतांना जर कां एखादा शब्द चुकून गेला तर सगळीच इमारत ढांसळावयाची !

**श्रीकृष्णः**—बरोबर ! पण माझी क्षमा मागण्याचें कारण माझ्या लक्षांत त नाहीं.—

**प्रभाकरः**—इंदुताई, तुम्हांस देव मानीत असल्यामुळें तुमच्याजवळ क्षमा मागणें म्हणजे इंदुताईजवळ क्षमा मागणेंच होय असें वाटल्यावरून मी तुमची क्षमा मागितली. "इंदुताई, इकडे या." अर्ध्या मिनिटापूर्वी तेथें येऊन थडक-

लेली कमला उद्गारली. इंदुही निमिषमात्रांत तेथें आली. त्यासरसा कमला बोलली. " मी तुम्हांला बोललें नव्हतें कीं, दादांकडे येणारे प्रभाकरपंतच तुमचे बंधु असले पाहिजेत म्हणून त्यांना ही गोष्ट तुमच्यापासून लपवून ठेवावयची होती. परंतु मनुष्य इच्छितों एक आणि परमेश्वरी योजना असते निराळीच. असो. प्रभाकरपंत, झाली गोष्ट होऊन गेली. इंदुताईचा सुखाचा जीव दुःखांत पाडण्यापेक्षां तुम्हींच आमचे येथें येऊन रहा म्हणजे तुमचाच दुःखाचा जीव सुखांत पडेल."

**श्रीकृष्णः**—मी तरी तेंच म्हणणार होतों.

**इंदुः**—तुम्हां बंधुभगिनींनीं, श्री० साठ्यांनीं आणि इतर मंडळींनीं केलेल्या उपकारांचें ओझें इतकें आहे कीं, माझ्या कातड्याचे जोडे करून जरी तुम्हां सर्वांच्या पायांत घातले तरी त्या उपकारांची फेड व्हावयाची नाहीं. दादा, ( प्रभाकरांस उद्देशून ) माझ्याबद्दल तूं मुळींच काळजी करूं नकोस. दुसऱ्यांच्या येथें राबून मी तुझ्या माझ्या पोटापुरतें मिळवीन, आणि तूं पोटभर शीक. फांवलेल्या वेळांत मीही तुझ्यापासून शिकेन. माझ्या लग्नासंबंधींहि तूं फिकीर करूं नको. परमेश्वरानें दिलेला जन्म अविचारानें व आळसानें फुकट घालविण्या साठीं दिलेला नसून त्याचा सदुपयोग करण्याकरितां दिला आहे, असें मत ज्या विभूतीनें विहिरींतून काढून स्वतःच्या पवित्र व निर्मल चारित्र्यानें शिकवि त्या विभूतीला मी मनानें कांहीं दिवसापूर्वीच वरिलें आहे. स्वतःच्या योग्यते न वाटल्यामुळें माझा स्वीकार झालाच नाहीं, तर त्या विभूतीचें जन्मभर ध्या करीन आणि स्वर्गांत गेल्यावर परमेश्वराच्या पुण्यपदाशीं लोळण घेऊन पुढी जन्मीं तरी त्या विभूतीची सहचारिणी होण्याची योग्यता प्राप्त करून घेईन.

\+ \+ × \+

श्रीकृष्णानें दोघांनाही आपल्या घरीं राहणेचा आग्रह केला. कमलाहि पुष्कळ पटली. पण उपयोग झाला नाहीं. आणि इंदु व प्रभाकर एकेठिकाणीं राहूं लाग कमलेच्या सांगण्यावरून श्रीकृष्णानें प्रभाकरास, "मातोश्रींची संमति मिळवून आपल्याच भगिनींचा स्वीकार करीन " असें वचन दिलें. असो.

यानंतर या दोन वर्षांत विशेष कांहींच घडलें नाहीं. त्यांतल्यात्यांत सां

वयाचेंच झाल्यास श्रीकृष्णाच्या परीक्षा उत्तम तऱ्हेनें पास होऊन त्याचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें. आणि दुसरी गोष्ट म्हणजे श्रीकृष्णाच्या मामींनीं त्याची पाठ पुरविल्यामुळें झालेलें कमलेचें लग्न होय. कमलेला योग्य पति निवडण्यांत श्रीकृष्णानें दाखविलेल्या कुशलतेची कल्पना तिनें आपल्या भावजयीस (इंदुला ती भावजय समजते.) लिहिलेल्या कवितारूप पत्रांतील उतारा दिला असतां थोडीशीं होईल असें वाटतें. तो उतारा असाः—

वेळ सगळा जणुं बांधलेला ।
खेळावयास बनते न मुळीं पळाला ॥
गांवीं न आळस कशा वदतात लोक ।
आनंद मित्र परका अगदींच शोक ॥ १ ॥
दुःखें जरी चिरडिलें कितिही मनाला ।
त्या दर्शनें टवटवी मिळते तयाला ॥
दे शब्द सौख्य न सुधेसहि शक्य देणें ।
लाजे पराक्रम बघूनेच सूर्य, जाणें ॥ २ ॥
जें सौख्य होय सहवासिं सुशब्द चित्र— ।
रेखाटण्यास न समर्थ, नसेंच पात्र ॥
जेव्हां पडे सुखद त्या मृदु बाहुपाशीं ।
झालेंच सार्थक गमे कृति ये फलासी ॥ ३ ॥
प्राशोनि चातक दिलें जल वारिदानें ।
पावे न तोष तितुका, न सुरां सुधेनें ॥
प्रेमाचिया सुखद वृष्टि करीत दृष्टी ।
माझ्यासवें अनुभवी सगळीच सृष्टी ॥ ४ ॥
मोठेंच भाग्य म्हणुनी पडलें इथें मी ।
राणी न भोगत असें कधिं भाग्य नामी ॥
केले किती मजवरी उपकार ईशें ।
स्वीकारिलें, जरि अपात्रच, जीवितेशें ॥ ५ ॥

येथें प्रथमच सांगून ठेवलें पाहिजे कीं, कमला म्हणजे कवयित्री नव्हती.

पण ती केव्हां केव्हां कविता मात्र करीत असे. इतक्या अंतरावर सूर्य अस तांना त्याच्यापासून मिळालेल्या प्रकाशाच्या ऐटीवर चंद्र जर दिमाखानें वावर असतो, तर कवीच्या अगदीं निकट सान्निध्यांत अहोरात्र अष्टौप्रहर असणाऱ्य कमलेनें कविता केल्यास नवल काय ? ही तर अगदीं अलीकडील, अंतःकर णास घरें पाडणाऱ्या श्रीकृष्णाच्या निधनानंतरची कविता होय. श्रीकृष्ण इहलोकची जीवितयात्रा कंठीत असतां तिनें लिहिलेली एक कविता आम पाहण्यांत आहे. त्या कवितेबद्दल श्रीकृष्णाणानें तिला " शाबास कमले ! म्हणून पत्र देखील लिहिलें होते. कारण, त्यांत तिनें केलेला उपदेश खरोखरी मननीय आहे. श्री० साठे आणि कमलेची वर्गभगिनी कु० काशीबाई ( आ रमाबाई साठे ) यांचा विवाह झाला त्या वेळीं विवाहास तिला येतां येई म्हणून तिनें दोघांनाही लिहिलेली ती कविता आहे. श्रीकृष्णानें त्यांत उपदेश ग्राह्य आहे अशी प्रत्येकास शिफारस केली असल्यामुळें आम्हांस कविता जशीच्या तशी दिल्याशिवाय रहावत नाहीं. कविता दिल्याबद्दल श्र साठ्यांचे आभार मानण्याची जरूरच आहे कां?

प्रेमें ज्या लतिका तरूवर वरी मेघास वा वीज ती ।
चंद्राला रजनी, मधूस मधुता, साधू जनां सन्मति ॥
सिंधूला तटिनी, प्रभाहि रविला, वस्तूस छाया सती ।
त्या प्रेमें शुभ बद्ध होउनि जगीं साधा शुभा सत्कृति ॥१॥
पद्में हांसति सूर्यदर्शन तया जेव्हां घडे मोदद ।
हास्याची भरती पयोधिस सुखी चंद्रागमें शांतिद ॥
हास्याची उकळी पयोद बघुनी तृष्णाकुला चातका ।
त्या हास्या शिव सर्वदा अनुभवा; थारा न द्या पातका ॥
सौख्याचें गृह, सर्व गोत, जगतीं जीवास मोठा सखा ।
आनंदागर, प्रेमपात्र शुभसें प्रत्येकही अन्यका ॥
अन्योन्या म्हणुनी सदैव सुखवा जागें इमाना रहा ।
ईशातें मनि ध्यात नित्य सगळें संसार वोझें वहा ॥३॥
साक्षी ठेवुनि अग्नि, विप्र, शशि हें नातें नवें जोडतां ।

जें नातें खुडण्या हरीहि न शके अन्यास कां योग्यता ॥
ये जोखीम बहू अमूल्य म्हणुनी जाणोनि ती सर्वदा ।
कर्तव्यीं रत होउनी तनुमनीं संतुष्टवा सर्वदा ॥ ४ ॥
नाशी तत्क्षणिं संकटें सकलही, भक्तांस सांभाळिते ।
विश्वाच्या प्रतिपालना करुनि जी उद्योग उंचाविते ॥
जीचें वर्णन थोर थोर कविनीं केलें परंतू थिटें ।
रक्षो ईशकृपा तुम्हां सतत ती षट्शत्रु जी दामटे ॥ ५ ॥

असो. याच दोन वर्षांत प्रस्तुत लेखकाला श्रीकृष्णाच्या सुखमय सहवासांत, प्रेमपूर्ण मैत्रींत आणि हितप्रद सान्निध्यांत करुणेशकृपेनें काळ घालविण्याचें भाग्य लाभलें असतां स्वतःस झालेल्या फायद्याचें दिग्दर्शनहि प्रस्तुत लेखकानें अद्याप-पर्यंत केलें नाहीं. याबद्दल आश्चर्यानें कित्येक वाचकांस घेरलें असेल! पण श्रीकृष्णानें बांधून दिलेल्या ज्ञानाच्या शिदोरीवरच आम्हीं वाचकांस स्पष्टपणें कळविण्याचें धाडस करितों कीं, आम्हीं केलें तेंच बरोबर केलें. स्वतःचा उल्लेख करण्याच्या नसत्या भानगडींत पडलों असतों तर, एकोणीस हातांनीं धनुष्य उचलल्याबद्दल विसाव्या हातानें स्वतःस शाबासकी घेणाऱ्या रावणास जें बक्षीस योग्य, तेंच आमच्या पदरांत पडून पवित्र झालें असतें! पण त्यास पवित्र करण्याचा आमचा मानस नसल्यामुळें आम्हीं स्वतःचा उल्लेख केला नाहीं. तथापि निकट निवासामुळें श्रीकृष्णाच्या सर्वसाधारण सामान्य संवयी, व इतर चालचलणूक याबद्दल त्याच्याकडून झालेल्या स्पष्टीकरणाचा व तदंगभूत शिक्षणाचा योग्य उल्लेख करूं इच्छितों.

दुसऱ्यास स्वतःच्या कामांतून डोकें वर काढण्याची मारामार पडते, आणि तुम्हीं तर आपलीं कामें उरकून दुसऱ्याचीं अर्धीअधिक उरकतां! तुम्हांला वेळ तरी इतका कसा फावतो? असा प्रश्न केला असतां श्रीकृष्ण उत्तर करी:— इच्छेला मार्ग दिसतो. स्वतःचीं कामें चोख रीतीनें आटोपून दुसऱ्याचींही फार आटोपीन अशी इच्छा बेंबीच्या देंठांशीं असली कीं, हरणाच्या चपलतेनें, वार्थीच्या कळकळीनें आणि चढाओढीच्या चढत्या कमालीनें दांडगा हुरूप येऊन उभ्या दिवसांत इकडचें जग तिकडे करणेंही दुरापास्त नसतें. परंतु

इच्छेचा अभावच असला, किंवा बदलत्या मनाच्या हलत्या हवेवर क्षणभंगुर बुडबुड्याप्रमाणेंच जर ती इच्छा तरंगत असली तर ऐशी ऐरावतांचे मुसमुस-णारे बल असूनहि पैजेनें पोसल्याप्रमाणें मनुष्याला आपल्या तोंडावरची माशी देखील उठवतां उठवतां उभा दिवस कोणीकडच्या कोणीकडे निघून जातो.

" कित्येक व्यसनी आणि छचोर लोक सुद्धां तुम्हांस मित्र समजत असतात, कसें काय ? चांगल्याप्रमाणें वाईटांचीहि भक्ति तुमच्यावर कशी बसते ? "

**श्रीकृष्णः**—अमकी व्यक्ति चांगली व अमकी वाईट हें निश्चितपणें ठर विणें माझ्या आवाक्याबाहेर आहे. एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तिपेक्षां बरी अगर वाईट, एवढाच शिक्का मला काय तो विचाराच्या–सदसद्विवेकाच्या–निरपेक्ष सहाय्यानें तयार करतां येईल. शिवाय कोणीहि कितीहि चांगला अगर वाईट असला तरी तो थोडा तरी वाईटपणा अगर चांगुलपणा चुकून कां होईना, बाव गून असतोच ' ! स्वप्रकाशानें सगळ्या जगाला जीवन पुरविणाऱ्या कर्णपित सूर्यावरहि काळे डाग आहेतच; आणि उकिरडे फुंकणाऱ्या आणि खातेऱ्यां लोळणाऱ्या गाढवाच्या अंगीहि वाटेल तितकें ओझें सहन करण्याची शार्थ आहे. तेव्हां मधुर वाणीनें आणि सुरस कृतीनें प्रत्येकाच्या अंतःकरणांत स्वत विषयीं आपलेपणाची उदात्त आणि भव्य भावना उत्पन्न करून आपल्या अं त्यांच्या गाण्यायोग्य गुणाला निश्चितपणाच्या अढळ सिंहासनावर बसवावें अ मला वाटतें. दृष्टीसहि न खपणाऱ्या त्यांच्या दुर्गुणांचें उन्मूलन करणें शव झाल्यास करावें, परंतु नेणतेपणींहि आपल्या अंगच्या दुर्गंधी दुर्गुणाच कणाचा कणहि निष्काळजीपणाच्या झोंबत्या व बाधक वाऱ्यानें दुसऱ्याच अंगांस न बिलगेल अशी काळजीपूर्वक खबरदारी घ्यावी. आणि या दिशेनें आपल्या वर्तनाचा गाडा हांकीत असल्यानें सर्व तऱ्हेचे लोक मला साहजिकप मित्र समजत असतील.

× × × ×

" सुधारणेच्या लाटेबरोबर हिंदुस्थानांत पसरलेल्या विनाशक व्यसना तुमच्याबरोबरीची मंडळी सहजगत्या बळी पडली असतां तुम्हींच कोरडे क

राहिला ? " " निश्चयाच्या खंबीर जोरावर " श्रीकृष्ण म्हणाला " निश्चयाचें बळ तेंच फळ असें तुकाराम शिकवितात. "

× × × ×

" सदासर्वकाळ कसलें तरी पुस्तक तुमच्या हातास शिवलें असतें. तुम्हांस वाचनाचा कंटाळा येत नाहीं कां ? "

श्रीकृष्णः—सत्पुस्तकासारखा सन्मित्र मला माहीत नाहीं. मनाला दळणाऱ्या दुःखांचें स्वर्गीय सुख करण्याचें आणि सांपडलेल्या सुखाचें सुखकर संवर्धन करण्याचें सामर्थ्य दुसऱ्या मित्रांत नाहीं. घरीं, दारीं, वनांत जनांत सगळीकडे सात्विक सेवेला हजर राहणारा सेवक व मित्र जर कोणी असेल तर सत्पुस्तकच.

× × × ×

विद्यार्थ्यांनीं नाटकें पाहूं नयेत, कारण त्यांनीं ते बिघडतात, अशी ओरड होत असतां, तुम्हीं नाटकें पाहतां व वाचतांहि. याचें कारण काय ? "

श्रीकृष्णः—विद्यार्थ्यांनीं नाटकें पाहूं नयेत अगर वाचूं नयेत असें म्हणणेंच मला कसेंसें वाटतें. हंस क्षीरन्यायानें विद्यार्थ्यांस नाटकें वाचण्यास अथवा पाहण्यास कांहींच हरकत नाहीं. नाटकांतील पाणी टाकून दुधाचें सेवन करण्याची प्रशंसनीय गुणग्राहक शक्ति जर विद्यार्थ्यांमध्यें नसली तर तो दोष नाटकांचा नसून विद्यार्थ्यांचें गृहशिक्षण, संगत, आणि भोंवताली पसरलेली परिस्थिति यांचा तो दोष आहे.

# झाकलें माणिक.

## ३

### अंधेर ! काळोख ! !

**दैवें लावुनिया दिवे, पसरिला काळोख दाही दिशा ।**
**पर्जन्यें दिधली दडी कुणिकडे अन्नान्न झाली दशा ॥**
**सीमोल्लंघन छे ! सुखा निपटिलें,दुःखें दरीं गाठिलें ।**

अशा तऱ्हेच्या सांप्रतच्या संकटमय स्थितींत श्रीकृष्णाच्या आयुष्यांतील शेवटचीं सात वर्षें डोळ्यापुढें उभीं राहिलीं म्हणजे अगोदरच रसहीन आणि भयाण दिसणाऱ्या दिशा शून्य भासूं लागतात ! मन वेडें होऊन कोठेंच स्थिरावत नाहीं! अंतःकरणाचा चक्काचूर होऊन जातो ! बुद्धिभ्रम पावते ! हृदय बधिर होते ! आत्मा तळमळतो ! आणि शोकानें अंगाची लाही लाही होऊन छाती पिळून निघाल्यामुळें मन दुभंग होतें! डोक्यापुढें अंधारी येते! काजवे चमकूं लागतात ! जगाच्या जगल्या अणूरेणुंच्या करुणास्पद कण्हण्याशिवाय कांहींच ऐकूं येत नाहीं ! वावरत्या वातावरणाच्या प्रत्येक लहान मोठ्या लहरींत दावाग्निसारखा भडका करणाऱ्या दुष्ट दुःखाच्या जड आणि उष्ण निश्वासाशिवाय कांहींच भरलेलें आढळत नाहीं ! प्रत्येक क्षुल्लक वा महत्त्वाच्या गोष्टींतील कामल काव्याची करड्या कसाबी काळानें खुसखुशीत काकडी केलीसें वाटतें ! आणे पुढें पाठीमागें, इकडे, तिकडे वर, खालीं, सगळीकडे राक्षसी रुक्षपणा, भयमय भीषणता. अविचारी औदासिन्य, आणि अमंगल आंबटपणा यांचें स्वारस्यहीन ' सुताही साम्राज्य ' खुशाल निलाजऱ्या निष्काळजीपणानें पाय पसरून बसलेलें आढळतें ! ! !

आम्हचीच अशी स्थिति होते असें नाहीं. तर आमच्या हृदयाशीं आपलें हृदय, आमच्या मनाशीं आपलें मन, आमच्या अंतःकरणाशीं आपलें अंतःकरण एकरूप व तन्मय करून हृदयांचा हृदयाशीं मनाचा मनाशीं, व अंतःकरणाचा अंतःकरणाशीं मायाळू मेळ बसविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या भोवतीं, आमच्या सभोंवतीचा कष्टप्रद खेळ चालल्याशिवाय रहात नाहीं. आमचे ' दगडी

देहाचे आणि कठीण काळजाचे ' काकादेखील आपणांस अनुभव आल्याची खात्री छातीला हात लावून देतात. मग ' दगडी देहाचे आणि कुसुमी काळजाचे ' अगर ' कुसुमी कायेचे आणि कठीण काळजाचे ' लोकांस आमची स्थिति अनुभवावी लागेल यांत नवल काय ?

नका ! स्फुंदूं नका ! हुंदके देऊं नका ! तुम्हीं स्फुंदूं लागला, तुम्हीं हुंदके देऊं लागला, सहृदयतेनें तुम्हांस होणारें दुःख तुमच्या अश्रूंरूपानें बाहेर येऊं लागलें, म्हणजे विचाराच्या हलक्याफुल नाजूक दडपणाखालीं दडपलेलें आमचें दुःख उसळीसरशी बाहेर येतें ! तुमच्या दुःखाचा आमच्या दुःखांत मिलाफ झाल्यावर त्याच्या कर्णकर्कश आविष्करणानें, पाषाण रडूं लागतील, झाडें शोक करतील तारा टिपें गाळतील, आणि स्वतः इंदूताई तर आपणावर पडलेल्या आकाशिच्या कुऱ्हाडीची यातनामय तळमळ न सोसावल्यामुळें धाय मोकलून रडत असतां तडफडून तडफडून पटकन यमसदनाचा रस्ता सुधारील ! तेव्हां श्रीकृष्णासारख्या हरपल्या रत्नाबद्दलच्या वृथा शोकाला आळा घालून इंदुताईसारख्या रत्नाला गमविण्याला तरी तयार होऊं नका, इंदु ! इंदु ! ! इंदु!!! स्वतःच्या सुधामय कृतिनें लोकांत सुख आणि समाधान यांची सारखी समृद्धि करणारी चंद्रिका, इंदूच नव्हे कां ? मोहक वाणीच्या उपकारी उपदेशानें, मधुर कृतीच्या उत्साहि उदाहरणानें लोकांस मार्ग दाखविणारी आणि असामान्य गुणांच्या प्रखर तेजानें सर्वांचे डोळे दिपविणारी पराक्रमी तारा इंदूच नव्हे कां ? दुसऱ्याच्या सुखाकरितां आपण दुःख पतकरून, दुसऱ्याच्या प्राणरक्षणासाठीं स्वतःचा प्राणविनाश स्वीकारून, दुसऱ्याला गुलाब मिळण्याकरितां स्वतां काट्यांचा अंगिकार करून दुसऱ्याला सुखाचा सुग्रास मिळविण्यास्तव स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन, दुसऱ्याचीं हाडें टणक व बळकट व्हावींत म्हणून स्वतःच्या हाडाचीं काडें करून, दुसऱ्यावर परमेश्वरी कृपाछत्र कायम रहावें याकरितां स्वतः तप आचरून, दुसऱ्यांचा चौऱ्याशीचा फेरा चुकविण्याकरितां स्वतः चौऱ्याशीचा फेरा फिरण्यास तयार असल्याबद्दल तत्परता दाखविणारी तपस्विनी, इंदु नव्हे कां ? त्या इंदूला, त्या देवीला, तुम्हीं शोकाविष्करणानें छळणार कां ? काय म्हणतां, इंदूला एवढी योग्यता केव्हां चढली ? श्रीकृष्णाशीं सर्व तऱ्हेनें तन्मय

झाल्यावर तिला एवढी योग्यता चढली. आणि त्या योग्यतेला श्रीकृष्णाच्या मरणानें मनस्वी मोल आलें! कारण, इंदु म्हणजे श्रीकृष्णाची प्रतिमूर्ति, फोटो. त्या प्रतिमूर्तीला, त्या फोटोला, श्रीकृष्ण तुमच्या आमच्यांत असतांना तितकें मोल कसें येणार? तो गेल्यावर त्याच्या फोटोची इतकी पूजा होत असली तर आश्चर्य कसलें? काय, श्रीकृष्णवियोगामुळें होणाऱ्या दुःखाच्या वृथा आविष्करणानें त्याची प्रतिमूर्ति तुम्हीं नाहीं ना फोडणार? त्याचा फोटो नाहीं ना फाडणार? इंदूला यमसदनाला नाहीं ना धाडणार? अगोदरच श्रीकृष्णाच्या शेवटच्या सात वर्षांत विक्रांतानें सतावल्यामुळें मेल्याहून मेली झालेल्या इंदूची स्वर्गांत रवानगी नाहीं ना करणार? आम्हांस अशी खात्री वाटते तुम्हीं करणार नाहीं. काय म्हणतां? विक्रांतानें कसें सतावलें? दुर्योधनानें द्रौपदीस जसें सतावलें तसेंच. तुम्हांला त्याचा साग्र इतिहास पाहिजे म्हणतां? पण असल्या हिडिस इतिहासानें शाई, कागद, लेखणी आणि सर्वांपेक्षां अगणित मोलाचा वेळ यांस विटाळण्यापेक्षां श्रीकृष्णाच्या पुण्यकृतींचीं गोड गाणीं गाण्यांत त्यांचा सदुपयोग केल्यास बरें नाहीं का? श्रीकृष्ण! श्रीकृष्ण!! श्रीकृष्ण!!!

श्रीकृष्णा, तुझी जर आम्हांस शपथ नसती, वचनभंगाच्या पातकाचें धनी आम्हीं जर होत नसतों, तर तुझ्या कृतीवर फुकटचा मोठेपणा मिळविणाऱ्या कित्येक व्यक्ति आज फिक्या पडल्या असत्या! पण नको, तो विचार देखील नको! स्वकृतीनें दुसऱ्यास मोठेपणाच्या अत्युच्च व अक्षय्य शिखरावर चढविणाऱ्या श्रीकृष्णा, तुझ्याप्रमाणेंच आम्हीं वर्तन करावयास नको कां? तसें जर आम्हीं केलें नाहीं, तर तो तुझ्या संगतीला काळिमा नाहीं कां? शेवटच्या सात वर्षांत तूं केलेली कामगिरी सतत टिकली तर काय मजा होईल! भरतभूमीचे पांग फिटतील. काय म्हणालास? याचा उच्चारही करावयाचा नाहीं? राहिलें, आमचें काय? तुझी आज्ञा प्रमाण. काय? जागे आहों कां? आहों, पूर्ण जागे आहों; पण श्रीकृष्णाशीं, नाहीं तर डोळयापुढें वावरणाऱ्या त्याच्या मूर्तीशीं तरी दोन शब्द बोलण्याचें सुख घेतलें इतकेंच! कारण तेवढेंच मनाला समाधान! तुम्हांला श्रीकृष्णाच्या पुण्यकृतींची ओळख करून द्यावयाची ना! पण तसें करतांना त्याच्यावर कोसळलेल्या आपत्तीची, ओढवलेल्या अडचणींची

आणि गुदरलेल्या प्रसंगाची आठवण आम्हांस झाल्याशिवाय कशी राहील ? स्वार्थाच्या कळकळीनें, आणि तिऱ्हाइताच्या निष्कामबुद्धीनें दुसऱ्याच्या हितासाठीं झटतांना श्रीकृष्णानें पुष्पें समजून सेवन केलेले शिव्याशापांची आठवण झाल्यावर अंगावर शहारे आल्याशिवाय कसे राहतील ? गजावजा न करितां, शांतपणें प्रामाणिक देशसेवेचें कडकडीत व्रत आचरतांना त्याच्यावर झालेल्या निष्ठुर निंदेच्या दांडग्या वर्षावानें हृदयाचें पाणी कसें होणार नाहीं ? अशी जरी आमची चमत्कारिक स्थिति झाली, तरी तुमचीहि आमच्याचसारखी स्थिति करण्याइतकें आम्हीं नीच आहों काय ? वडिलांची प्रकृति ताळ्यावर आली तरी भ्रामकपणानें त्यांस आमरण न सोडल्यामुळें अल्पवयांतच सगळ्या काळ-ज्यांनीं घेरलेल्या श्रीकृष्णानें शेवटचीं सात वर्षें कशीं काढलीं तीं त्याची त्यासच व सर्वसाक्षी सत्यनारायणासच माहीत असें म्हटल्यास एकाच वाक्यांत अति-शयोक्तीच्या अभावीं सात वर्षांचा इतिहास सांगितल्यासारखा नाहीं कां होणार ? केलेल्या चोरीबद्दल दोन वर्षांची सक्तमजुरीची सजा भोगून ज्या दिवशीं विक्रांत ताजभूषणास पोचतां झाला त्याच दिवशीं विलक्षण योगा-योगाच्या अद्भुत घटनेनें श्रीकृष्णानें आग्रहानें आणलेलीं आपलीं मित्रमंडळी तेथें पावती झाल्यावर विक्रांताच्या रोमरोमीं भरलेला व न्यायदेवतेच्या कडक कोपानें लवभरही न वरमलेला सुलतानी सैतान स्वातंत्र्याच्या मोकळ्या लहरी-बरोबर उचल खाऊन दांडगा व उच्छृंखल धांगडधिंगा स्वैरपणानें घालूं लागला. असें सांगितल्यास खरें वाटेल काय ? परंतु बिकट परिस्थितीच्या कोंदट, दमट व काळ्याकुट्ट कोठडींत सद्गुणी माणसें सांपडलीं म्हणजे नीच, दुष्ट, व दुर्गुणी नरपशूंना पुष्कळ फावतें असा जगाचा अनुभव नाहीं का ? "अनुभवाच्या बळकट कांठीवर वृद्धपणाच्या जड ओझ्यानें वाकलेलीं माणसें फारच थोड्या दिवसाचे सोबती असलीं तरी जगाच्या कल्याणांत तीं भर टाकतात" या दृष्टीनें विक्रांताचें तोंड पहावयाचेंच नाहीं असा संकल्प करून 'विक्रांतास थारा देऊं नका' असें आपल्या भावजयीस निक्षून सांगून इहलोकचा कायमचा निरोप, विक्रांताच्या अनिष्ट आगमनाच्या आधीं दोन दिवस घेणाऱ्या श्रीकृष्णाच्या आदरणीय आत्याबाईंचें म्हणणें नीच निष्काळजीपणाच्या नळींतून इकडून तिकडे गेलें नसतें तर किती बरें झालें असतें ? परंतु विनाशकालीं विपरीत बुद्धीनें

आपला परिणामी पगडा बसवावयाचा नाहीं. तर केव्हां बसवावयाचा? इंदू-सारखें रत्न श्रीकृष्णाला, तात्यासाहेबांच्या व लक्ष्मीबाईच्या अनुमतीच्या प्राप्ती-मुळें लाभणार असें निश्चित झाल्यावर, दुसऱ्याचें बरें निसर्गतःच न पाहणाऱ्या विक्रांतानें, श्वासानें बेदम आजारी पडलेल्या कमलेच्या आईच्या काळजीनें जन्म दिलेल्या बिकट परिस्थितीचा फायदा घेऊन इंदूचें स्वर्गीय पावित्र्यभ्रष्ट करण्याचा जो कसाबी कयास केला, त्याचें वर्णन कशाला बरें हवें? कनकलता कण्हेऱ्यास शोभत नाहीं. ती कल्पवृक्षासच शोभते, किंबहुना कनकलता आपली अर्धांगी व्हावी असें चुकून देखील कण्हेऱ्यानें मनांत आणणें नीचपणाचें होय. परंतु विक्रांताला इतकें तत्वज्ञान कोठून कळणार? आणि कळलें तरी त्याला तो थोडीच भीक घालणार? दोन कामें करण्याची भीक नको पण तुझा सैतानी कृतीचा कुत्रा आवर असें गयावया करून सांगून श्रीकृष्णानें ताजभूषणांतून काढून लावलेल्या विक्रांतानें पुढें अनेक तऱ्हेनें पाठ पुरविली. पण कधीं प्रभाकराच्या तर कधीं कमलेच्या, कधीं साठ्यांच्या, तर कधीं त्यांच्या मातोश्रींच्या निर्मळ, प्रेमळ आणि समययोग्य सहाय्यानें तिची पवित्रता सुखरूप वाचली. कर्तव्यबुद्धिनें इंदुच्या पावित्र्यरक्षणासाठीं श्रीकृष्ण कितीतरी वेळा जीवावर उदार होऊन धावून गेला असेल! त्याच्या प्रत्येक वेळच्या विवेकपूर्ण पण रागीटपणानें युक्त अशा सात्विक शिकवणीनें विक्रांताच्या अंतःकरणांत उत्पन्न केलेल्या पश्चात्तापाच्या पवित्र व तीक्ष्ण टाकीनें विक्रांताला देव जरी बनविलें नसलें तरी माणूस बनविलेलें पाहून कोणास समाधान होणार नाहीं? श्रीकृष्णाच्या मृत्यु दिवशीं तरी विक्रांताच्या माणूस-कीचा जन्म व्हावयाचा आहे असें जर श्रीकृष्णास अगोदर माहीत असतें, तर श्रीकृष्णाला किती बरें वाटलें असतें! विमला आत्याबाईच्या मृत्युनंतर लवकरच थोड्या दिवसाच्या आंत सरस्वतीमामींचा काळ व्हावा, आणि त्यामुळें घरांत अवास्तव वावरत असलेल्या भयाण भीषणतेनें गृहाच्या गृहपणाचा आपल्या पोटास गोळा दिल्या कारणानें एवढ्या गजबजलेल्या समुदायांतही दाट वनांतील काळ्याकुट्ट एकलकोंडेपणा आढळावा हें साहजीक नाहीं कां? पण मनाला चैन पडावें म्हणून चार दिवस शाहुपुरीस गेल्यावर तेथें एका आठवड्याच्या आंत बाहेर तात्यासाहेबांस, श्रीकृष्णाच्या पित्यास, वत्सलाबाईच्या सौभाग्यास, सर्पदं-

शानें पंचत्वाला जावें लागावें हें विलक्षणच नाहीं कां? सहा महिन्याच्याच अल्प अंतरानें आपल्या मातोश्रींच्या शब्दास मान देण्याकरितां लग्न करावयाचें ठरवून त्याच्या तयारीस लागणाऱ्या साऱ्यांना श्रीकृष्णाच्या परमपूज्य मातोश्रींस योग्य औषधोपचार व काळजी पूर्वक शुश्रूषा यांची क्षणमात्रही वाण पडूं नये म्हणून, आपलें निकडीचेंही व्यवसाय सोडून, श्रीकृष्णाच्या, इंदुच्या, व प्रभाकराच्या मदतीस जावें लागून, निसर्गाच्या निरलसतेनें, पापणीच्या एका उघडझापेस लागणाऱ्या वेळाची सुद्धां विश्रांति न घेतां केलेल्या परिश्रमांचें चीज होऊं नये हे दुर्दैव व नव्हे कां? नवज्वरानें पछाडलेलीं माणसें जगत कां नाहींत? पण दैवाच्या फेऱ्यांत अगर भोंवऱ्यांत सापडल्यावर कोणाचा काय इलाज? सख्या मुलांपेक्षांही, पोटच्या गोळ्यापेक्षांही, प्रत्यक्ष श्रीकृष्णापेक्षाही काकणभर ज्यास्त प्रेम आपणावर करणाऱ्या वत्सलाबाईचा वियोग सोसत राहवयाचेंच नाहीं असा जणूं काय बेत करून, ठेंच लागल्याचें 'बुज-ावण्या इतकें पोकळ निमित्त जगाला दाखवून वत्सलाबाई बरोबरच मृत्यु लोकांतून आपलें चंबूगबाळें आटपणाऱ्या वामनाला काय सुख झालें असेल तें असो, श्रीकृष्णास मात्र त्यायोगें जें झालें तें झालें त्याची जी एकदां घडी विसकटली ती विसकटली! कदाचित् सांठे व प्रभाकर म्हणतात त्याप्रमाणें इंदुच्या पाणिग्रहणानें ती पुन्हां जशीच्या तशी बसली असती. परंतु बेफाम झालेल्या विक्रांतानें घातलेल्या अनन्वित अत्याचाराच्या प्रयत्नांनीं इंदुच्या लग्नाला प्रत्येक वेळीं सतराशें विघ्नें येत गेलीं तीं गेलींच! तथापि त्याची सेवा घडावीं म्हणून नेहमीं धडपडत असलेल्या इंदुच्या अनुमतीशिवाय श्रीकृष्ण बहुशः घरच्या कामास हात घालीत नसे. वत्सलाबाईच्या मृत्युनंतर बहूतेक गोष्टींत ती त्याचा मंत्रीच बनली होती. भिकारी वर्गाचा अभाव करण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांस यश येण्याकरितां

---

**भिकारी**--गलेलठ्ठ निरुपयोगी भिकारी-नाहींसे करण्याकरितां श्रीकृष्णानें एक योजना काढली, व ती गोकुळदासास समजावून देऊन त्याप्रमाणें 'दीन-शिक्षण संस्था' काढण्याचें मुक्रर झालें. काढलेली योजना लोकांस कळवावी म्हणून श्रीकृष्णानें ती गोकुळदासाच्या नांवानें "भारतभक्तां"तून प्रसिद्ध केली. योजनेंत पुष्कळ दोष आहेत, यांत शंका नाहीं. परंतु त्या वेळच्या त्याच्या परि-

त्यानें जें आपलें सर्व उत्पन्न—पिढीजाद उत्पन्न त्या कार्यास अर्पण केलें, तें देखील इंदुच्याच संमतीनें. इंदुला व त्याला या कामांत गोकुळदासासारखे गर्भश्रीमंत

---

स्थित्यनुरूप त्यास जशी ती योजना सुचली तशी ती त्यानें मांडली. त्यावर असंबद्ध टीका झाल्या खऱ्या; परंतु त्याच्यापेक्षां सरस योजना सुचविली गेली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भारतभक्तांतील तो उतारा जसाच्या तसाच देत आहोंत, याचें कारण श्रीकृष्णाची योजना त्यायोगें कळेल.

" राष्ट्रसुधारणेच्छेनें प्रेरित होऊन राष्ट्राच्या चुका राष्ट्राच्या नजरेस आणून द्यावयाच्या आणि त्या चुका सुधारणेस योग्य मार्ग दाखवून आपणही त्या चुका सुधारण्यास राष्ट्रास मनोभावें मदत करावयाची हाच ज्यांचा बाणा, हाच ज्यांचा धर्म, हेंच ज्यांचें व्रत असे सत्पुरुष राष्ट्राच्या नशिबानें, कधीं काळींच जन्माला येत असतात आणि असे थोर पुरुष आपल्या राष्ट्राला आज काल लाभले आहेत हें देशाचें दैवच म्हणायाचें परंतु, व्यवसायव्यापृतत्त्वामुळें आणि गहन महत्त्वाच्या व अत्यावश्यक गोष्टींत चूर झाल्यामुळें त्यांस प्रस्तुतसारख्या तुलनात्मक दृष्ट्या कमी महत्त्वाच्या विषयास हात घालण्यास सवड सांपडत नाहीं. करितां देशोन्नतीच्या कामास त्यास हातभार लावण्याकरितां प्रस्तुत लेखकासारख्यांनीं हलक्या सलक्या कामाकरितां झिजणें प्राप्त आहे. आणि म्हणूनच देशांत माजून राहिलेला एवढा गलेलठ्ठ, निरुद्योगी व निरुपयोगी भिकारी वर्ग नाहीसा करण्यास सुचलेली युक्ति जगापुढें ठेवून तिच्यावर साधक बाधक टीका काय होते ती पहावी, याच्यापेक्षां सरस युक्ति सुचविली जाते कीं काय तें बघावें, आणि नच सुचविली गेल्यास आपणांस सुचलेल्या युक्तीला मूर्त स्वरूप द्यावें अशी प्रस्तुत लेखकाची इच्छा आहे.

" पुण्य पूर्वजांच्या पवित्र कृतींचा निर्मळ अर्थ लक्षांत न आल्यानें व आजपर्यंतच्या दृढ झालेल्या व बळकट मूळ धरलेल्या खोट्या व वेडगळ समजुतींस फाटा न मिळाल्यानें दारावर येणाऱ्या गलेलठ्ठालाही भिक्षा घालण्यांत आपले लोक किती पुण्य मानतात, उदात्त औदार्याचें लक्ष्यलक्षण कसे समजतात वगैरे गोष्टींचें वर्णन करण्यांत कांहींच तथ्य नाहीं. ही गोष्ट प्रत्येकाच्या इतकी परिच-

साह्यकारी होते तरी जे शिव्याशाप सहन करावें लागलें ते कांहीं पुसूं नये !
'दीन शिक्षण , संस्था सामान्य जनतेच्या हाडीं मांसीं खिळलेल्या धार्मिक

---

याची झाली आहे कीं, ती पुन्हां उगाळण्यानें तात्कालिक मोठा फायदा होइलच असें नाहीं. करितां त्या आटाआटींत न पडतां, गलेलठ्ठ, निरुद्योगी व निरुपयोगी भिकाऱ्यांच्या अस्तित्वावरच आज नाहीं उद्यां आपोआपच आमच्या युक्तीनें कसा घाला पडेल तें पाहूं.

" प्रस्तुत कालीं शाळांतून प्रचलित असलेली शिक्षणपद्धति कितीही सदोष कितीही नीरस व कितीही तिरस्करणीय आणि त्याज्य असली तरी तिचा संस्कार ज्यांच्या मनावर झाला अशा इसमांस प्रत्येकाच्या दारोदारीं नरटी फिरवून पोटाची खळगी भरणें पसंत नसतें. किंबहुना ज्या गोष्टींला लक्षांशानें कां होईना, सुशिक्षण म्हणता येईल तिच्या स्वल्प संस्कारानें सुद्धां भिक्षा मागण्याच्या प्रवृत्तीचा नायनाट होत असतो. तेव्हां हल्लींच्या भिकारी वर्गांत जीं कांहीं बालकें आहेत त्यांस शिक्षणामृताचे दोन घोट पाजल्यास पुढच्या पिढीला गलेलठ्ठ भिकारी अजीबात नाहींसे झाले नाहींत तरी पुष्कळ नाहींसे होतील असें वाटतें. ( प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत सर्वत्र केव्हां होणार तें देवा! तुलाच ठाऊक. )

" दरिद्री हिंदुस्थानांत पुष्कळ लोक भिकारीच आहेत; परंतु कित्येक शिक्षणसंस्कृतीनें, तर कित्येक कुलसंस्कृतीनें, कित्येक परिस्थितीच्या परिणामामुळें तर कित्येक दुसऱ्याच्या उदाहरणानें भिक्षा मागत नाहींत. कित्येक लोक असेही आहेत कीं, जे सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत निढळ्या घामानें काम करूनही पोटास भरपूर कांहींच न मिळल्यानें सदैव तडफडत व तळमळत असतात. अशांचे दारीं गलेलठ्ठ भिकारी येऊन धर्माच्या नांवावर त्यांस हट्टीपणानें लुबाडूं लागले म्हणजे त्यांचे हाल कुत्रादेखील खात नाहीं. बरें, हे भिक्षा मागणारे लोक तरी मिळालेल्या पैशाचा सदुपयोग करतात म्हणावें तर तसेंही नाहीं. त्यांतील कित्येक पोटाला उपाशीं मरून व्यसनापायीं आपल्या फुकटच्या मिळकतीचा सत्यानास करीत असतात. शिवाय यांनीं उद्योग न केल्यामुळें देश दिवसें

समजुतीच्या आड येत असलेनें त्या संस्थेच्या अस्तित्वाकरितां, उपयुक्ततेकरितां आणि सार्थतेकरितां कायावाचामनानें एकसारखे झटणाऱ्या व्यक्तीवर जो शिव्या-

---

दिवस अधोगतीला जात असतो तो निराळाच ! तेव्हां पैशाच्या या हृद्रोगावर औषधयोजना वेळींच हवी आहे आणि वर सांगितल्याप्रमाणें शिक्षणाची अमृत-संजीवनी मात्रा दिल्यास गुण बराच लवकर येईल अशी अशा आहे.

" खरें पाहतां सरकारनें ही व्यवस्था करावयास हवी; इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या कल्याणार्थ परमेश्वरी इच्छेनें ज्यांच्या हातीं हिंदुस्थानच्या राजकारणाचीं सूत्रें गेलीं आहेत त्यांचे तें आद्य कर्तव्य होय व तें त्यांनीं अगोदर बजावलें पाहिजे, वगैरे तऱ्हेची विचारसरणी कांहींची आहे. पण या बाबतींत धर्माचा निकट संबंध येत असल्यानें सरकार त्यांत हात घालीत नाहीं ह्यापेक्षां सरकारच्या मुग्धतेस दुसरें कारण नाहीं असे कित्येक म्हणतात. सरकारास या बाबतींत हात न घालण्यास काय कारणें आहेत याची निष्फळ विचक्षणा करण्यांत आम्हांस कांहींच तात्पर्य वाटत नाहीं. सरकार या बाबतींत हात घालीत नाहीं आणि म्हणून आपण तें काम शिरावर घेऊन पार पाडलें पाहिजे हें उघड आहे.

" आतां, बालक भिकाऱ्यास शिक्षण द्यावयाचें ठरलें तरी त्यांचीं मातापितरें या गोष्टीस कबूल होतील कीं नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यांस शाळेंत घातल्यास त्यांच्या पोटाची व्यवस्था आपणास करावी लागेल या साधार भीतीनें ते आपलीं मुलें शाळेंत घालणेस तयार होणार नाहींत हें उघड आहे. शिवाय पदरीं अठरा विश्वे दारिद्र्य वास करीत असल्यानें शाळेची फी त्यांस देणें केव्हांहि शक्य नाहीं, हें सूर्यप्रकाशापेक्षांहि उघड आहे. तेव्हां प्रस्तुतच्या परिस्थितींत बालभिकाऱ्यास शिक्षण द्यावयाचें म्हणजे त्यांच्या पोटापाण्याची भरपूर तर्तूद करावयाची आणि त्यास प्रेमानें सांगून सवरून मोफत शिक्षण द्यावयाचें. तथापि इतकीहि व्यवस्था केली तरी बालभिकारी कितीसे मिळतील अशी कित्येक शंका घेतील. आणि त्यांची ही शंका अगदींच अस्थानीं आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण, संस्था फक्त मुलांचीच व्यवस्था करणार असल्यामुळें त्यांचा वियोग त्यांच्या मातापितरांस सहन होईल वा न होईल कांहींच सांगतां येत नाहीं. परंतु त्य बरोबरच हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हें कांहीं जबरदस्त

शापांचा तासेरा झडल्यांची कल्पनाच करावी तथापि आपण करीत आहों त्यांत कांहींच वावगें नाहीं असा दृढ विश्वास असल्यामुळें, ' कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ' या न्यायानें त्या मंडळीस अधिकच उत्तेजन येईल.

---

कोडें नाहीं. प्रयत्नांतीं परमेश्वर या दृष्टीनें त्या दिशेनें चालणारास थोडें तरी यश येईलच. प्रस्तुत लेखक व त्याचे साह्यकारी यांस सुदैवानें असा अनुभव आला आहे कीं, संस्था मुलांना राजाप्रमाणें राजाच्या जबाबदारि अभावीं, सुखांत ठेवून त्यांना त्यांच्या आईबापांस दिवसांतून दोन वेळ २ तास भेटविणेस तयार असल्यास मुलें मिळतात. असें असलें तरी सर्वच लोक आपलीं मुलें देण्यास तयार होतील असें थोडेंच आहे ? तथापि आरंभाला दोन तीन मिळाली तरी बस्स होतील. नदीचा ओघ मुळाशीं अगदीं छोटा असतो. आरंभशूरपणा करून पुढें फसगत करून घेण्यापेक्षां हळूं हळूं प्रगति करीत जाणें फार उत्तम.

" यापुढील महत्त्वाचा विचार म्हणजे ' सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ' पैसे कोठून आणावयाचे? लोककार्य फुकटचें नसतें. तें कांहीं जेवण नाहीं. शरीराची झीज व पैशाचा होम यांच्या मोलाशिवाय लोककार्य पदरांत पडत नाहीं. पैकीं शरीराची झीज सोसणें पुष्कळांस शक्य असतें; परंतु पैशाची व्यवस्था कशी करावयाची ? सगळीं सोंगें करतां येतात, पण पैशाचें व पोटाचें सोंग करितां येत नाहीं असें म्हणतात तें खोटें नाहीं. तेव्हां देशाच्या दरिद्रतेला यमसदनाला पाठविण्याच्या उद्योगास कमजास्त प्रमाणानें मदत करण्याला उदार धनिकांनीं पुढें चढाओढीनें सरसावलें पाहिजे हें सांगणें नलगे ! शिवाय हेंहि विसरतां कामा नये कीं, श्रीमंतांनीं एकदांच दिलेल्या अवाढव्य रकमेपेक्षां गरीबांनीं वरचेवर दिलेल्या कवड्याच फार उपयोग करतात. तेव्हां गरीबांनींहि या कामांत धोतर झाडून उपयोग नाहीं.

" यावर असा आक्षेप येईल कीं, अगोदरच पैसा दृष्टीस पडण्याची मारामार, त्यांत अनेक सरकारी कर, शिवाय अमुक फंड, तमुक फंड आहेतच. अशा स्थितींत आणखी एका संस्थेनें जन्मास येऊन लोकांचे पैसे उकळण्याच्या कामांत आपलेंहि एक घोडें सर्वांबरोबर दामटण्याचा प्रयत्न करावा हें योग्य नाहीं.

त्या संस्थेतून तयार झालेली मंडळी रोज श्रीकृष्णास, इंदूस व गोकूळदासास दुवा देतात इतकेंच नव्हे, तर त्या संस्थेस ते स्वतांस वाहून घेऊन देशांतील

---

सकृद्दर्शनीं वरवर पहाणारांस या आक्षेपाचें बरेंच महत्त्व वाटेल; परंतु किंचित डोकें खाजविल्यास त्याचा पोकळ फोलपणा तात्काळ दिसून येईल. श्रीमंतांच्या वर्तानें अशी तक्रार होणें शक्य नाहीं; ती गरिबांच्या बाजूनें होणार हें निर्विवाद आहे. तथापि त्यांच्या तर्फेंहि अशी तक्रार करण्यास सबळ जागा नाहीं. गांवांतील साधारण स्थितीच्या प्रत्येक घराचा वर्षांतून एक रुपया तरी दानधर्मांत खर्च होतोच होतो. तेव्हां संस्थेस देऊन तो रुपया मिळवून सर्व भिकाऱ्यांस भिक्षा मागण्यास आमचेकडे पाठवा, आम्हीं त्यांची व्यवस्था लावतों असें लोकांस सांगावयाचें—नव्हे अभिवचन द्यावयाचें."

"असेंहि केलें तरी सर्वच लोक पैसे देण्यास तयार होतीलच असा नियम नाहीं. किंवा झालेच तर दारावर आलेल्या गलेलठ्ठाला भिक्षा घालणार नाहींत अशी कांहीं हमी देववत नाहीं. परंतु या बाबतींत लोकांचीं मनें तयार करणें व निढळ्या घामाची महती निलाजरेपणानें भिक्षा मागणाऱ्या आपल्या बांधवांच्या मनावर बिंबवून त्यांस त्यापासून परावृत्त करणें हें सुशिक्षितांचें आद्य कर्तव्य आहे. तें त्यांनीं प्रामाणिकपणानें बजावावयास नको का?" )

"याप्रमाणें व्यवस्था झाली तरी आजच सर्व भिकारी नष्ट होणें शक्य नाहीं. आणि जगाच्या अंतापर्यंत भिकारी नष्ट होणें शक्य नाहीं. कारण सार्वजनिक संस्था एका दृष्टीनें भिकारीच होत. तेव्हां त्या नष्ट होऊन कसें चालेल? शिवाय म्हातारे कोतारे, अंधळे, पांगळे, लंगडे वगैरे लोक जगांत राहणारच. त्यांची कांहीं तरतूद करणें जरूर आहे. त्यांस दारावर भिक्षा वाढूं नये असें म्हटल्यास कसें चालेल? पण सांप्रतच्या सुधारणेच्या काळांत त्यांची दारावर भिक्षा न वाढतां त्यांची तरतूद करणें शक्य आहे. उपरिनिर्दिष्ट संस्थे सारख्या संस्थेंत त्यांचा हरएक तऱ्हेनें उपयोग होईल. तात्पर्य लोकोपयोगी सार्वजनिक संस्थेसारख्या उच्च भिकाऱ्या शिवाय इतर भिकाऱ्यांचा आज ना उद्या समूळ उच्छेद होईल अशी व्यवस्था करावयाची"

"बरें, वरील सारख्या संस्थेंत सर्वच मुलें घेतां येतील काय अशी

गलेलठ्ठ भिकाऱ्यांचा नायनाट करण्याकरितां ते त्या संस्थेच्या ठिकठिकाणीं शाखा काढीत आहेत. आणि त्यांच्या वाढत्या उत्साहाच्या कमालीच्या व झपा

---

कोणी पृच्छा करण्याचा संशयम तरी संभव आहेच. परंतु त्यास सरळ, सोपें व स्पष्ट उत्तर इतकेंच कीं सर्व मुलें घेतां येणें अशक्य आहे. सहासांत वर्षांच्या आंतील मुलें आपल्या आईबापावर विशेष अवलंबून असल्यामुळें त्यांची बरदास्त योग्य तऱ्हेनें राखतां येणें अशक्य आहे. आतां अशाहि तऱ्हेचीं पोरकीं मुलें असल्यास संस्थेनें त्यांचा स्वीकार अवश्यमेव केला पाहिजे.

"यापुढील शेवटचा पण सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या संस्थेचा शिक्षणक्रम कसा आखावयाचा? तो प्रश्न तज्ज्ञांनीं सोडविलेला बरा. तथापि प्रस्तुत लेखकानें व त्याच्या सहकाऱ्यांनीं आपल्या अल्पबुद्धी प्रमाणें तो असा सोडविला आहे.

( १ ) पोटापुरतेंच म्हणजे व्यवहारापुरतेंच त्यास लिहिण्या वाचण्यास शिकवावें. एकादा यांतच विशेष तऱ्हेनें एकादा नांव काढील असें वाटल्यास, त्यास भरपूर शिक्षण देण्यास हरकत नाहीं.

( २ ) प्रत्येकास कोणत्या तरी एका धंद्यांत पूर्ण निष्णात करून सोडावें दुसऱ्या धंद्यांची भूलभूत माहिती द्यावी.

( ३ ) प्रत्येक गोष्टींत स्वावलंबनाचा धडा गिरवून घ्यावा.

( ४ ) शारिरीक व्यामाच्या अवश्यकतेचा ठसा त्यांच्या मनावर उमटवून त्यांच्या कडून नियमित शारीरिक व्यापार करून घ्यावा.

( ५ ) आपल्या पुण्य देशाच्या सोज्वल इतिहासाचा व सत्पुरुषांच्या पवित्र चरित्राचा अभ्यास करून त्यास शुद्धाचारी, स्वाभिमानी व स्वदेशाभिमानी बनवावें.

" वरील योजनेपेक्षां सरस, सुरस व सोपी योजना सुचविली नच गेल्यास एक महिन्यानें आम्हीं नारायण नगरींतील गुरुवारच्या श्रीमंत पटवर्धनांच्या वाड्यांत 'दीन शिक्षण संस्था' काढणार आम्ही संस्था काढल्या नंतर एकादी योजना सुचविली गेल्यास तिचा आनंदानें स्वीकार करण्यास आम्हीं एका पायावर तयार आहों."

त्याच्या प्रयत्नांस अजब व अपूर्व, यश येत आहे, हें पाहून कोणाचें अंतःकर समाधानानें उचंबळून येणार नाहीं ? नारायणनगरींतील दारूच्या गुत्तेवाल्या

---

" प्रस्तुत लेखकास ज्यांनीं निरपेक्षा बिनमोल सहाय्य मध्यान्हरात्रीस सु देण्यास मागें पुढे पाहणार नाहीं असा हातावर हात मारला आहे, त्यां उपकार फिटणें शक्य नाहीं. उपकाराखालींच सदैव वाकावें अशी इच्छा आ

" आम्हीं सुचविलेल्या अगर दुसऱ्या एकाद्या उपायानें देशाच्या प्रगती कीड लावणारें गिकार मित्रांच्या प्रेमळ व निरपेक्ष मदतीनें, जनतेच्या अभि दनीय सहानुभूतीनें, सत्पुरुषांच्या अधिकारयुक्त अशीर्वादानें आणि करुणासा राच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं कृपेनें, कायमचें नष्ट होवो एवढीच इच्छा आहे "

वरील लेख प्रसिद्ध झाल्यावर पुढील अंकांत भारतभक्तकारांनीं त्याव अग्रलेख लिहिला होता. तो सर्व न देतां त्यांतील मुख्य भाग देतों. कार त्यांच्या अभिप्रायाला बरेंच महत्त्व आहे.

" मायबाप सरकारनें प्रजेच्या कल्याणार्थ याहि बाबतींत हात घाल अवश्य आहे. परंतु ज्या अनेक गूढ, अगम्य व अतर्क्य गुलदस्त्यांतील कारणां मुळें त्यास तसें करतां येत नाहीं तीं कारणें पडद्याबाहेर येतील काय ? येवोत अथवा न येवोत, आपल्या पायावर उभें राहून " उद्धरेदात्मनात्मानं या न्यायानें कांहीं मंडळींनीं जो अभिनंदनीय उपक्रम सुरू केला आहे त्यां महात्म्य और आहे. त्यांनीं लोकांपुढें मांडलेल्या योजनेवर अनेक आक्षे येतील यांत शंका नाहीं. परंतु प्रस्तुत परिस्थितीचें परीक्षण व निरीक्षण करत दुसरी एखादी सरस, सुरस व सोपी योजना सुचविली जाईल असें वाटत नाहीं गोकुळदास व त्यांचे साह्यकारी यांस केव्हांहि व कोठेंहि शक्य ती मदत देण्या भारतभक्त कुचराई करणार नाहीं. इतकेंच नव्हे तर तशी मदत देण्यांत आपणांस धन्य–त्रिवार धन्य समजेल. मंडळींच्या प्रयत्नास यश येवो अ आम्हीं इच्छितों. "

श्री० ' चष्मा ' कार आपल्या त्याच दिवशींच्या एका स्फुटांत म्हणतातः—

" योजना उत्तम आहे हें जन्मांधदेखील सांगेल बिनअकली मूर्खां देखिल कांहीं बरळत सुटतां यावयाचें नाहीं. शहाणा तर आक्षेपाचें नुसतें नांवसुद्ध

निम्मे उत्पन्न नाहींसें करणाऱ्या श्रीकृष्णाचे अनुयायी बाकीचें निम्मे उत्पन्न नाहींसें करण्याच्या उदात्त खटपटीला सारखे बसलेले पाहून गादीवर लोळतपडणाऱ्या व दिवसांतून चोवीस तास, ताटावरूनपाटावर व पाटावरून ताटावर करणाऱ्या नामधारी देशभक्तांस लाज वाटल्याशिवाय कशी राहील ?

संस्थेच्या शाळेंत औद्योगिक शिक्षणाला सर्वांपेक्षां जास्त प्राधान्य व महत्त्व दिलें असल्यामुळें देशी उद्योगधंद्यावर प्रस्तुतकालीं बसलेला भस्मासुरी बहिष्कार लवकरच पूर्णपणें उठेल अशी आशा कोणाच्या मनांत डोकावणार नाहीं ? आपल्या अनुयायांच्या आल्हादकारक व अभिनंदनीय आग्रहावरून नाइलाजानें संस्थेशीं प्रत्यक्ष संबंध तोडावा लागला तरी इंदूहि त्या संस्थेवर पूर्वव्रत मातेप्रमाणें प्रेम करिते आणि तिच्या उत्कर्षाकरितां कायावाचामनानें झटतें हें पाहून कोणास कौतुक वाटणार नाहीं ? श्रीकृष्णानें लावलेल्या या संस्थारूपी रोपट्याचा इतका मनोहर वृक्ष पाहून कोण साश्चर्य आनंद मानणार नाहीं ? दीनाशिक्षणसंस्था सहा महिन्याची झाल्यावर पंकींरुतलेल्या एका गाईच्या उद्धाराबद्दल श्रीकृष्णाचे गोडवे कोण गाणार नाहीं ? साळ्यांचे शेजारी श्रीमंत भाऊसाहेब, आपल्या अप्सरेसहि खालीं मान घालविणाऱ्या आपल्या अमल अर्धांगीस सोडून, नातें उकरून आलेल्या आपल्या कुठल्याशा छचोर, नीच व ' गुप्त विश्वयोषिता ' बनलेल्या विधवा मेव्हणीच्या नटव्यामुरडण्याला भाळून, त्यांची माती झाल्यामुळें चिखलांत रुतलेल्या त्यांच्या एकनिष्ठ पतिव्रतापत्नीस अतर्क्य शक्तीच्या जोरावर बाहेर काढून भाऊसाहेब व त्यांची ती मेव्हणी यांच्या डोळ्यांत चर-

---

काढणार नाहीं. दुसरी एखादी सरस, सुरस व सोपी योजना एखाद्या डोक्यांतून निघेल हें संभवनीय वाटत नाही. तथापि प्रस्तुत योजना बरीच कठीण असून स्वार्थाचा—सर्व प्रकारच्या स्वार्थाचा बळी मागणारी आहे. मंडळी अशी तशी लेचीपेची नाहींत. आणि ती मागें घेणार नाहींत. आम्हीं शक्य ती मदत करण्यास तयार आहों. परमेश्वरी कृपेनें कार्य एकनिष्ठपणें शेवटास जावो ''

चष्माकार बड्या धेंडांत मोडतात असें प्रभाकर म्हणतो, आणि त्याच्याच शिफारशीवरून वरील उतारा घेतला आहे.

चरीत अंजन घालून त्यांचे डोळे निवळल्याबद्दल श्रीकृष्णाची स्तुति कोण करणार नाहीं ? जन्माचें मातेरें होऊन स्वतःस पोतेरें होऊन राहण्याची पाळी येत असतां, श्रीकृष्णानें ती येऊं दिली नाहीं याबद्दल भाऊसाहेबांच्या पत्नी, त्यांची रोज आठवण करीत असतातच; पण स्वतः भाऊसाहेब व त्यांची मेव्हणीहि कुमार्गाच्या क्रूर जबड्यांतून आपली सुटका केल्याबद्दल त्याला पदोपदीं, क्षणोक्षणीं, पळोपळीं धन्यवाद देत असतात. कां देणार नाहींत ? आपल्या विलासांनी अप्रत्यक्षपणें—नव्हे धडधडीत भ्रमरपत्नीच्या जन्माचें वाटोळें करणारे कमलिनी आणि भ्रमर सूर्यानें आपल्या प्रखर किरणांनीं त्यास ताळ्यावर आणल्यावर सूर्याचे धन्यवाद गाइल्याशिवाय कसे राहतील ? निरपराध्यास विनाकारण शिक्षा होत असतां तिचें 'निराकरण' स्वतः शिक्षा भोगण्यास तयार होऊन केल्याबद्दल श्रीकृष्ण कोणाच्या प्रशंसेस पात्र होणार नाहीं ? आप्पासाहेबांच्या येथें, प्रभाकराच्या पूर्वीच्या शेजाऱ्याच्या येथें पांचशें रुपयांची चोरी झाल्यामुळे त्यांच्या येथें विद्याभ्यासास असणाऱ्या विनायकावर चोरीच्या आरोपाचा निष्कारण नाहक हल्ला झाला आणि त्याला पोलीसच्या स्वाधीन केल्यामुळें मिळालेल्या फटक्यांनीं त्यास दे माय धरणी ठाव होऊन गेलें हें ऐकूनच श्रीकृष्णाचें काळीज कसें चर्रर्र होऊन गेलें ! विनायकासारख्या सद्गुणी मुलावर आप्पासाहेबांसारख्या अनुभवी व समंजस गृहस्थानें चोरीचा आरोप करावा हेंच त्यास संभवनीय वाटेना. पण संशयपिशाच्चानें मनुष्य एकदां कां ग्रस्त झाला कीं संपलें ! मग कल्पनासृष्टींत अशक्य भासणाऱ्या व असणाऱ्या गोष्टीसुद्धां खऱ्याखुऱ्या सृष्टींत देखील घडूं लागतात. विनायकाला बेदम मारिलें, अवघड ठिकाणीं चाप लाविला, त्याचें इकडचें मुस्काट तिकडें फिरविलें, तरीसुद्धां विनायक कबूल झाला नाहीं. होणार कसा ? जे केलें नाहीं तें केलें असें म्हणणें रौरवापलीकडच्या नरकांतील यातना सोसाव्या लागल्या तरी, सत्यप्रिय व सदाचारी माणसांच्या हातून कालत्रयींहि घडणें नाहीं. तथापि सत्त्वपरिक्षेंत उत्तीर्ण होण्यांत कदाचित विनायकाचा अंत व्हावयाचा, आणि जगाच्या जगल्या जामदारखान्यांतील एक मूल्यहीन माणिक हरपावयाचें ! अशी पक्की जबरदस्त धास्ती श्रीकृष्णास पडल्यामुळें त्यानें आपण होऊन सरकारास असा विनंति अर्ज केला कीं, चोर सुटून एका निरपराध्या प्रायश्चित्त मिळणें चांगलें नाहीं. श्रीकृष्ण स्वतः चोरी करून बाहेर आल्यावर ए

भामट्यानें चोरावर मोर होऊन त्याजवळचा सर्व माल लांबविला. तथापि आप्पासाहेबास लुबाडणारा प्राणी श्रीकृष्णच. तेव्हां त्यास पकडून योग्य शिक्षा ठोठावण्यांत यावी! या अर्जाचा पूर्ण विचार होऊन आणि चौकशी अंतीं विनायक चोर असणें शक्य नाहीं असें ठरून विनायकास मोकळा करण्यांत आलें, आणि श्रीकृष्णास पकडण्याचा हुकूम सुटला. श्रीकृष्णास धरणें आलें त्या वेळीं मीहि त्यांची या कामांत भागीदार होतें वगैरे अर्थाच्या शब्दांनीं शिपायांच्या मनाची इंदूनें अशी बालंबाल खात्री पटविली कीं, ती चोरीच्या कामांत त्याची मदतनीस होती. शिपायांनीं दोघांसहि कडी घातली आणि चतुर्भुज करून बिनभाड्याच्या खोलींत नेऊन ठेविलें. काय पुटपुटला? विकतचें श्राद्ध घेऊन तर्पण करीत बसायला श्रीकृष्ण व इंदु यांस सांगितलें होतें कोणीं? हें सांगायला हवें कां? सज्जनांचा, चांगल्या माणसांचा निष्कारण छळ झालेला ज्या स्वभावाला खपत नाहीं त्याच स्वभावानें त्यांना सांगितलें. काय, श्रीकृष्ण आणि इंदूसारख्या माणसांनीं असत्याची कास कां धरली? गरीब सज्जन गाय बिनकाळजाच्या कसाबाच्या तडाक्यांतून फक्त असत्य भाषणानें जर सुटत असली तर असत्याचा अवलंब केल्यास काय हरकत? अशा तऱ्हेचा खोट्याचा स्तुत्य, स्पृहणीय, उदात्त व स्वर्गीय अवलंब केल्याबद्दल श्रीकृष्ण व इंदूस बंदिवासाची हवा दोन महिने खावी लागली. या मुदतीच्या अखेरीस पोलिसतपासानें मुद्देमाल चोरी सांपडली. कोर्टापुढें गोळा झालेल्या साक्षीपुराव्यावरून श्रीकृष्ण व इंदु हीं दोघेहि सन्माननीय माणसें असून कुकर्माबद्दल त्यांच्या मनांत स्वप्नातल्या स्वप्नांतहि वासना उत्पन्न होणें शक्य नाहीं. आणि केवळ विनायकासारख्या सद्गुणी व निरपराधी विद्यार्थ्याच्या हालअपेष्टा चुकविण्यासाठीं स्वतः हालअपेष्टा भोगण्यास तीं तयार झालीं असें सप्रमाण सिद्ध झालें. परोपयोगी निर्दोषी श्रीकृष्ण व इंदूस ज्यानें त्यानें सादर शाबासकी दिली. त्यांची निष्काम परोपकृति पाहून आप्पासाहेबांचा आनंद गगनांत मावेना. त्यांनीं श्रीकृष्ण व इंदूस पांच हजार रुपये बक्षीस देण्यास काढलें. परंतु कर्तव्य म्हणून केलेल्या कामगिरीबद्दल बक्षीस घेणें केव्हांहि योग्य नाहीं असें त्यांनीं नम्रपणें आप्पासाहेबांस कळविलें. परंतु आप्पासाहेब अगदींच ऐकेनात तेव्हां बक्षीसच द्यावयाचें झाल्यास तें आम्हांस न देतां तें विनायकास दिल्यास आम्हांस द्विगु-

णित आनंद होईल असें त्यांनीं कळविलें. श्रीकृष्ण व इंदु शरीरानें निराळीं असलीं तरी आत्म्यानें, मनानें, इच्छेनें, भावनेनें एक अशी आपली दृढ खात्री झाल्यानें तें कोणा तरी देवाचे दोन अवतार आहेत असें समजणाऱ्या विनायकानें त्यांचा प्रसाद म्हणून त्या बक्षिसाचा स्वीकार केला, आणि श्रीकृष्ण चारित्र्यापासून 'स्वकष्टानें मिळविलेला पैसा आपला नव्हे' हा धडा घेऊन त्यानें ते सर्व पांच हजार रुपये 'दीन शिक्षण संस्थेस' कृतज्ञतापूर्वक अर्पण केले. शिवाय त्या संस्थेची आमरण सेवा करण्याचें कडकडीत व्रत उचललें तें निराळेंच! मोठमोठ्या वृत्त पत्रांतून या त्रयीची केवढी स्तुति झाली! तथापि निंदास्तुतिवर काठी लावणाऱ्यास त्याचें काय? आपण कांहीं शतकृत्य केलें असें त्याला मुळींच वाटलें नाहीं. अभिमानाचा वासही त्यास नव्हता. गर्वाचा गंधही त्यास शिवला नाहीं. कसा शिवणार? श्रीकृष्णास तर मुळींच शिवणें शक्य नाहीं. दादासाहेबांचें आवडतें पद तीनत्रिकाळ तोंडांत असतां गर्वानें ढुंकून पाहण्याची काय प्राज्ञा आहे? त्याची काय बिशाद आहे? त्या पदाचा* साग्र अर्थ डोळ्यापुढें बारान् बारा चोवीस तास वावरत असतां गर्वानें वाकडी नजर फेकण्याची

---

पद साधारणच आठवत असल्यामुळें विश्राम मासिकांतून घेतलें आहे. पद कै० दादासाहेबांचें आहे.

* व्यर्थ गर्वास दे स्थान नर अंतरीं।<br>
काळ शेंडी सदा आपुल्या करिं धरी ॥ ध्रु०॥<br>
गगनिं माध्यान्हीं जो सूर्य बहु तळपतो।<br>
काळ जातां बने बापुडा तो परी ॥ १ ॥<br>
उष्ण कालीं नदी खिन्नता स्वीकरी।<br>
वृष्टि होतांच जी आढ्यतेला धरी ॥ २ ॥<br>
पौर्णिमेला मदें चंद्र जो चमकतो।<br>
अन्य दिवशींच तो क्षीणतेला वरी ॥ ३ ॥<br>
पर्णपुष्पां तरु माधवीं मिळविती।<br>
ग्रीष्मिं दारिद्र्य त्या मार्जितें बहु परीं ॥ ४ ॥

काय छाती आहे? आणि गर्वाचेंच कशाला? श्रीकृष्णाकडे वाकडी नजर करण्याची कोणाचीच ताकद नव्हती. विक्रांतानें जहाल जहाल तोडले पण काय उपयोग झाला? त्याच्यासारख्या अपकाऱ्यावर सुद्धां उपकार केल्यानें सरतेशेवटीं स्वतःची स्वतःला लाज वाटून तो शरमला आणि निवळला नाहीं कां? एका भिकार नाटक कंपनीस पैसे मिळेनात. कारण, तिला उत्तम मुख्य स्त्रीपार्टीची तात्काळ निदर्शनास येणारी वाण होती. तेव्हां आमच्या विक्रांतानीं दिली थाप ठेवून कीं, करील श्रीकृष्ण काम म्हणून. कंपनीची दैना दैना पाहून श्रीकृष्णानेंहि कबूली दिली. आणि पुढें आठ दिवसांनीं प्रयोग झाल्यावर पुढच्या ओळीने त्याच नाटकाच्या तीन प्रयोगास अपरंपार उत्पन्न झालें. केवळ श्रीकृष्णाचें काम पहाण्याकरितां नाटकगृहाकडे झुंडीच्या झुंडी लोटत असत. श्रीकृष्णाची नाट्याभिनय कुशलता काय नमुन्याची होती हें पहावयाचें असेल तर आमच्या पंतांचें काम पहा. पंत म्हणजे वल्ली आहे! नाट्याभिनयांत श्रीकृष्णावर त्यांनीं ताण केली आहे, म्हटलें तरी चालेल. पण पंतांचे गुरुजी कोण ठाऊक आहेत कां? श्रीकृष्ण. असल्या श्रीकृष्णानें आपलें कल्याण केल्यावर पंधरा हजार रुपये त्यांनीं दीन शिक्षणसंस्थस दिले असल्यास नवल काय? त्यांनीं त्यास आपल्या कंपनींत राहण्यास किती विनविण्या केल्या, किती लालुची दाखविल्या किती मोह घातले, किती महत्त्वाकांक्षेच्या झाडावर चढविलें, पण व्यर्थ. त्यायोगें कारणावांचून प्रसिद्धि वाढत जावयाची, अशी त्यास सबळ भीति वाटत असलेमुळें त्यानें तें नाकारलें हें साहजीक लक्षांत नाहीं कां येणार? नाट्यकला व्यसनी फंदी व हलकट लोकांच्या हातीं पडल्यामुळें तिचे निघत असलेले धिंडवडे काळीज करपीत असल्यामुळें सुशिक्षितांनीं—निर्व्यसनी, शुद्धाचारी व सभ्य सुशिक्षितांनीं आपल्या हातीं घेतल्यास, नेहमी मदत करण्यास तयार असलेल्या श्रीकृष्णानें आपण होऊन चालत आलेल्या योगाला कां लाथ मारली, हीच तुमची शंका ना? पण त्याच्याप्रमाणेंच जर चार लोक आले असते, तर त्याचा जगाच्या पुढें पुढें न येण्याचा हेतु सफल झाला असता; परंतु तशा स्थिति नसल्यामुळें आकाशिच्या असंख्य तारकामध्यें चंद्र जसा तेजोबलानें अलग ओळखतां येतो, त्याचप्रमाणें त्याची स्थिति झाली असती. आणि त्याचा तर त्याला मनापासून कंटाळा असे. काय म्हणतां, या बाबतींत

त्यानें सुशिक्षितांचें मन वेधण्याचा कधीं प्रयत्न केला होता कां? हा तुमचा प्रश्न अस्थानीं नाहीं कां? एखाद्या विषयाची हृदयाला चुटपुट लागल्यावर सामान्य माणसेंहि जर त्या विषयाचा पिच्छा पुरवितात, तर श्रीकृष्ण स्वस्थ बसेल कां? प्रसंग येईल तेथें तो सुशिक्षितांचें मन इकडे वळविण्याचा प्रयत्न करांच करी, पण लेखनद्वारेंहि त्यानें बराच प्रयत्न केला आहे. विश्वोपवनांतील त्याचे या विषयावरील मार्मिक, चटकदार व हृदयंगम लेख आपण वाचले नाहीत काय? वाचले नसल्यास एकवार अवश्य वाचा अशी आमची खास शिफारस आहे. काय कुजबुजलांत? त्या मासिकाच्या कोणत्याहि अंकांत श्रीकृष्ण लेखक सांपडत नाहीं? 'नाट्याभिमानी' या टोपण नांवाखालीं त्या मासिकांत प्रसिद्ध झालेले लेख कोणाचे? ते कमलेच्या नांवावर श्रीकृष्णानें जरी धाडले असले तरी ते श्रीकृष्णानें लिहिले आहेत हें आम्हांस पक्कें ठाऊक आहे. त्याच्या भाषेचा साधा नमुना आम्हीं मागें दिलाच आहे. त्यानें लेखन विशेष न केल्यामुळें चांगल्या नाणावलेल्या लेखकांत त्याचें नांव घ्यावयाचें कीं नाहीं तें वाचकवर्गावरच सोंपवितों.

असो. यापुढील त्याचें आयुष्य रेखाटण्यास आम्हांस मुळींच उत्साह नाहीं; लेखणी अडखळते; आणि डोळ्यांस अश्रूंच्या धारा लागतात. तथापि स्वेच्छेनें आणि मित्रेष्टांच्या आज्ञेनें अंगावर घेतलेल्या जबाबदारींतून कसें तरी निभावून निघालें पाहिजे, म्हणून उसना उत्साह आणला पाहिजे, लेखणीला पुढें खमाटून दामटली पाहिजे आणि अश्रू डोळ्यांतल्या डोळ्यांतच आटवले पाहिजेत. हें बोलणें जितकें सोपें तितकें करणें कठीण हें आम्ही जाणतों परंतु तसें करण्याचा प्रयत्न तरी केला पाहिजे. श्रीकृष्णाची दुःखपरंपरा चित्ररूपानें डोळ्यापुढें उभी राहिली, म्हणजे कांहींच सुचत नाहीं. आम्हांस जें काय होतें तें होतें. आम्हांस काय होतें याची यथार्थ कल्पना येण्यास आम्हीं इतके हातास असतां वर्णनाचा आरसा कशाला पाहिजे? आणि आम्ही असे काय आकाशांतून पडलों आहों कीं आमचे हृदयाचें हुबेहूब प्रतिबिंब दाखविणारा वर्णनाचा आरसा तुमच्यापुढें उभा करूं शकूं? सहानुभूतीच्या सुंदर चौकटींत तादात्म्याचीं भिंगें बसवून तो चष्मा डोळ्यास लावला कीं परकेपणाचा पडदा आपोआप दूर सरून

आमचें हृदय कोणासही स्पष्ट दिसेल. कोणास पाहवयाचें असल्यास खुशाल पहावें, आमची ना नाहीं. आम्ही मात्र चोवीस तास पहात असलेले, रात्रंदिवस आमच्या डोळ्यापुढून न हलणारे, अष्टौप्रहर आमच्या आठवणीस अगदीं पच्छाडून बसलेले श्रीकृष्णावर कोसळलेले दुःखप्रसंग तुम्हांस कसेतरी सांगणार. नाटक कंपनीच्या हितार्थ इतकी शारीरिक, मानसिक व बौद्धिक मेहनत घेतल्यामुळें त्याचा परिणाम त्यास चांगलाच भोंवला! स्वताच्या माहितींतले सर्व औषधोपचारांनीं आपले हात टेकले. डॉक्टरी औषधांची भाडोत्री घोडींतर चालेनातच, पण कसलेल्या वैद्यांचेही उपाय थकले. भरपूर दोन महिने आंथरूण धरून बसलेला श्रीकृष्ण अगदीं निश्चेष्ट पडला, त्याची दोरी तुटली अशी जवळ जवळ सर्वांची खात्री झाली, इंदुच्या डोळ्याचें तर पाणी खळेना. अशा स्थितींत साठ्यांच्या मातोश्री गाणगापुराहून आल्या नसत्या तर काय ब्रम्हघोटाळा झाला असता ते एका सर्वज्ञान्यालाच ठाऊक! त्यांनीं आल्यावर आपल्या एका पुराण्या बटव्यांतून एक रामबाण मात्रा काढून तिचे दोन वेढे उगाळून श्रीकृष्णास दिले. त्या सरसा तो शुद्धीवर आला. पुढें दोन महिन्यानंतर तो माणसांत पडून त्यास कांहीं दिवस जातात तोंच कमलेस कांहीं दिवस गेल्याची वार्ता पत्रद्वारें आली. तिच्या भेटीला श्रीकृष्णास आमंत्रण असलेमुळें तो तेथें गेला, बंधुभगिनींच्या, व मेव्हण्यामेव्हण्याच्या प्रेमपुरःसर भेटी झाल्यावर दोनदिवस सुखांत गेले. पण पुन्हां नशिबानें उलट खाल्ली. दहा पांच हातावर रहात असलेल्या एका रंगाऱ्याचा निसर्गनियमाप्रमाणें वयाच्या नव्वदाव्या वर्षीं अंत झाला! पण कुटुंबाचा पोशिंदा नाहींसा झाल्यामुळें त्याच्या बायकोमुलांस जें अनिवार दुःख झालें तें ऐकवत सुद्धां नाहीं. स्वतांच्या संसारसागराचें आशाजळ आटल्यामुळें या जगांत तळमळत राहण्यापेक्षां एकदम नाहींसे झालेलें बरें असें वाटून त्या मृतरंगाऱ्याच्या बायकोनें अफू मुकाट्यानें कोणास न कळत खाऊन आत्महत्या केली! तिच्या मरणानंतर, दुःखांधकारांत दडून राहिलेल्या जगांतील सुखप्रकाशाचा शेवटचा किरण नाहींसा झाल्यानंतर, संकट समुद्रांत बुडत असतां हातीं राहिलेला शेवटचा काडीचाही उपयोग तुटल्यानंतर समाधानाचा सरशेवटच ही देदिप्यमान धागा जळून खाक झाल्यानंतर, त्या रंगाऱ्याच्या दोन मुलींस त्या आठ दहा वर्षांच्या दोन अजाण अर्भकांस, मृतमातापितरांच्या ग्रस्त झालेल्या त्या दोन कोमल स्मारकांस, काय झाले असेल, त्यांच्या

त्या वेळच्या भावना काय असतील, त्यांच्या हृदयांत कसल्या भावनांचे वादळ उठून काहूर माजून राहिलें असेल, त्यांचे त्यानांच माहीत! अशा स्थितींत सहानुभूतीपर बोलकी हळहळ दाखविणारें फार, पण कृतीनें दुःखमार्जन करणारे सत्पुरुष फारच विरळे श्रीकृष्णास उडत उडतच बातमी लागली तेव्हां तो तेथें गेला आणि त्या निराश्रित बालकांस त्यानें जवळ आणलें. परंतु त्यांतील मोठ्या बालिकेच्या अकस्मात् मृत्युचें खापर श्रीकृष्णाच्या माथीं फुटावें असा योगायोग होता. रात्रीं निजलेल्या बालिकापैकीं सकाळीं थोरलीचें प्रेत अंथरूणांतून काढावें लागावें यापरता दुष्ट दुर्दैवानें आपला वचपा कसा दाखवावा! आठदिवसाच्या आंतबाहेर रंगाच्याच्या मालमत्तेची व्यवस्था पंचामार्फत व्यवस्थित लावून रुस्तुमला घेऊन तो नारायणनगरीस परतला. दीनशिक्षणसंस्थेंत रुस्तुमची व्यवस्था लावून द्यावी असे प्रभाकर साठे वगैरेनीं त्यांस सांगितलें. परंतु कमलेला वचन दिल्याप्रमाणें त्यानें तिला इंदूच्या स्वाधीन केलें. रुस्तुम आपल्या पतिसमवेत सुखानें हैदराबादेस जरी आज नांदत असली तरी ती इंदूस मातेच्या ठिकाणीं मानते, आणि तिनें आपल्या मातापितरांचे सर्व जिन्नस दीनशिक्षणसंस्थेस' अर्पण केले आहेत. इंदूहि तिला आपल्या मुलीप्रमाणें समजते. दोघी वर्षातून सात आठ वेळां भेटल्याशिवाय रहात नाहींत. आणि त्यांच्या प्रेमपूर्ण भेटीचें कोणासही कौतुक केल्याशिवाय राहवणार नाहीं.

कल्याणहून नारायण नगरीस आल्यावर पश्चिम समुद्रांत सूर्यानें जीव देण्याचा तीनदांच प्रयत्न केला असेल! वसंतरावांच्या इकडून तार—निकडीची तार आल्यामुळें श्रीकृष्ण एकदम मुंबईस चालता झाला. तेथें जातो तों वसंतरावांची सर्व मंडळी बेशुद्ध स्थितींत! शेजारचे लक्ष्मणराव हुबळीकर माणुसकीला ओळखून, शेजारधर्म पाळून, त्यांच्या औषध पाण्याची सोय करीत असलेले आढळले. डॉक्टर, वैद्य वगैरे आपआपली शिकस्त करीत होते! उमाबाई मात्र उगाळण्यांत, चाटणें करण्यांत, काढे शिजविण्यांत गुंतलेल्या आढळल्या! गेल्याबरोबर श्रीकृष्णहि त्या सर्व उदार, व दीलदार आणि दयाळू मंडळीस मदत करूं लागला! वसंतरावास जरासा आराम वाटूं लागला! दोन दिवसांनीं त्यांच्या सौभाग्यवतीची प्रकृति बेतावर आली. चार आठ दिवस कांहीं

सुखासमाधानाचे गेले. वसंतरावांच्या मुलाची, त्यांच्या बहिणीची आणि त्यांच्या भाच्याची प्रकृति भिण्याचें कारण नाहीं असें मुक्या स्वरानें सांगू लागली. आपला भोग संपला असें वसंतरावांस वाटूं लागलें. श्रीकृष्णाचा जीव खालीं पडला. आकाशांत वणवण हिंडणारा सूर्य अमेरिकेवरून सातदां जाऊन आला. आणि दुसरे दिवशीं पुन्हां दुखणें उलटलें! लखुनाना, उमाकाकू, डॉक्टर वेडे यांच्या अंतःकरणांत, स्वतांच्या खटपटीचें चीज झाल्याचें अवतरलेलें समाधान सर्वस्वीं संपुष्टांत आलें! श्रीकृष्णाची स्थिती भ्रमिष्टासारखी झाली! वसंतरावांच्या हातास आलेल्या मुलास व भाच्यास विलक्षण वायु झाला! ते कांहींच्या बाहीच बरळूं लागले! वसंतरावांच्या केशवानें तर हातास येईल त्यास मारण्यास सुरवात केली! श्रीकृष्णास तर अशी जखम झाली कीं ज्याचें नांव तें! दोघांचीहि आशा दिसेना! लखुनाना, उमाकाकू, वेडे डॉक्टर सर्वजण होते! श्रीकृष्णानें केलेली तार पोचल्याबरोबर निघालेले साठेहि तेथें आले! दोन तास चिंतेमध्यें गेले! पांच वाजण्याची वेळ झाली! यावेळीं वसंतराव जागे होते पण सरस्वतीबाईंस गाढ झोंप लागली होती! केशव व विश्वनाथ यांनीं गरगर डोळे फिरविण्यास सुरवात केली! दहा पांच सेकंदांत सरस्वतीकाकूस जागे केलें! त्यांनीं केशवाचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें! विश्वनाथ आपल्या आईच्या मांडीवर डोकें ठेवून निजला होताच! दोघांची उचक्या देण्यास सुरवात झाली! तिसऱ्या उचकीबरोबर केशवानें डोळे मिटले!!!

विश्वनाथाचा जीव थोडासा घुटमळला! जीभ आडवी पडल्यामुळें त्यास बोलतांच येईना! तथापि त्याच्या बोलण्याच्या दम छाटणाऱ्या प्रयत्नावरून व इतर अंगविक्षेपावरून त्यास आपल्या पित्याला भेटण्याची भलती उत्कंठा असावी! तथापि वेळेचा अभाव आणि परिस्थितीचा पाठपुरावा शिवाय दैवाचा दावा, यामुळें भयंकर निराशेंत होरपळून होरपळून तो सरतेशेवटीं आटपला!!!

झालें! त्यावेळीं त्या घरांत कसला शोचनीय, हृदयद्रावक, हृदय पिळून काढणारा देखावा चालला होता तो वाचकांस न सांगणें बरें!!!

अगोदरच क्षीण झालेल्या प्रकृतीवर पुत्र वियोगाचा परिणाम झाल्यामुळें वसंतराव, कुसुमताई आणि सरस्वतीकाकू पार खंगल्या ! पुत्र निधनाची वार्ता वाचून त्रिंबकरावांचे मेव्हणे गणपतराव आपल्या मातोश्रींसह आले होते त्यांचीहि त्या तिघांप्रमाणेंच स्थिति झाली ! ! अशा स्थितींत कंबर बसलेल्या श्रीकृष्णानें त्या सर्व मंडळींची सेवा करण्यासाठीं कंबर कसण्याचा निश्चय केला ! नारायण नगरीस पत्र पाठवून त्यानें इंदुस आणिलें. चार आठ दिवसांनीं सर्वांच्या प्रकृतीस बराच आराम वाटल्यावर श्रीकृष्णाच्या परवानगीनें श्री. साठे घरीं गेले. दोन आठवडे गेले, तिसरा आठवडा उगवला ! तो गेला, चवथा आला असें होतां होतां तीन महिन्यांनीं सुप्रसिद्ध डॉक्टर वेद्यांच्या औषधानें, लखुनाना व उमाकाकूंच्या अमोल सल्ला शिफारशीनें आणि निरपेक्ष मदतीनें, श्रीकृष्णाच्या प्रयत्नास उत्तम मोहोर आला. आणि एक महिन्यानें त्यास फळेंहि पण आलीं.

नंतर कांहीं दिवस गेल्यावर श्रीकृष्ण व इंदु वसंतरावाचा, त्यांच्या मंडळींचा व त्यांच्या पाहुण्यांचा निरोप घेऊन नारायण नगरीस आलीं !

संकटें एका मागून एक येऊं लागलीं म्हणजे तीं किती येतील याचा नेम नाहीं ! श्रीकृष्ण इंदुसह नारायण नगरीस येतो न येतो तोंच त्यास एक दुःखाचें ताट वाढून ठेवलें होतें ! एका सद्गृहस्थाकरितां (?) श्री. साठे जामीन राहिल्यामुळें, त्यांस पैसे भरणें भाग होतें. जवळ तर पैसा नाहीं, कर्ज तर काढावयाचें नाहीं आणि अब्रूला तर धक्का बसतां कामा नये अशी तिहेरी पेचांत साठे सांपडले होते. त्यांच्या मातोश्री तर घाबरून गेल्या होत्या ! रमाबाईनीं आपली तोड साठ्यास सांगितली, पण पत्नीला तिच्या सुखाला नागवून आपण सुखी होणें साठ्यास आवडलें नाहीं ! श्रीकृष्णास हा सार्यंत इतिहास कळल्यानंतर तोहि विवंचनेंत पडल्यासारखा दिसला. पण कांहीं वेळानें त्यानें साठ्यांस रमाबाईच्याच तोडीचा, निरुपाय करून सोडणाऱ्या संकट कालीं, अवलंब करण्याचा सल्ला दिला ! तरी त्यानें म्हणजे सर्व कार्य भागत होतें अशातला भाग नाहीं ! तथापि इंदु, श्रीकृष्ण व प्रभाकर यांनीं बाकीच्याची तरतूद केली, आणि साठे आपल्या पाठीमागच्या भगभगींतून रिकामे झाले ! !

एक दोन दिवसांतच कमलेस पुत्ररत्न झाल्याबद्दल कल्याणहून पत्र आलें. बारशास सर्वांस व विशेषतां साव्यांचे मातोश्रीस आग्रहानें बोलाविलें असल्यामुळें तीं सर्वच मंडळी गेली. कमलेस अगणित आनंद झाला. साव्यांचे मातोश्रींचा आनंद तर गगनांत मावेना. कमलेच्या कमलाकरास कुठें ठेवूं नी कुठें न ठेवूं असें इंदुस व रमाबाईस होऊन गेलें! श्रीकृष्णाचा आनंदहि कांहीं कमी नव्हता! प्रभाकर व दत्तोपंत यांनींहि त्या आनंदाचा वाटा घेतला होता. बारशानंतर एक दोन दिवस मंडळी तेथें राहिली आणि नंतर कमलेचा व तिच्या मंडळींचा निरोप घेऊन आपल्या गांवीं गेली.

वरील प्रसंगाचें महत्त्व आम्हांस इतकें वाटतें त्याचें कारण एवढेंच कीं श्रीकृष्णाच्या आयुष्यांतील लौकिकदृष्ट्या आनंदाचा शेवटचा प्रसंग हाच होय! दुसऱ्याच्या सुखापासून जन्म पावणारें, स्वकर्तव्याच्या बजावणीपासून मिळणारें स्वतां निर्दोष असल्याबद्दलचें आणि मनाला विपलाहि टोंचणी देणारें कृत्य हातून न घडल्याबद्दलचें शाश्वत अविनाशक, निर्दोष आणि तेजस्वी स्वर्गीय सुख त्यास नेहमीं असें ही गोष्ट अलाहिदा आहे! पण सुखाचा सामान्य कल्पनेप्रमाणें त्यास सुख मिळालें नाहीं एवढें खरें त्याच्या त्या उच्च सुखाबद्दल कोणासहि आनंदच होईल. परंतु तो आनंद अनुभविणें उच्च विचाराच्या निर्मल अंतरिक्षांत उंच उडाल्याशिवाय मनाला शक्य नसतें; आणि सामान्य मनाला उच्च विचाराच्या निर्मल अंतरिक्षांत उंच भराऱ्या मारून स्वर्गीय आनंद सारखा अनुभविणें केव्हांहि शक्य नसतें. थोडा वेळ तो आनंद तें उपभोगूं शकेल, नाहीं असें नाहीं. परंतु त्याचा बहुतेक वेळ भोंवतालीं पसरलेल्या पोकळ व क्षणिक सुखांत रमण्याकरितां जगाच्या रहाटीच्या भुसभुशीत सपाटीवरूनच हिंडण्या फिरण्यांतच जात असल्यामुळें श्रीकृष्णाचें वरील सुख शेवटचेंच असें त्यास वाटतें.

नारायण नगरीस आल्यावर श्रीकृष्णास गोकुळदासानें पुण्यास रामशेटकडे जाऊन तेथील व्यापारी मंडळाकडून दीन शिक्षण संस्थेकरितां कांहीं मदत मिळाल्यास पहावें म्हणून धाडलें. रामशेटानें श्रीकृष्णाची चांगलीच बरदास्त राखली. पंधरा वीस दिवस फिरून, गोमाजीचा सोमाजीस झब्बू मारून,

अमक्याकडून तमक्याचें मन वळवून, दीन शिक्षणसंस्थेचें महत्त्व घोसाळशेटाकडून शक्करशेटाच्या मनावर बिंबवून श्रीकृष्णानें रामशेटच्या मदतीनें दहा हजार रुपये पैदा केले. पुढें रामशेटनें त्यास मुंबईस नेलें. तेथेंहि तितकीच प्राप्ति चार आठ दिवसांत झाली. या सर्व काळांत श्रीकृष्ण जरी सुखांत असलेला दिसे तरी विनायकाच्या आजाराची काळजी त्याचें अंतर्याम जाळीत होती. तथापि कर्तव्यापुढें त्या काळजीचा बरचष्मा त्यानें चालून दिला नाहीं. पुन्हां पुण्यास परत आल्यावर श्रीकृष्णानें रामशेटचा प्रेमाचा निरोप घेतला आणि नारायण नगरीचा मार्ग धरला. स्टेशनवर येऊन गाडींत बसल्यावर अचानक रीतीनें त्याची व विक्रांताची गांठ पडली. इकडच्या तिकडच्या चार गप्पा चप्पा झाल्यावर विक्रांतानें श्रीकृष्णास पुण्यास येण्याचें कारण विचारलें. श्रीकृष्णानें अर्थात्च सरळ उत्तर दिलें. त्यानंतर कांहीं काळ लोटल्यावर गाडी चालू झाली. दुसरें स्टेशन जवळ आलें. भरधाव चालत असलेली गाडी अगदीं हळूं चालूं लागली. आडदांड विक्रांतानें झोपीं गेलेल्या श्रीकृष्णाचें बोचकें घेऊन गाडींतून उडी ठोकली आणि डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच कोठल्या कोठें पोबारा केला. तें विक्रांताचेंच बोचकें असेल या भावनेनें इतर उतारूंनीं श्रीकृष्णास अर्थात्च इशारा दिला नाहीं! श्रीकृष्ण गाडी आपल्या स्टेशनवर आल्यावर आपलें गाठोडें धुंडूं लागला. पण निराश होऊन त्यास खालीं उतरावें लागलें. गांवांत जाऊन त्यानें गोकुळदासाची गांठ घेतली. झालेला मजकूर सांगितला. गोकुळदासानेंहि रामशेटकडून पैसे आल्याचे सांगितलें, त्यामुळें श्रीकृष्णास एक प्रकारचें समाधान वाटून तो आपल्या घरीं गेला.

विनायकास सार्‍यांनीं घरीं आणलें होतें. त्याची अशक्त प्रकृति बरीच सुधारली होती. आठ चार दिवसांत तो चांगला निकोप होईल अशी सर्वांची खात्री होती व तो त्याप्रमाणें झालाही.

परंतु या अवधींत श्रीकृष्णाच्या पाठीमागें तिसरेंच लचांड लागलें होतें. बोचक्यांत एक फुटकी कपर्दिकाही न गवसल्यामुळें कल्पनाबाह्य चिडून जाऊन आणि इंदुचा प्राण श्रीकृष्ण होता म्हणून क्रोध, द्वेष, मत्सर व आंबट कुत्सितपणा इत्यादि नीच व हलकट मनोवृत्तींनीं मनस्वी भडकून जाऊन विक्रांतानें

श्रीकृष्णाचा आकस्मिक खून करण्याचा चांगलाच घाट घातला होता. श्रीकृष्ण एकांत वासांत फिरावयास एकटाच गेला असतां विक्रांत तेथें एकदम येऊन त्याचें नाक धरून तोंड उघडलें व तोंडांत बोळा घातला. श्रीकृष्णानें पुष्कळ धडपड केली, पण विक्रांत गांवातला पोळ व पुंड असल्यामुळें त्याचा टिकाव लागला नाहीं. सदूनें श्रीकृष्णास खालीं घेतलें, आणि आपल्या हातांतील सुरीनें त्यास इहलोकांतून हद्दपार करण्याच्या तयारीस लागला. श्रीकृष्णाच्या निराश्रित नरडीचा ती नीच सुरी, अंगावर शहारे आणणाऱ्या असुरीपणानें, राक्षसी घोट घेणार तोंच स्वजातीचें सहज भूषण लज्जा, असल्या महत्त्वाच्या व आणीबाणीच्या प्रसंगीं एका बाजूस सारून, इंदुनें विक्रांताचा, खून करण्यास हपापलेला उजवा हात वरच्यावर दाबून धरला आणि रमाबाईनीं श्रीकृष्णाचा तोंडांतील कृष्ण कृत्यास एका अर्थानें मदत करणारा बोळा काढला. कनिष्ठ बंधूची पत्नी म्हणजे वडील बंधूची कन्या वगैरे तत्त्वज्ञान श्रीकृष्णानें विक्रांतास व्यर्थ सांगितलें.'स्वतांचीं फळें स्वतां भोगावयास हरकत नाहीं,मग दुसऱ्याचीं फळें आपण होऊन घरीं चालत आलीं असतां किंवा यःकश्चित प्रयासानें तीं साध्य असतां उपभोगण्यास काय हरकत ? असली नीच, क्षुद्र हलकट व पशूसही न शोभणारी विचारसरणी ज्या दीर्घशहाण्या विक्रांताची होती त्यास श्रीकृष्णाचें तत्त्वज्ञान पहावें कसें ? अनीतीच्या दुर्गंधी नरकांत सदा कुजत राहण्यांतच जीवितसाफल्य मानणाऱ्या किड्याला नीतीच्या नवलमय नंदनवनांतील नाजूक व बिनकाटेरी गुलाबाच्या मनोहर व तन्मय करून सोडणाऱ्या सात्विक सुगंधाची पुसट कल्पना तरी कधीं यावी ? शेवाळ्यानें व्यापलेल्या आणि चिखलानें भरगच्च भरलेल्या विहिरींत राहून तेवढेंच जगसमजणाऱ्या फाजील गर्विष्ठ मंडूकाला बाहेरच्या निर्मळ, शांत व स्वर्गीय जगाची अंधुकहीकल्पना यावी कशी ? श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाचा, इंदुच्या सुधामय उपदेशाचा आणि रमाबाईच्या सात्विक क्रोधापासून निघणाऱ्या शाल्यांचा निगरगट्ट विक्रांतावर कांहीं परिणाम झाला नाहीं. यापुढें त्यानें अनेकवेळां श्रीकृष्णावर हले चढवून–नाहक हल्ले चढवून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला पण प्रत्येकवेळीं त्याची अशाच कांहींतरी रीतीनें अचूक व विलक्षण हास्यास्पद फजीती उडे व त्याचा जो मग योग्य व अभिनंदनीय उपहास सर्वांकडून होईत्यास पारावरच नसे.

वर वर्णिलेला प्रकार ज्या दिवशीं घडून आला, त्याच्या तिसरे दिवशीं गोकुळदासास थंडी वाजून आली. त्याच्या इकडे श्रीकृष्ण औषधपाणी देण्याकरतां गेला परंतु गोकुळदासाच्या बिघडलेल्या प्रकृतीचा पारा मिनिटा मिनिटास इतका चढत गेला कीं सरतेशेवटीं गोकुळदास गार होऊन त्यास कायमची काळ झोप लागली ! या गोष्टीनें श्रीकृष्णाच्या अंतःकरणास जो एकदम धक्का बसला तो कल्पनेनें आकळतां यावयाचा नाहीं ! परोपकारी व उदार गोकुळदासाचें सर्वांस सर्वदा सारखें स्मरण रहावें म्हणून श्रीकृष्णानें दीनशिक्षणसंस्थेस, 'श्रीगोकुळदास दीनशिक्षणसंस्था' असें नांव दिलें. गोकुळदासाच्या मंडळींची आणि इंदुची कमलेची अथवा रुस्तुमची गांठ पडली म्हणजे गोकुळदास व श्रीकृष्ण यांच्यांत वावरत असलेल्या अलोट व असामान्य सात्विक प्रेमाशिवाय बहुधा दुसरें कांहींच बोलणें चालत नाहीं.

असो. गोकुळदासाच्या चमत्कारिक व आकास्मिक मृत्युनंतर साळ्यांच्या धर्मपत्नीस विषमज्वरानें गाठलें ! साळ्यांच्या मातोश्री छाती बडवून घेऊं लागल्या! साळ्यांचें तोंड गोरेमोरें झालें! इंदुनें तर चिमणी एवढें तोंड केलें! डॉक्टरांनीं—हातखंडा डॉक्टरांनीं आशा नाहीं म्हणून सांगितल्यामुळें श्रीकृष्णाची देखील गाळण उडाली ! प्रभाकरच्या तोंडचें पाणी पळालें ! कोणास दोन दिवसांचाही भरंवसा वाटेना ! ! परंतु रमाबाई मात्र ' मी मरत नाहीं—खास मरत नाहीं, " असें सांगून सर्वांस धीर देत होत्या. आणि नवलाची गोष्ट हीच कीं, त्या आजारी पडल्यापासून सत्ताविसाव्या दिवशीं चांगल्या हिंडूं फिरूं लागल्या.

या जगांत कोणत्या वेळीं काय घडेल कोणी सांगावें ? श्रीमती रमाबाईस आराम वाटू लागला त्याच दिवशीं सायंकाळीं कमलेच्या सासऱ्यानें राम म्हटल्याबद्दलची दुःखदायक बातमी यावी हा विलक्षण योगायोग नाहीं कां ? तिला भेटण्याकरितां श्रीकृष्ण गेला, पण तेथें गेल्यावर स्वारी स्वतांच आजारी पडली ! तथापि विशेष काळजीचें कांहींच कारण नसल्यामुळें कमलेनें नारायणनगरीस कांहींच कळविलें नाहीं. पित्यासमान असणाऱ्या श्वशुर—वियोगानें व्याकुल झालेली कमला, पितृवियोगानें तळमळणारे तिचे पति आणि पतिवियो-

गानें खंडशः तुकडे झालेल्या कमलेच्या मातेसमान सासुबाई यांनीं श्रीकृष्णाच्या शुश्रुषेंत काडीभरही चूक पाडिली नाहीं. घर फिरावयास लागलें कीं त्याचे वासे देखील फिरूं लागतात असें अगोदरच होऊन गेलेल्या श्रीकृष्णास मी येथें कोठून आलों ? असें होऊन गेलें ! त्यास जरा बरें वाटूं लागतांक्षणीं त्यानें तेथून काढता पाय घेतला !

तो दिवस वर्ष प्रतिपदेचा होता ! आदले दिवशीं दुःख दुष्ट विचार, व त्यांचे जातभाई यांनीं आपल्या तोंडास काळें फासल्यामुळें, त्या दिवशीं आनंदी आनंद असावयाचा ! पण हें वर्ष कोणाच्या पोटीं जन्मलें होतें कोणास ठाऊक ! सकाळींच श्री. साठ्यांच्या मातोश्रींनीं इहलोकची वसती संपविल्यामुळें ज्याच्या त्याच्या तोंडावर दुःखानें आपलें अनियंत्रित साम्राज्य पसरिलें होतें ! श्री-कृष्णाची स्थिति तर वर्णनबाह्य होती ! त्यास ‘ अंतवैराचें ’ दुःख तर झालेंच झालें ! पण शिवाय, त्यानें घरांत पाय ठेवावयास आणि साठ्यांच्या मातोश्रींचें शव बाहेर काढावयास एक गांठ पडल्यामुळें त्याच्या मनाची जी विलक्षण बावरी, भ्रमिष्ट व डोंगर कोसळून पडल्यासारखी स्थिती झाली तिचें हुबेहुब चित्र कोण काढूं शकेल ? शोकाग्निनें दहत राहण्यापेक्षां चिताग्नींत एकदम जळून खाक होणें त्यास फार उत्तम वाटलें ! आणि त्याच्या स्थितींत असणाऱ्या कोणत्या व्यक्तीस असें होणार नाहीं ? तो फारच लावून घेणाऱ्या मनाला लगाम घालण्याचा पुष्कळ प्रयत्न करी पण व्यर्थ ! दिवसापाठीमागून दिवस पटापट प्राण सोडूं लागले, पण याचें शोकमय दुःख मात्र त्या मार्गास लागलेलेंहि दिसेना ! आजच्यापेक्षां उद्यां, उद्यांपेक्षां परवां, परवांपेक्षां तेरवां तो अधिका-धिकच चिंतातुर, शोकग्रस्त, व्यथित, दुर्मुखलेला, कष्टी, दुःखी आणि भ्रमिष्ट होत चालला ! आणि श्रीरामाच्या जन्मोत्सवादिवशीं ‘ निरक्षर बांधव शाळेंत शिकवितां शिकवितां रात्रीं साडेआठ वाजतां

**“ जनीं जन्मुनी जनमदतीनें जगलों जर जगतीं ।**
**जनकार्याविण मरूं कशास्तव ? नकोच अन्य गति ॥**

या श्रेष्ठोक्तीला जणूं काय सार्थ व धन्य करण्याकरितां एका उचकीसरसी त्याचें प्राणोत्क्रमण झालें ! गेला ! अनाथांचा नाथ, दीनांचा देव, गरीबांचा

कनवाळू गेला ! ! पीडितांचा पालक, निराश्रितांचा आश्रय, दुःखितांचा मित्र गेला ! ! मित्रांचा मुरलीधर, प्रभाकराचा साह्यकारी, इंदुचा सौभाग्यसूर्य मावळला ! ! ! कमलेचा बंधु, रुस्तुमचा मानसपिता, स्वकुलाचा शेवटचा दीप नाहींसा झाला ! ! ! गेला ! गेला ! ! गेला, कायमचा गेला ! पण नाहीं, तो गेला नाहीं ! तो पहा तो पहा ! तुम्हांस नाहीं दिसत ? आपले मित्र, आपली इंदु, आपली कमला, आपले आश्रित, आपले साठे सोडून श्री-कृष्ण अक्षय्य सुखाचें सदोदित सेवन करण्याकरितां स्वर्गांत जावयाला स्वार्थी कधीं झाला ? तुमची कांहीं तरी कल्पना आहे झालें ! आम्हांस तर श्रीकृष्ण इंदुचें पाणिग्रहण करून कमलेला व प्रभाकराला दिलेलें वचन पूर्ण कर-ण्याच्या जय्यत तयारींत दिसतो ! काय ? तुम्हाला दिसत नाहीं ? खोटें बोलतां ? बोला बापडे ! तो पहा, तो पहा श्रीकृष्ण विक्रांताच्या हातून इंदुची सुटका करीत आहे ! पहा, अजून पहा, श्रीकृष्ण रुस्तुमला इंदुच्या स्वाधीन करून ‘ हिला पोटच्या गोळयाप्रमाणें पाळ ’ असें सांगत आहे ! पहा, डोळे वासून पहा, गोकुळदासच्या निधनामुळें दीन-शिक्षण संस्थेचें अपरमित नुकसान झालेमुळें चिंतातूर होऊन बसला आहे ! लक्षपूर्वक पहा, श्रीकृष्ण तरटावर बसून निरक्षर ( ? ) बंधूंस शिकवीत आहे ! काय ? काय पाहतों आम्ही ! श्रीकृष्णाचें प्रेत ? आम्हांस भ्रम तर नाहीं झाला ? नाहीं, खास नाहीं. एकूण श्रीकृष्ण गेला तर ? गे—ला ? गे—ला ! ! गे...ला ! ! ! अं...धार ! अं......धार ! ! अं..........धार ! ! ! का.......ळोख ! का...........ळोख ! ! का..............ळोख ! ! ! सगळीकडे काळाकुट्ट काळोख ! ! ! या काळयाकुट्ट काळोखांतून चांचपडत, चांचपडत, धडपडत, धडपडत मार्ग काढून श्रीकृष्णाच्या आकस्मिक व अंतःकरणाचा चक्काचूर कर-करणाऱ्या निधनाची खबर साठ्यास व इंदुस सांगण्याची पाळी आमचेवर यावी ना ? परमेश्वरा, यापेक्षां आमचा येथल्या येथेंच कां शेवट करीत नाहींस ?

काय म्हणतां ? ही शोचनीय बातमी साठ्यास कळलेली दिसते ? कशा-वरून ?— काय ! ऐकूं ? काय ऐकूं ? कुठून ऐकूं ? कोणत्या बाजूस कान देऊं ? --येथूनच ऐकूं ? पण काय ऐकूं ?

" परमेश्वरा, कोणत्या जन्मीं मीं पातकाचे किती घडे भरून ठेवलेत, कीं त्यांचें सगळें प्रायश्चित्त व शासन या एका जन्मांतच देणें तुला बरें वाटतें? श्रीकृष्ण गेल्याची वार्ता त्याच्या एका प्रिय शिष्यानें मला. रडत रडत अश्रु पुसण्याचा प्रयत्न करीत सांगितली, त्यासरसा मी मटकन् खालीं बसलों खरा! पण पुढें काय? श्रीकृष्णाला भेटण्याकरितां मला तात्काळ जातां येऊं नये ना? मी किती पापी, किती चांडाळ, किती दुष्ट, किती निमकहराम!!! श्रीकृष्णा-सारखा सद्गुणांचा पुतळा मला दोस्त भेटला असतां, त्याच्यासंगतीचा लाभ मला जगाच्या अंतापर्यंत घेतां येऊं नये हें केवढें दुर्दैव! श्रीकृष्णा, मीं पामर, मीं पापी, मी पतित!!! हें तुला ठाऊक होतें ना? मग असें असतां मला हाताला धरून कां नेलें नाहींस? इतका माझ्यावर कां रागावलास? असा तुझा भयंकर अपराध तरी माझ्या हातून काय घडला?—माझें एक असो! पण कमलेला, प्रभाकराला सोडून कां गेलास? त्यांनीं तुझें काय केलें?—तुझ्या लाडक्या इंदुला, प्राणापेक्षांहि प्रिय अशा तुझ्या दीन शिक्षण संस्थेला, तुझ्या आवडत्या निरक्षर बांधवशाळेला सोडून तूं कां चालता झालास? त्यांनीं तर तुझा घोडें मारलें नव्हतें ना? काय म्हणालास? तात्यांनीं तुला वर बोलावलें? आईनें तुला निरोप धाडला? गोकुळदासाची हाक आली? श्रीकृष्णा, निरक्षर बांधवशाळा, दीन-शिक्षण संस्था वगैरे तुम्हांनीं समाजसेवा बजावण्याकरितां कल्पांतापर्यंत आयुष्य परमेश्वराजवळ मागेन, असें बोलला होतास ना? मग तात्यांची, आईची, गोकुळदासाची प्रेमाची हाक पवित्र समाज सेवेपेक्षां प्रिय वाटावी कां?—काय बोलतोस? तुला प्रिय वाटत नाहीं? आणि म्हणूनच तूं स्वर्गाच्या रस्त्यावर अद्यापि रेंगाळत आहेस?—पण इकडे आड आणि तिकडे विहीर असली शोचनीय व दुधखुळी स्थिती करून घेऊन आपल्याच पायावर आपण धोंड पाडून घ्यावयाची बुद्धी तुला कुठून आठवली?—अद्यापि तरी परत ये. असा रेंगाळत राहूं नकोस.—काय—सांगतोस? परमेश्वर तुला वर येण्याची आज्ञा करतो आणि तुला त्याची आज्ञा मोडणें शक्य नाहीं? मग परमेश्वर इतका नीच झाला काय? दयेचा ठिपूसहि हृदयांत नसतांना, करुणेचें नांवहि अंतःकरणांत नसतांना, दयाघन, करुणासागर त्यास म्हणवून घ्यावेसें मात्र वाटतें? असल्याची आज्ञा कशाला पाळतोस?—

कां ? रागावलास कां ? डोळे लाल कां केलेस ? भिवया कां चढवल्यास ? कपाळाला आठ्या कां घातल्यास ? दांत ओंठ कां खाऊं लागलास ?—देवाला निंदलें म्हणून ? पण मी कां निंदूं नये ? काय म्हणतोस ? परमेश्वर करतो तें सर्व आपल्या कल्याणासाठीं ? मग तुला नेऊन त्यानें आमचें कल्याण काय केलें ?—काय ? तें जर कोत्या मानवबुद्धीला कळलें, तर परमेश्वराचें परमेश्वरत्व कुठें राहिलें ?—नाहीं, पुन्हां परमेश्वरास निंदायचा नाहीं !............श्रीकृष्णा, तूं किती भाग्याचा ! स्वर्गांत तुझी आणि सर्व सज्जनांबरोबर माझ्या मातोश्रींचं गांठ पडणार ! पाठशिवणीच्या डावाप्रमाणें, तुम्ही हातावर हात मारून गेलांत ! मी मात्र या जगांत खितपत पडलों आहे !......आई, माझें तुझ्यावर किंवा श्रीकृष्णावर खरें प्रेमच नव्हतें ! प्रेमासारखें जें दिसत होतें, तें त्याचें सोंग, निव्वळ सोंग ! ! तो रंग, मुलामा, नक्कल ! ! ! तें अस्सल सुरती नाणें नव्हतें ! ! ! तें अस्सल असतें तर तें विटलें नसतें ! जें सोन्यासारखें चकाकतें तें सोनें असतें कां ? वृंदावनाला कल्पवृक्ष म्हणतां येईल कां ? भांगेला तुळशीची योग्यता येईल कां ? भाडोत्री प्रेमाला खऱ्या प्रेमाची किंमत कोणी देईल कां ? चैनीची चंगळ चालेपर्यंत आपल्या यजमानावर प्रेम करणाऱ्या बाजार बसवींच्या प्रेमांत आणि माझ्या प्रेमांत अंतर कोणतें ? मनाची मर्जी सांभाळण्यासाठीं यजमान तयार नसला, कीं तिची मर्जी जशी खप्पा होते, तशी माझी होत नव्हती कां ? पण आई तूं आपल्या वात्सल्यपूर्ण उदार अंतःकरणानें त्याला हट्ट नांव देत होतीस, आणि श्रीकृष्णा, मित्रप्रेमानें उंचबळल्यामुळें तूं तिला वेडी समजून असें संबोधित होतास ! माझें जर तुम्हां दोघांवर खरें प्रेम असतें, स्वार्थविरहित प्रेम असतें, निष्काम प्रेम असतें, प्रेमाकरितां म्हणून जर प्रेम असतें, तर तुझ्याबरोबरच मी स्वर्गाची वाट धरली असती ! माझें तुमच्यावर खरें प्रेम नव्हतें म्हणून माझ्या मनाला सारखी लागून राहिलेली टोचणी हृदय घायाळ करते, डोळे काढून टाकते, आणि शरीरांतील चेतनाशक्तिला मूठमाती देऊं पाहते ! पण तिला तें साधत मात्र नाहीं ! ! माझें दुर्धर व खट्याळ दुर्दैव झालें ! ! ! काळोख ! अंधार ! ! अंधार ! ! ! सगळीकडे कसा निबिड, दाट अंधार ! ! ! परमेश्वरा ! सोडव !...”

नको ! हे शब्द देखील ऐकवत नाहीत ! हे शब्द ऐकण्यापेक्षां आमच्या कानठिळ्या बसलेल्या फार उत्तम ! ! ! प–ण हें का–य ? हे विलाप कोणाचे ? हा शो–क कोणाचा ? ह्या किंका–ळ्या कोणा–च्या ?

देवा ! तुला कृपेचा समुद्र, करुणेचा कालवा, दयेचा सागर कोण म्हणत असतील ते म्हणोत ! मी तर कांहीं म्हणणार नाहीं ! संकटसमयीं शरण आलेल्यांना तूं अभयदान देतोस असें कुणाला वाटत असेल त्याला खुशाल वाटो ! मला तर मुळींच वाटत नाहीं ! तुझा देवपणा पूर्वीच्या युगांत काय असेल तो असो ! आतां तुझ्यांत देवपणाच उरला नाहीं ! ... प...ण नाहीं ! तुला दो...ष दे...त नाहीं ! तुला दोष काय म्हणून द्यावयाचा ? आमचें नशीबच फुटकें, आमचीं कर्में जर कुजकीं, आम्हीं जर विषव पेरलें, तर आम्हांस हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या, शारीरिक व्याधि, मानासिक पीडा, इंद्रियांचे कष्ट दारिद्र्याच्या दाट्या आणि नरकाची दुर्गंधी व कडवटपणाच्या काट्या सोसाव्या लागल्या; तर तुझ्याकडे काय दोष ? धोतऱ्याचें बीं पेरून गुलाब कसें मिळणार ? निवडुंगांच्या काटेरी फण्या पसरून पराच्या गादीचा मऊपणा कसा लाभणार ?···देवा ! मी पापी, मी नष्ट, मी चांडाळीण ! मला मनुष्यजन्माला कशाला घातलेंस ! माझ्या योगानें कुणाला सुख झालें ? सगळ्यांना दुःखाच्या खाईत दडपून टाकण्याकरितां मला जन्माला घातलेंस त्यापेक्षां रौरवाच्या नरककुंडांत तळमळत तळमळत आणि तडफडत तडफडत कां नाहीं ठेविलेंस ? मातेच्या उदरांत वास करण्यापूर्वीही घरीं भावाला बहिष्कार कोणमुळें बसला ? माझ्यामुळेंच ना ? नंतर जन्माला येण्यापूर्वी पित्याची दैना दैना कोणामुळें झाली ? माझ्या मुळेंच ना ? जन्माला आल्यावर मातापितरांना अनेक तऱ्हेच्या हाल अपेष्टांनीं पिळून पिळून सरते शेवटीं त्यांना कोणीं टाळलें ? मींच ना ? जगाच्या जळत्या ज्वालेचा दाह सहन न होऊन आपली समाप्ति होण्याकरितां त्या विहीरीवर जाऊन साठ्यांना, कमलावन्संना, दादाला नी स्वतांला जन्माच्या सुखाला कोणीं मुकविलें ? मींच ना ? अशा राक्षसीणीला, अशा चांडाळणीला, जन्माला घालण्यांत तुझी चूक नाहीं कां झाली ? माझी धोंड गळ्यांत पडली नसती, तर स्वतांकडून जगाचा उपयोग नसता कां झाला ?

माझा लोढणा स्वतांच्या गळ्यांत नसता, तर जगाला स्वर्गाचें सुख प्राप्त करून देण्यांत स्वतां खपायचें झालें नसतें कां ? देवा ! मी एक फुटक्या कपाळाची ! प...ण कमलावन्सं, साठे सगळींच कां रे फुटक्या कपाळाची ? मी–पापि म्हणून माझ्या संगतीपासून झालें एवढें दु:ख बस्स झालें, असा विचार करून जायचें झालें कां ? पण माझ्याकरितां नाहीं तर नाहीं, आपल्या साठ्यांकरितां, आपल्या कमलाताईकरितां, आपल्या रुस्तुमकरितां, आपल्या लाडक्या निरक्षर बांधवशाळेकरितां, आपल्या आवडत्या संस्थेकरितां तरी येथें राहावयास कोणती हरकत होती ?... काय म्हणायचें ? अगोदर डोळे पुसूं ? पतिपासून पत्नीची कायमची ताटातूट झाल्यावर कुडींतून प्राण जाईपर्यंत त्या आर्येच्या डोळ्यांचें पाणी कसें खळेल ?.... काय विचारायचें ? पत्नी पतिची सावली नाहीं कां ? होय, पत्नी पतिची सावली. मग स्वतां जगांतून जायचें झाल्यावर मी येथें कशी राहिलें असा कां प्रश्नाचा रोख आहे? आपल्या सावलीचे प्राण कंठापर्यंत येतात, पण...सती जायला अडथळा नसता तर या आपल्या सावलीनें आपल्याबरोबर यायला मागें घेतलें असतें कां ?... काय पृच्छा करायची ? पति पत्नीचा प्यारा प्राण ना ?...होय. मग आपण स्वर्गाच्या वाटेला लागल्यावर माझी चेतनशक्ति आपल्याबरोबर कां आली नाहीं, असेंच कां विचारायचें?पण मी तरी काय करूं? .... ... काय म्हणतां ? चांडाळांनो, काय म्हणतां ? पशुपक्ष्यांनों, काय म्हणतां ? मी लग्न करूं ? प्रीतिनें प्रीतिला ओळखल्यावर आणि हृदयाची हृदयाला साक्ष पटून मन मनाशीं संलग्न झाल्यावर नुसतें लग्नाचें प्रदर्शन झालें नाहीं म्हणून लग्न झालेंच नाहीं असें म्हणायला लाज कशी नाहीं वाटत ? ... काय म्हटलें ? त्यांनीं माझ्या मनाची नुसती परीक्षा बघीतली ? त्याच्यावर रागावू नको ? अश्रू पुसूं ? ... ...सगळें काहीं करतें. पण मी आपल्या पायाची सेवा करण्याकरितां कोणत्या मार्गानें येऊं ? ... काय म्हटलें परमेश्वराचे हेतु फार खोल असतात ? आणि माझी व आपली ताटातूट करण्यांत त्याचा असाच खोल व उदात्त हेतु आहे ? ... असेल ! असेल ! !—नाहीं आहेच. पायाची नम्र दासी होण्याची, सुख दुःखाची प्रेमळ वाटेकरीण होण्याची, जन्माची सहचारिणी होण्याची पवित्र पात्रता मी आपल्या निर्मल चारित्र्यानें अंगीं आणावी हाच त्याचा उदात्त हेतु ना ? मग मी कां दुःख करीन ? पण,

मला वाईट वाटतें तें इतकेंच कीं स्वतांच्या सान्निध्यानें ती योग्यता माझ्या अंगीं लवकर आली असती, ती संधि माझ्या बारीक व टिचक्या कपाळांत नाहीं. ...... पण मी पात्र होईपर्यंत, निर्मल चारित्र्याची सत्त्वपूर्ण तपश्चर्या संपेपर्यंत आपण परमेश्वराजवळच रहाल ना ? किंवा पुन्हां या मृत्युलोकांत अवतरायचेंच झालें तर या अभागिणीशिवाय दुसरीचें पाणिग्रहण करणार नाहीं ही आपली वाणी टिकेल ना ? किती वेडी आणि शंकेखोर मी ? ... परमेश्वरा ! तुझ्या कृपेच्या छत्राच्या स्वाधीन या दीन, अनाथ, अजाण अबलेला करून तुझ्या पायाकडे येणें होत आहे, तेव्हां माझ्या अंतःकरणांत साठवलेल्या स्वतांच्या मूर्तीचें संतत निर्मळ ध्यान करीत असतां, चुकून चुकीच्या काटेरी मार्गावरून भ्रामकपणाच्या अथवा मोहाच्या अंधळेपणानें मी जाऊं लागलें, तर मला शुद्धपणाच्या राजस राजमार्गावर आणण्याची जोखमीची जबाबदारी तुझ्या कृपेकडे म्हणजे पर्यायानें—नव्हे प्रत्यक्ष तुझ्याकडेच येते, हें मीं सांगायला हवें कां ? ... ... परमेश्वरा ! ... ...

हे इंदुचेंच शब्द ना ? मग तिला कांहींच कां दुःख होत नाहीं ? प्रथम आपण ऐकलेले हृदयभेदक विलाप पाषाणासहि पाझर फोडणारा शोक, आणि किंकाळ्या तिच्याच ना ? मग तिचे दुःख आतां कशानें कमी झाले ?—काय म्हणतां, उच्च मनाला, परमेश्वरी कृतीवरील अढळ निश्चयामुळें, परमेश्वराच्या उदात्त व खोल हेतुचा स्पष्ट उलगडा पडला नाहीं तरी, कशानेंच दुःख होत नसतें ? त्यास सुखाइतकेंच दुःख प्रिय असतें ? ऐहिक नश्वर जगाच्या सुखदुःखाच्या भावना त्याला पारख्या असतात ?...मग-मग आमच्या मनाची तशी स्थिति कां होत नाहीं ? आमचे मन तिकके उच्च नाहीं म्हणून ? मग आमच्या सारख्याच्या मनाला दुःखावेग कमी करण्याला कांहींच कां साधन नाहीं ?...काय म्हणतां ? आहे ?...मग बोला, बोला लवकर काय साधन आहे ते ? काय ? कालांतर ?...किती काळ गेला पाहिजे ?...काय बोलतां? तुमच्या मताने भरपूर काळ गेला आहे ?....एक घटका म्हणजे भरपूर काळ कां ?....काय ? एक वर्ष झालें ? श्रीकृष्णाला स्वर्गवासी होऊन वर्ष झालें ? काय आज १९१८ ची आगष्टची १९ तारीख !........खरेंच ! श्रीकृष्णाला

घाकून आज वर्ष झालें. आणि तुम्ही म्हणतां त्याप्रमाणे आह्मी तुम्हांस फक्त श्रीकृष्णाचें चरित्र सांगत होतों. तें आतां संपलें; वाचकहो! तें संपलें. तेव्हां उण्यापुऱ्याबद्दल प्रेमळ क्षमेचे दान प्रस्तुत लेखकाला घाला अशी सप्रेम सविनय प्रार्थना करून आपली सप्रमाण परवानगी घ्यावयास कांहींच हरकत नाहीं. ही परवानगी घेतांना घाई ही केलीच पाहिजे. कारण तुम्हांस कंटाळा आला असेल! तथापि आणखी थोडीशी कळ मारण्यास कांहीं हरकत आहे काय?

आम्हांस आपण नुकतेच सांगितल्याप्रमाणें इंदुचें मन उदात्ताच्या उज्ज्वल व निर्मल वातावरणांत खूप उंच उडून आपल्या दिव्य पंखावर कितीतरी वेळ रहात असतें! एक एक दिवशीं तर तें खालीं येतच नाहीं! परंतु श्रीकृष्णा-बद्दलच्या असामान्य दुःखाचा आह्मीं अगर आमच्या सारख्यांनीं, विषारी धूर सर्व वातावरणभर सोडल्यास इंदुचें मन एकदम खालीं येऊन, त्याला ती पुष्कळ दाबण्याचा प्रयत्न करिते तरी न ऐकतां, शोकसागरांत अविचारपणानें खोल उडी घेतें. इंदुची योग्यता कमी करावी या उद्देशानें आम्ही वरील विधान केलें नाहीं. इंदु आमच्यापेक्षां शतपटीनें, लाखोपटीनें श्रेष्ठ, वंदनीय व आदरणीय आहे, हें आम्हीं जाणून बुजून सांगावयास हवें असें नाहीं. तिच्याशीं वागण्यां-त आम्ही जो संबंध ठेवितों, तोच आमच्या मतांत तिच्याविषयीं जो प्रेमयुक्त आदर वसत आहे, त्याचा दुंदुभी सर्व जगापुढें वाजविण्यास पूर्ण समर्थ आहे, तिच्याविषयीं आम्हीं जें विधान केलें तें जगापुढें शुद्ध सत्य ठेवण्याच्या बुद्धीनें केलें; आणि सत्यप्रिय इंदु या आमच्या सत्याविष्करणानें न रागवतां आनंदच पावेल अशी खात्री आहे. कारण आपल्या-विषयीं समाजाच्या मनांत वाजवी-पेक्षां जास्त आदर वसावा असे तिला बिलकुल वाटत नाहीं. त्यांतूनही आमचे हातून कांहीं प्रमाद घडत असल्यास इंदुचे वात्सल्यपूर्ण अंतःकरण आम्हांस क्षमा करण्यास समर्थ नाहीं असें कसें म्हणावें,

आपणांपेक्षां मानाने, योग्यतेने, श्रेष्ठत्वानें अगर अन्य तऱ्हेनें थोर असणा-ऱ्यांस आपण बहुमानार्थी बहुवचनानें संबोधित असतों. परंतु आई, देव वगैरेंना अमर्याद प्रेमामुळे एकवचनांत संबोधितों. हाच न्याय इंदु, प्रभाकर वगैरेस,

विशेषतां आमच्या चरित्र नायक श्रीकृष्णास, आम्ही एकवचनानें संबोधण्यास प्रामुख्यानें कारण झाला हें उघड आहे.

शेवटीं, ज्यानें हे चरित्र लिहिण्याची आम्हांस सुबुद्धि देऊन आमच्या हातून तें काम अमेरिकेंतील मावळता सूर्य येथला मावळता होण्यापर्यंतच्या अवधींत पार पाडविलें, त्याच जनस्वरूपी जनार्दनास, श्रीकृष्णाच्या आत्म्यास पूर्ण शांति मिळो व त्याच्या सारखीं तेजस्वीं रत्ने या आर्यावर्तांत निपजून तो देवावर्त बनो अशी सप्रेम, सविनय, सप्रणाम प्रार्थना भक्ताच्या आपलेपणानें आणि पुत्राच्या लाडिकपणानें मनोभावें करतांना त्याच्याच निर्मळ पवित्र, पुण्य करुणाचरणीं, भुसभुशीत बोरुच्या पिळपिळीत लेखणींतून उमलेलें हें गंधहीन पुष्प अर्पण करितों. त्यानें तो संतुष्ट होऊन सर्वांस सर्वथैव सुखी राखो, एवढीच इच्छा आहे.

सर्वदा शुभं भवतु सताम्
श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---


श्री· महाराष्ट्रीय कृत

# स्वावलंबन

# आणि

# गंगाभागीरथी

हीं पुस्तकें केव्हां बाहेर येणार ?

# गुरुवर्यांचा आशीर्वाद.

## " स्वावलंबन व झांकलें माणिक. "

### वाचून.

बाळा ! स्वंतत्र रचना सुंदर होवो तुझ्या करीं पुढती वाटे म्यांहि बघावें ग्रंथ तुझे लोक सर्वही पढती ॥ १ ॥ वाचून ' स्वावलंबन, ' ' छोटी रचना स्वतंत्र ' निरखोनी; वांग्मयवीरीं करशिल नांव अशी खातरीच होत मनीं ॥ २ ॥ होई अन्यहि प्रांतीं पुरुषोत्तम हाच काशिनाथाचा; आशीर्वाद. शिरीं तव हात असो सदय विश्वनाथाचा ॥ ३ ॥

श्रीजगज्जनकाय नमः

# झांकलें माणिक

अर्थात्

## महत्त्वाकांक्षी.

अमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा
पितां बुडाशीं गाळ दिसे
त्या अनुभव हें नांव असे
फेंकुनि द्या तो जगावरी
अमृत होउ तो कुणातरी

केशवसुत.

लेखक

श्री. महाराष्ट्रीय.

१९२०

विशेष माहिती ] **विद्यार्थी-संघ.** [ चिटणिसां-कडे.

**उद्देशः**—**ग्रामसुधारणा**—(अ) शेतकीमध्यें शक्य ती सुधारणा करून शेतकऱ्यांशीं सहकारिता करणें, (आ) उद्योगधंद्याला व्यवस्थित स्वरूप देणें, (इ) गांवकऱ्यांना धर्मबाबतींत औषधपाण्याविषयीं मदत करून त्यांचें पाठबळ मिळविणें-(ई) लोकांस जरूरीचें व्यावहारिक शिक्षण देणें, (उ) सर्व बाबतींत 'मिशनरी' काम करणें.

**साधनें**:—स्वावलंबन (अ) शेती करून शेतकऱ्यांच्या मुलांस प्राथमिक-शिक्षण देणें, (आ) उद्योगमंदिरें व स्वदेशी वस्तुभांडारें उघडणें (इ) धार्मिक व आरोग्यविषयक शिक्षण देऊन (ई) सद्यःस्थितीची व कर्तव्याची ओळख करून देणें.

**नियमः**—कसल्याही विद्येविषयीं कळकळ बाळगून प्रयत्न करणारास सभासद होतां येतें. सभासदानें शुद्ध मनानेंच काम केलें पाहिजे. (२) संघ कोणत्याही विशिष्ट मताचा पुरस्कर्ता नाहीं; पण खरें तत्त्व समजून घेऊन प्रयत्न करणारा आहे.

---

प्रकाशक—यशवंत बळवंत फडके. C/o गोखले ५९८ बुधवार,
पुणें शहर.

मुद्रक—शंकर नरहर जोशी, 'चित्रशाळा' प्रेस, १०२६ सदाशिव पेठ,
पुणें शहर.